# मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर २०१४ | किंमत १५ रुपये



अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार मासिक

सर्वमंगल मांगल्ये
शिवेसर्वार्थ साधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी
नारायणी नमस्तुते ॥












# ‘लेखक आपल्या भेटीला!’



या उपक्रमांर्तगत दि. २३ ऑगस्ट २०१४ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रसिद्ध लेखिका सुधा मूर्ती यांच्या भेटीचा योग जुळून आला होता. एका प्रसन्न क्षणी श्री. अनिल मेहता आणि लेखिका सुधा मूर्ती.



या प्रसंगी सुधा मूर्ती यांनी वाचकांशी मनमोकळा संवाद साधला. आपल्या पुस्तकांवर स्वाक्षरीही केली. रसिक वाचक, लेखिका आणि अनुवादिका लीना सोहोनी.

# मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर २०१४ वर्ष चौदावे अंक नववा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत
१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संवाद | ४ |
| संपादकीय | ६ |
| साहित्यवार्ता | १२ |
| पुरस्कार | ५३ |
| पुस्तक परिचय | ६८ |
| द पार्टनर | |
| तो एक पाकिस्तानी | |
| साद उत्तुंगाची | |
| अभिप्राय | १०२ |
| श्रद्धांजली | १०३ |
| बालनगरी | १११ |

मांडणी-अक्षरजुळणी

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड,
टेलिफोनभवनसमोर,
पुणे-४११ ०३०
फोन :०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com

डिजिटल अंकाची वर्गणी

तीन वर्षांची ३००रु.  पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संवाद.....

## नवरात्र : उत्सव स्त्रीत्वाचा

आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत नवरसाने नटलेल्या नित्यनूतन नवलाईच्या नवरात्रींचा उत्सव सुरू होईल, हवेमध्ये धुपाचा गंध दरवळत राहील, घटस्थापनेनंतर अवघ्या भूतलावर निसर्ग फुलांच्या माळा विणत येईल आणि स्त्रीत्वाच्या परमोच्च आविष्काराचे, मातृत्वाच्या गौरवाचे शब्द-गीत चराचरांत भिनत जाईल.

''ऐलमा पैलमा गणेशदेवा, माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा...'' असा हा नवरात्रोत्सव, आदिशक्ती, आदिमातेच्या उपासनेचे हे दिवस.

'आपल्या शक्तीचा प्रचंड गर्व झालेल्या आणि त्यामुळेच उन्मत्त होऊन देवादिकांना त्रास देणाऱ्या महिषासूर नामक राक्षसाबरोबर देवीनं सलग नऊ दिवस युद्ध केलं आणि शेवटी नवव्या दिवशी त्या राक्षसाचा वध केला आणि युद्ध संपलं, तो विजयोत्सवाचा दिवस म्हणजे विजयादशमी अर्थात दसरा!'

नवरात्र - वाईटावर चांगल्याचा विजय आणि त्यासाठी साजरा होणारा 'नऊ-रात्रींचा' सोहळा. शक्तीउपासनेचा काळ, देवीच्या वेगवेगळ्या रूपांचे पूजन करण्याचे हे दिवस. जी जन्म देते, घडवते संपूर्ण जगाला; जी रात्रीच्या गर्भातून घेऊन येते आशेची नवीन पहाट, जी नाश करते वाईट प्रवृत्तींचा, नकारात्मकतेचा असा स्त्रीच्या विविध गुणांचा उत्सव म्हणजेच 'नवरात्र'.

पूर्वी मातृसत्ताक पद्धती होती. स्त्रियांना पूजनीय स्थान होतं. ज्या काळामध्ये, वैदिकोत्तर काळात हा उत्सव सुरू झाला, त्यावेळी आपले पूर्वज शेती आणि पशुपालनात रमले होते, स्थिरावले होते. 'नवधान्य' पूजन आणि धरतीचे सृजन नृत्य-गीताद्वारे साजरे करताना स्त्रीशक्तीच्या कृतज्ञतेबद्दल तिची पूजा सुरू झाली.

धरतीमध्ये जी सहन करण्याची निसर्गदत्त शक्ती आहे, ती स्त्रीमध्ये असते. धरतीमध्ये नवनिर्मितीचे, सृजनाचे सामर्थ्य आहे, हे स्त्रीमध्ये प्रजोत्पादनाच्या रूपाने प्रतीत होते. उदरभरणाचे जे काम धरती धनधान्य देऊन करते, प्रत्येक घरातील स्त्री अगदी त्याला पूरक काम करीत असते. धरती हा जसा माणसांच्या जगण्याचा आधार आहे, त्यानुसार स्त्रीसुद्धा सुख-दु:खात, आयुष्याच्या सर्व टप्प्यांत सर्वांचे 'संगोपन' करीत असते. भलेही तिचे रूप वा नाते कोणतेही असो. आपल्याकडे प्रत्येक देवीला आई म्हणतात, ते याचमुळे. यामध्ये स्त्री-पुरुष हा भाग नाही. तसे असते तर आमच्या पुराणात, गीतात शिवाला किंवा विष्णूला, रामाला वा कृष्णाला वडील, बाबा असे संबोधले असते. तसे फार क्वचित आढळते.

पुढे मातृसत्ताक पद्धतीची जागा पुरुषकेंद्री समाजाने घेतली. या समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीचे स्थान दुय्यम ठरले. काळाबरोबरच स्त्रीने पुन्हा एकदा स्वत:ला सिद्ध केले, 'पाचजणांना पती म्हणून स्वीकारण्याचा निर्णय द्रौपदीने घेतला आणि समाजानेही तो मान्य केला, पतीसाठी आख्खं आयुष्य अंध राहणारी गांधारी, पतीसाठी राजगृह त्याग करणारी सीता, पतीच्या माघारी मुलाला वाढवून, योग्य संस्कार करून 'हिंदवी स्वराज्याच्या स्थापने'ची प्रेरणास्त्रोत बनलेली जिजाई', राज्य रक्षणासाठी मुलाला पाठीला बांधून हाती तलवार घेणारी झाशीची राणी, परमेश्वर भक्तीमध्ये लीन होऊन कवने रचणारी मीराबाई, परपुरुषाचा स्पर्श होऊ नये म्हणून धगधगत्या आगीत स्वत:ला झोकून देऊन 'जोहर' करणारी पद्मिनी, अंतराळात झेप घेणारी कल्पना चावला, देशातल्या सर्वोच्च पदावर विराजमान होणाऱ्या प्रतिभाताई पाटील अशा एक ना अनेक उदाहरणांवरून तिने दाखवून दिलं आहे की, स्त्री ही पहिल्यांदा एक माणूस आहे, नंतर ती मुलगी, पत्नी वा माता आहे.

स्त्री मांगल्याचं प्रतीक आहे, समृद्धीचं रूप आहे, शक्ती आणि संरक्षणाचं उदाहरण आहे. जिच्यात ज्ञान व कल्पना वसते, अशी ती तेजाची माउली. सौंदर्य, शौर्याची सावली. अशा तिच्या प्रत्येक रूपाचं दर्शन घडतं नवरात्रीत. हादग्यात, झिम्मा-फुगडीत, गरबा-दांडियात तिचं 'मुक्तपणे व्यक्त होणं', जणू तिच्या स्वातंत्र्याचच द्योतक होय.

नवरात्र हा फक्त देवीच्या 'आराधने'चा उत्सव नसून तो स्त्रीत्वाच्या 'शक्तीरूपाचा'ही उत्सव आहे.

तुम्हीही तुमच्या आयुष्यातील स्त्रीत्वाचे विविध पदर आमच्यासोबत उलगडू शकता... आपले लेखन ई-मेलने खालील पत्त्यावर पाठवा.

mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखांचा अंकात समावेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून कोणत्याही एका पुस्तक खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल.

पत्रोत्तराच्या अपेक्षेत,<br>
मेहता मराठी ग्रंथजगत




# वैचारिकता आणि वाचन

यू. आर. अनंतमूर्ती यांचे काळाआड जाणे हे चटका लावून जाणारे आहे. ते ८५ वर्षांचे होते व वयोमानानुसार प्रत्येकाचे जाणे हे अपरिहार्य असते. रंगमंचावरील प्रत्येकाचा काळ, प्रत्येकाची भूमिका ही ठरलेली असते. पण अनंतमूर्ती ह्यांची भूमिका ही सामाजिक – राजकीय व राष्ट्रीय बांधणीच्या अंगानं दिशादर्शक होती. विचारप्रवर्तक होती. अशी माणसं प्रेक्षागृहातून फेकलेली अंडी, टमाटे, किंवा चपला, शिव्या असे काही असले तरी - त्यांच्या भूमिकेत, त्या भूमिकेतल्या वैचारिकतेत त्यामुळे फरक पडत नाही. शेवटपर्यंत ही माणसं प्राण पणाला लावून त्यांना जे म्हणायचं असतं, मांडायचं असतं तेच मनापासून मांडतात. कसलीही तमा न बाळगता, ह्या माणसाच्या जाण्यानं प्रेक्षागृहात शांतता पसरली ती यासाठीच...

२३ ऑगस्टच्या लोकसत्ताच्या लोकरंग पुरवणीत अरूण टिकेकर यांचा 'आजचा महाराष्ट्र आणि वैचारिकता' हा लेख वाचण्यात आला. यू. आर. अनंतमूर्ती यांच्या जाण्यामुळे जे चिंतन झालं, त्या अनुषंगानंच ह्या लेखाची मांडणी झाली असावी असं वाटून गेलं. त्यांनी विचारवंतांविषयी सुंदर उदाहरण दिले आहे, की 'एका विशिष्ट स्थितिजन्य समाजातील शांततेचा भंग करणारा विचारवंत हा मुळात समाजहितरक्षक असतो. शांत तळ्याच्या काठावर बसून तो पाण्यात दगड भिरकावतो. पाण्यावर तरंग उठतात, तसे स्थितिजन्य समाजात विचारांचे तरंग उठतात. नव्या वैचारिक प्रगतीची ती नांदी असते. हा शांतताभंग समाजाचा विचार ढवळून टाकणारा असतो.' अनंतमूर्ती हे असेच होते. समाजाच्या स्थितीजन्य तळ्यात दगड भिरकावून त्या पाण्यात विचारांचे तरंग उठवणारे, शांतताभंग करून विचारांनी समाज ढवळून काढणारे.

या अनुषंगाने मराठी साहित्य व साहित्यिक यांचा विचार होणं सहज आहे. महात्मा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून, पुढील ४०-५० वर्षे मराठी साहित्यात अशा समाजहितरक्षक साहित्यिकांची मोठी परंपराच दिसते. ताराबाई शिंदे, आगरकर, टिळक, केतकर, न्या. रानडे, राजवाडे, भांडारकर, जावडेकर, माटे, आपटे आणि त्यानंतरही विभावरी शिरूरकर, गं. बा. सरदार, आचार्य अत्रे, दुर्गा भागवत, नरहर कुरुंदकर अशी ही कितीतरी नावं सांगता येतात, की जी केवळ साहित्यिकच नव्हती, केवळ विचारवंतच नव्हती, किंवा केवळ  नुसताच विचारकलह करणारी नव्हती, तर समाजाला आपल्या विचारांनी अस्वस्थ, संवेदनशील, विचाराभिमुख बनवत असतानाच त्यांच्यात भक्कमपणा, निर्भयपणा  आणि सडेतोडपणा आणणारी होती. 'ज्या विचारांना कृतीचे अधिष्ठान नव्हे ते विचारच नव्हेत' असे मानणारी, असे समाजमनावर बिंबवणारी ही साहित्यिक, विचारवंत मंडळी होती. जी सत्तेसमोर झुकली नाहीत. कोणत्याही दांभिकतेत कधी अडकली नाहीत. त्यांची भूमिका ही कायम द्रष्ट्याची भूमिका होती आणि तसे त्यांचे साहित्य होते म्हणूनच महाराष्ट्राची ओळख ही पुरोगामी महाराष्ट्र म्हणून होऊ शकली. आजच्या समाजात जो काही आधुनिक, सकारात्मक असा बदल आपण पाहतोय, तो त्यांच्या ग्रंथांच्या, विचारांच्या पायाभरणीमुळेच. भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही सामाजिक चळवळींना प्रोत्साहन मिळाले ते अशा विचारवंतांमुळेच. फुले, शाहू, आंबेडकर किंवा स्वा. सावरकर, म. गांधी अशा विविध सामाजिक-राजकीय विचारवंतांच्या विचारांना आपलंसं करूनच इथल्या सामाजिक चळवळींना गती प्राप्ती झालेली दिसून येते, त्यांच्या विचारांच्या आधारेच इथल्या समूहाला आकार प्राप्त झाला. विचारांना प्रगल्भता आलेली दिसते.

मात्र हे सगळं झालं साधारणत: १९७० पर्यंत. त्यानंतरचं एकुणातलं आजचं मराठी साहित्यविश्व कसं आहे? तिथं विचारांची कोणती पोकळी जाणवतेय? जग प्रचंड वेगानं बदलतंय, खरं आहे. पण ते लेखणीत पकडता आलंय का? पुस्तकांची पानं तेवढ्या वेगानं हलली आहेत का? आणि याच महाराष्ट्रात एका पुरोगामी विचारवंताचा, सामाजिक बदल घडवू इच्छिणाऱ्या 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकाचा भर रस्त्यावर खून होतो. तो कसा? अशी प्रवृत्ती कशामुळं निर्माण झाली? आपला सद्सद्विवेक कोठे कमी पडतोय? सत्याचा गळा घोटण्याचा प्रयत्न तसा हा नवाही नाही, किंवा

जगभरात ही अशी भीषण उदाहरणे आहेत, पण तरीही स्वत:ला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्रासाठी ही घटना चिंताजनक आहे हेही तेवढेच खरे! खून करणारी अशी व्यक्ती बौद्धिक घटकातील असू शकते किंवा अबौद्धिक घटकातीलही. पण ती जर बौद्धिक वर्गातील असेल तर मात्र विचारवंतांपुढे ते मोठे आव्हान आहे. विचाराचा विरोध हा विचारानंच करायचा, की डोक्यात गोळी घालून याचा विवेक जर अजूनही बौद्धिक घटकाला करता येत नसेल तर आपल्या पुरोगामीत्वाचा पाया डळमळतोय, आणि तो कोणत्याही क्षणी ढासळू शकतो हे लक्षात घ्यावे लागेल अन् त्याला भक्कम करण्यासाठी विचारवंतांनीच पुढं यावं लागेल. असे लेखक, असे विचारवंत आज महाराष्ट्राला पुन्हा एकदा हवे आहेत.

मुळात वैचारिकतेचा हा प्रवाह क्षीण का होत चाललाय, याचा शोध घेतला पाहिजे. त्याचे उत्तर मराठी भाषेबद्दल, मराठी साहित्याबद्दल आपल्याला किती प्रेम आहे व तो वारसा आपण आपल्या पुढल्या पिढीला देण्यास किती समर्थ ठरलो आहोत यातही शोधता येईल.

इंग्रजी शाळांमध्ये मुलांना घालणे ही आजच्या समाजाला आजच्या काळाची गरज वाटू लागली आहे. त्याच्या मुळाशी आपली मूलं स्पर्धेच्या, जागतिकीकरणाच्या जगात मागे पडतील अशी भीती आहे. त्यामुळे जो तो इंग्रजीसाठी धडपडतोय. इंग्लिश स्पिकींगच्या क्लासेसना उत्तम दिवस आले आहेत. त्यावरची पुस्तकं, सीडीज, व्हिडीओज सगळंच मार्केट उत्तम चाललंय. पण या सर्व कोलाहलात आपण मराठी भाषेच्या गंगोत्रीला विसरतोय. इंग्रजीचं भूत एवढं डोक्यावर बसलंय, की शहरी मुलांना तर मराठी भाषा व मराठी साहित्य हे मागास, कालबाह्य वाटू लागलंय. त्यामुळे मराठी वाचनाकडं नवी पिढी आकर्षित होईल, तिथं ती वळेल असं वातावरणच नाहीय? मराठीत अभिजात अशा उत्तमोत्तम साहित्यकृती आहेत, हे आजच्या पिढीला माहितच नाहीये. तिथपर्यंत आजची पिढी पोहोचतच नाहीये. तिच्या मोबाईलवर, व्हॉटसअपवर जेवढं आणि जे-जे काही फॉरवर्ड होऊन येतं तेवढंच ती वाचते आणि त्याला ती साहित्य समजते, म्हणजे ती वाचत नाही असं नाही, तर तिच्यापर्यंत पोहोचत नाही. ते का पोहोचत नाही याचा विचार साक्षेपानं होणं गरजेचं आहे. ते पोहोचण्यासाठी प्रकाशक, वितरक, लेखक आणि संपूर्ण बुजूर्ग समाज यांनी मिळून ती आपली जबाबदारी समजून त्यावर काम केलं पाहिजे. ठरवून तशा

अद्ययावत यंत्रणा राबवल्या पाहिजेत. त्यातून मराठी पुस्तकांना वाचक मिळतील अन त्यातून लेखक घडतील. ते लेखक नव्या जगाची स्पंदनं आपल्या लेखणीतून समाजापर्यंत पोहोचवतील. तिला जगाचा वेग टिपता येणं शक्य होईल. विवेकाच्या आवाजाला सामर्थ्य प्राप्त होईल.
मुळात जागतिक भाषा म्हणून इंग्रजी शिकायला, बोलायला हरकत नाही पण मराठीला मारून नव्हे, तर मराठीचा आदर करून. तिला आणखी वैभव प्राप्त करून देता यावे म्हणून. इतर भाषांप्रती आस्था, प्रेम हे असलेच पाहिजे त्याशिवाय भाषा आणि साहित्य समृद्धी शक्य नसते, नाहीतर तो प्रवाह तुंबत जातो. त्यात नवी भर पडत नाही. यापूर्वीच्या मराठी साहित्यिकांनी इंग्रजीही तेवढंच वाचलेलं होतं, म्हणूनच त्यांना मराठीत नवे प्रयोग, नवे प्रवाह, नवे विषय, नवा विचार आणता आला. आत्ता होतंय काय, की इंग्रजी वाचली जातेय, इंग्रजी बोलली जातेय पण केवळ व्यावहारिक गरज म्हणून. व्यावसायिक उंची गाठण्यासाठीचा फंडा म्हणून. आज कोणत्याही नोकरीसाठी तुम्हाला इंग्रजी समजते का किंवा लिहिता – बोलता येते का हा प्रश्न विचारला जातो. त्यामुळे मुलं कॉन्व्हेंटपासून इंग्रजी शिकतात हे खरं आहे पण, केवळ करिअरसाठी. इतरांपेक्षा आपण इंग्रजी कसे फास्ट बोलू शकतो या स्मार्टनेससाठी. आत्मविश्वास वाढवण्यासाठी. मात्र या सर्व गोष्टींत मागे पडतेय ते साहित्याचे वाचन. वाङ्मयाभिरूची म्हणजे काय असते हे या पिढीला माहितच नाहीये. अभिजात साहित्य म्हणजे काय असतं हे कोण सांगणार या पिढीला, अशी अवस्था आहे. कारण आधीच्या पिढीच्या काळात जे साहित्यिक वातावरण होतं ते आता आहे का, तर नाही. म्हणजे पूर्वीही फार होतं असं नाही, पण पुण्यात होतं, मुंबईत होतं, मोठ्या शहरांत हे वातावरण काहीबहुत होतं. वाङ्मय-चर्चा, व्याख्याने, वादविवाद, निबंध-कथा-नाट्यलेखन स्पर्धा आणि विविध सामाजिक चळवळींनी विचारांनी दुमदुमणारं असं वातावरण होतं. ज्यातून मराठी लेखकांच्या विचारांना बौद्धिक, वाङ्मयीन असा परिपोष उपलब्ध होत होता. वैचारिकता पक्की होत होती. सत्यासाठी लढण्याचा बाणा तयार होत होता तो त्यातूनच. आता मात्र तसं दिसत नाही. परंतु आपण हे लक्षात घेतलं पाहिजे, की आजही ग्रामीण भागातून शिकणारी मुलं ही मराठी माध्यमातीलच आहेत. खूप मोठा वर्ग आजही असा आहे, की आत्ता कुठे त्यांच्या पहिल्या पिढ्या शिक्षणाच्या प्रवाहात येत आहेत आणि मातृभाषेतून मिळणारे शिक्षण हेच त्यांचे जग

बदलवणारे शिक्षण ठरणार आहे. त्यांच्यापर्यंत मराठी साहित्य पोहोचले, वाङ्मयीन वातावरण निर्माण केले तर तिथं विचारांना सुरुवात होईल.

जे शिक्षण विचार करायला शिकवत नाही, त्यासाठी उद्दीपित करत नाही, ज्या शिक्षणातून प्रश्न पडत नाहीत, त्या प्रश्नासाठी अस्वस्थता येत नाही, त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न होत नाही ते शिक्षणच नव्हे, हे आपण सगळेच जाणतो, मात्र आपण विचार करतो तो मराठीतून, आपल्याला प्रश्न पडतात तेही मराठीतूनच हे आपण का विसरतो? ही गोष्ट ग्रामीण भागातीलच नव्हे तर प्रत्येकच सूज्ञ पालकाने लक्षात घेणे गरजेचे आहे. इंग्रजी भाषा खरंच इतकी अवघड आहे का, की त्यासाठी मुलाला दुसऱ्या वर्षापासून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालावे?

आपण ज्या भाषेतून विचार करू शकतो, त्याच भाषेतून आपल्या शिक्षणाचा पाया पक्का होऊ शकतो. त्यातूनच विचारशीलतेला, सर्जनशिलतेला धुमारे फुटू शकतात. आणि हे जागतिक संशोधनातून सिद्ध झालेले असूनही आज आपण सारेच इंग्रजीचा केवळ बाऊ करून घेत इंग्रजीच्या मागं धावत आहोत. कशासाठी? याचा साकल्यानं विचार व्हावा. इंग्रजी की मराठी या गोंधळातून आपण जेवढ्या लवकर बाहेर पडू तेवढ्या लवकर पुढली पिढी इथल्या मातीत रुजेल, वाढेल व इथला विकासही करेल, कारण त्या भाषेतील वाचनातूनच भोवतालचा विचार करण्याइतकी त्याची दृष्टी प्रगल्भ झालेली असेल.




**तेनालीरामची १४ पुस्तकांची मालिका**



**चतुर तेनालीराम**

**मंजूषा आमडेकर**

**किंमत : ६०/- रु.**

**पोस्टेज : ३०/- रु.**

**६वी आवृत्ती**

# आवरण

लेखक
डॉ. एस. एल. भैरप्पा

अनुवाद
उमा कुलकर्णी

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




विस्मरणाने सत्य झाकोळून टाकणाऱ्या मायेला 'आवरण' म्हणतात. मला कळायला लागल्यापासून 'सत्य-अस्यत्याचा प्रश्न' हा छळणारा प्रश्न आहे... हीच समस्या 'आवरण' मध्ये समूह आणि संपूर्ण राष्ट्राच्या पातळीवर उफाळून आली आहे...

...मागे कुणीतरी केलेल्या चुकांसाठी आजचे जबाबदार नाहीत हे तर खरंच, पण मागच्यांशी नाते जोडून 'आपण त्यांचेच वारसदार' या भावनेत आपण अडकणार असू, तर त्यांनी केलेल्या कर्माची जबाबदारी स्वीकारावी लागेल.

इतिहासाकडून मिळवण्याइतकंच, त्याच्याकडून सोडवून घेणं हे परिपक्वतेचं द्योतक आहे. प्रत्येक धर्म, जाती आणि व्यक्तीला लागू पडणारी गोष्ट आहे ही...

– डॉ. एस. एल. भैरप्पा




## जे घडलं ते साहित्य प्रेमामुळेच : द. भि. कुलकर्णी

मराठीतील लाखो वाचकांनी व माझ्या विद्यार्थ्यांनी माझे पोषण केले. माझ्या हातून जे काही काम झाले, ते केवळ साहित्यावरील प्रेमामुळेच झाले, त्यात कोणतीही महत्त्वाकांक्षा नव्हती, असे मनोगत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

साहित्य समन्वय महासंघाच्या वतीने दभिंच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फ. मुं. शिदें यांच्या हस्ते दभिंचा गौरव करण्यात आला. ज्येष्ठ समीक्षक डॉ. नागनाथ कोतापल्ले, ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ माधवराव गाडगीळ, महासंघाचे कार्याध्यक्ष प्रमोद आडकर, प्रमुख कार्यवाह मंदा नाईक आदी या वेळी उपस्थित होते.

द. भि. म्हणाले, की माझ्या समीक्षेचे श्रेय माझे नाही. अनेक वर्षे विद्यार्थ्यांना विविधि विषय शिकवले. त्यात महत्तवाकांक्षा, ईर्षा नव्हती. प्रसिद्धी किंवा पुरस्कारांसाठी ते काम नव्हते. शब्द, साहित्य, कला हेच माझे जीवन अगदी बालपणापासूनच होते. घरातील वातावरण वाङ्मयीन होते. त्यामुळे मला वेगळी वाट शोधावी लागली नाही. त्यामुळे मला वेगळी वाट शोधावी लागली नाही. त्यामुळे मी काही वेगळे करतो, असे काहीही नाही. मी जे काही केले ते साहित्यावरील प्रेमामुळेच. शिंदे म्हणाले, की रक्तातून वाहणारे नातेवाईक दभिंनी जोडले. लेखनातील सौंदर्याची मीमांसा करणारे ते समीक्षक आहेत. सर्जनशील व मीमांसेतील सौंदर्य जाणणारे ते आहेत. त्यामुळे सौंदर्याच्या उपासकाचा हा सोहळा आहे.

कोतापल्ले म्हणाले, की दभिंचे बहुतांश लेखन सैद्धान्तिक पातळीवरील आहे. मराठीमध्ये आस्वादक समीक्षा मोठी आहे. त्या पार्श्वभूमीवर सिद्धांत मांडू पाहणारे ते समीक्षक आहेत. या सिद्धांतामुळे या समीक्षेत भर पडत

गेली. दभिं सिद्धातांच्या पातळीवर वावरतात. सगळेच चांगले लिहितात, असे सततचे म्हणणे योग्य नाही. त्यामुळे समीक्षकांनी अधून-मधून लेखकाला धोक्याचे कंदीलही दाखविले पाहिजेत. दभिंनी असे धोक्याचे कंदीलही दाखविले.

गाडगीळ म्हणाले, की साहित्याचा रसास्वाद कसा घ्यावा, हे दभिंनी मला व  अनेकांना शिकवले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक आडकर यांनी, तर सूत्रसंचालन अंजली महांगांवकर यांनी केले.

## पुण्यातील पुस्तकांच्या गॅलरी

पुस्तकांकडे आकर्षित करण्यासाठी प्रकाशक-विक्रेत्यांचा प्रयोग यामध्ये प्रामुख्याने इंटरनॅशनल बुक डेपो, पॉप्युलर प्रकाशन, अक्षरधारा बुक गॅलरी, मेहता पब्लिशिंग हाऊस, रसिक साहित्य, क्रॉसवर्ड यांचा समावेश आहे.

पुस्तक प्रकाशन, साहित्य-सांस्कृतिक विश्वाचा केंद्रबिंदू असलेल्या पुण्यात इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स, कपड्यांच्या आकर्षक दुकांनाच्या धर्तीवरच पुस्तकांच्याही आकर्षक गॅलरी साकारू लागल्या आहे. बदलत्या काळानुसार पारंपरिक पद्धतीच्या पुस्तकांची दुकानांचे स्वरूप बदलत असून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी वैविध्यपूर्ण संकल्पनांवर आधारित एअर कंडिशन गॅलरींची संख्या पुण्यात वाढताना दिसत आहे.

'मेहता पब्लिशिंग हाऊसने'ही पुस्तक विक्रीसाठी अत्याधुनिक पद्धतीने गॅलरी साकारली आहे. ''सध्याच्या धकाधकीच्या परिस्थितीत वाचकांना पुस्तकांसाठी हवा असलेला निवांतपणा देण्याची गरज आहे. वाचकांना पुस्तकासाठी निवांतपणा आणि पुस्तकांपर्यंत आणण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करण्याचीही आवश्यकता आहे. बदलत्या काळात एअर कंडिशन गॅलरी हा त्याचाच भाग आहे. शांत आणि प्रसन्न वातावरणामुळे वाचक नक्कीच पुस्तकांकडे आकर्षित होतील,'' असा विश्वास मेहता प्रकाशनच्या सुनील मेहता यांनी व्यक्त केला आहे.

बाजारपेठेत सध्या 'विंडो शॉपिंग' हा शब्द परवलीचा झाला आहे. काचेच्या चकाचक दुकांनामध्ये ठेवलेल्या वस्तू न्याहाळून आपल्या आवडीच्या वस्तूंची खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल असतो. त्याच धर्तीवर, वाचकांना पुस्तकांकडे आकर्षित करण्यासाठी प्रकाशक, पुस्तक विक्रेते पुस्तकांच्या गॅलरी तयार करण्याचा विचार करू लागले आहेत.

आकर्षक इंटेरिअर डिझाइन, एअर कंडिशन, विभागवार पुस्तकांची केलेली मांडणी हे या गॅलरींमधील वैशिष्ट्य आहे. पुस्तकांची गॅलरी साकारण्यामागे अतिशय शांत वातावरणात वाचकांनी त्यांना हवे असलेले पुस्तक चाळून त्यांची खरेदी करावी असा उद्देश असल्याचे विक्रेत्यांकडून सांगितले जाते.

## गाणेच आमचे 'व्हिजिटिंग कार्ड' : संगीतकार अजय-अतुल

आपले प्रत्येक गाणे पहिलेच गाणे आहे आणि कदाचित शेवटचेही गाणे आहे, याचा विचारातून आतापर्यंत काम केले. आमचे गाणे हेच आमचे व्हिजिटिंग कार्ड आहे, अशी भावना संगीतकार अजय-अतुल यांनी व्यक्त केली.

चंदावरकर कुटुंबीय आणि आशय सांस्कृतिक यांच्यातर्फे ज्येष्ठ संगीतकार पं. भास्कर चंदावरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात समीरण वाळवेकर यांनी अजय-अतुल यांच्याशी संवाद साधला. पं. चंदावरकर यांनी लिहिलेल्या चित्रपटसंगीतविषयक लेखांचे पुस्तक लवकरच प्रकाशित होणार असल्याची माहिती ज्येष्ठ दिग्दर्शक अरुण खोपकर यांनी दिली. यातील हिंदी आणि इंग्रजी लेखांचा अनुवाद डॉ. अरविंद थत्ते यांनी केला आहे.

शब्दांचा संगीतकाराने केलेला विचार करणे महत्त्वाचे असल्याचे सांगत 'सख्या रे घायाळ मी हरिणी' रचना करणे शक्यच होणार नाही, अशा शब्दांत अजयने चंदावरकर यांच्या संगीतकार्याची स्तुती केली. 'मानवी रांगडेपणा, शालीनता, उत्स्फूर्तता आणि गांभीर्य' हे सारे लोकसंगीतामध्ये असते. यामध्ये वसंत पवार, राम कदम या गुरूंचे काम पुढे नेण्याचा प्रयत्न आहे. मराठी संगीत सातासुमद्रापार गेल्याचा आनंद वाटतो. लोकसंगीताचा बाज असलेल्या गाण्यांवर सध्या चित्रपट संगीत बेतले आहे. त्यामुळे मराठी गाणी जशीच्या तशी हिंदी चित्रपटात घेतली जाणे ही भाग्याची गोष्ट असल्याचेही त्याने सांगितले. पंजाबी ठेकाच माहीत असलेल्या हिंदी चित्रपटांना आता आमची गाणी हवी आहेत. मराठी गाणीच हिंदीत विकतो असा ठपका आमच्यावर ठेवला जाऊ शकतो. हिंदीतील संगीतकार त्यांच्या गाण्यांत ढोलाचा वापर करतात हे मराठीचेच यश आहे. 'फिल हार्मनिक ऑर्केस्ट्रा'च्या माध्यमातून मराठी आणि हिंदी गाणी करायची असून नाट्यसंगीत, शब्दांविना संगीताचा कार्यक्रम, संपूर्ण हरिपाठ करण्याचेही मनात असल्याचे

अतुलने सांगितले.

आताच्या तंत्रज्ञानाच्या जमान्यात जुन्या वादकांनी वादन करणे सोडून दिले आहे. परंतु या वादकांचे ऋण व्यक्त करण्यासाठी आम्ही त्यांना वादनासाठी बोलावतो. त्यासाठीच गाणी भव्यदिव्य करण्याचा आग्रह धरतो. त्यांच्या आशीर्वादाने गाण्याला चार चाँद लागतात. 'कमी तिथे आम्ही' या उक्तीनुसार आम्ही गायक झाल्याची भावनाही अजय-अतुलने व्यक्त केली.

## सिंग यांचे खरे व्यक्तिमत्त्व साकारण्याचा प्रयास : बारु

''देशाचा पंतप्रधान हा कधीच विनोदाचा विषय होऊ शकत नाही; पण नव्या पिढीकडून डॉ. मनमोहन सिंग यांची मोठ्या प्रमाणात खिल्ली उडवली गेली. ही खिल्लीच मला 'द ॲक्सिडेन्टल प्राइम मिनिस्टर' हे पुस्तक लिहिण्यासाठी प्रेरणा देऊन गेली. यातून डॉ. सिंग यांचे खरे व्यक्तिमत्त्व लोकांसमोर आणण्याचा मी प्रयत्न केला...'' अशा शब्दांत या पुस्तकाची जन्मकथा उलगडत होते पुस्तकाचे लेखक खुद्द संजय बारु.

लोकसभा निवडणुकीच्या ऐन प्रचारादरम्यान पंतप्रधानांचे माध्यम सल्लागार (माजी) असलेल्या बारु यांचे 'द ॲक्सिडेन्टल प्राइम मिनिस्टर' हे पुस्तक प्रकाशित झाले. डॉ. सिंग यांच्यावरील टीकेमुळे हे पुस्तक बहुचर्चित ठरले. हे पुस्तक आता 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने मराठीत आणले असून, त्याचे प्रकाशन बारु यांच्याच हस्ते झाले. या वेळी माजी सनदी अधिकारी राम प्रधान, अनुवादक लीना सोहनी, ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित, प्रकाशक सुनील मेहता उपस्थित होते.

बारु म्हणाले, ''हे पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर यावर सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी चर्चा झाली. काहींनी कौतुकही केले; पण याची निर्मिती कशी आणि कोठून झाली, हे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. माध्यम सल्लागार या नात्याने मी सुरुवातीपासून प्रत्येक घटनेची नोंद करत होतो. त्याचा उपयोग पुस्तक लेखनासाठी झाला. जी तरुणाई उद्याच्या निवडणुकीत मतदान करणार आहे, तिला डॉ. मनमोहन सिंग समजावेत म्हणून हे पुस्तक मी त्यांच्यासमोर आणले.

देश एकसंध ठेवण्यात तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे मोठे योगदान आहे; पण राहुल गांधी यांना पंतप्रधान करण्याचा काँग्रेस पक्षाचा 'अजेंडा' हाच डॉ. सिंग यांना मारक ठरला.'' असेही बारु म्हणाले.

प्रधान म्हणाले, ''राजकीय व्यक्ती आणि राजकारण याबद्दल अनेकांना उत्सुकता असते; पण पडद्यामागे नेमक्या कोणत्या घटना सुरू आहेत हे सामान्यांना कळू दिले जात नाही. या पार्श्वभूमीवर, या पुस्तकाला वेगळे महत्त्व आहे. डॉ. मनमोहन सिंग यांचे व्यक्तिमत्त्व या पुस्तकाचा खरा गाभा आहे. ते मोठे अर्थतज्ज्ञ आहेत, अभ्यासक आहेत; पण त्यांच्यात निर्णयक्षमतेचा अभाव हा एकमेव दोष आहे. अशा मितभाषी व्यक्तीबद्दल लिहिणे हे एक कठीण काम आहे.'' या पुस्तकातील बऱ्याच गोष्टींचे स्पष्टीकरण मी माझ्या 'इअर्स विथ राजीव अँड सोनिया' या आगामी पुस्तकात केलेले आहे. ते लवकरच प्रकाशित होईल, असेही ते म्हणाले.

'बारु यांच्या पुस्तकाकडे केवळ राजकीय चश्म्यातून न पाहता, यूपीए सरकारची धोरणे, संघर्षाचा ऊहापोह म्हणून पाहिले पाहिजे. एका महानायकाची शोकांतिका असे याला म्हणता येईल,' असे ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित म्हणाले.

आपले मनोगत व्यक्त करताना अनुवादिका लीना सोहनी म्हणाल्या, 'या पुस्तकाच्या अनुवादासाठी मला दोन महिन्यांचा अवधी देण्यात आला होता. या अवधीत मी हे काम पूर्ण करू शकले, याचा मला मनस्वी आनंद होत आहे.'

मेहता पब्लिशिंग हाऊसचे प्रकाशक श्री. सुनिल मेहता म्हणाले, 'यूपीए सरकारच्या काळात पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी आणि त्यांच्या कार्यालयाने जे काही निर्णय घेतले, त्याचे परिणाम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सर्व जनतेवर झाले. त्यावर उलटसुलट चर्चाही झाल्या. मात्र संजय बारु यांनी त्यांच्या पुस्तकामध्ये उथळ चर्चांना वाव न देता अथवा पंतप्रधानांचे कोठे चूक की बरोबर या मुद्द्यांवर चर्चाही न करता त्यांना आघाडीचे सरकार सांभाळताना कोणती कसरत करावी लागली, कोणकोणत्या दबावाखाली काम करावे लागले, याचे वास्तव दर्शन आपल्यासमोर मांडले आहे.'

'सर्वसामान्य जनता ज्या गोष्टीचे अंदाज बांधते, त्याच गोष्टींमागील सत्य आपल्याला वाचायला मिळते, ते केवळ श्री. बारु यांच्यामुळेच.'

## पंढरीची वारी 'ऑक्सफर्ड'मध्ये

परदेशी पाहुण्यांसाठीही अपूर्वाईची असणारी 'पंढरीची वारी'ची माहिती पुण्यातील आरती पाटील व सुषमा शर्मा यांनी नुकतीच शब्दरूपाने

ऑक्सफर्ड विद्यापीठात उलगडून दाखवली.

आषाढी कार्तिकीला नेमाने पंढरीकडे जाणारी वारी मराठी संस्कृतीची ओळख झाली आहे. अमेरिकेच्या ऑक्सफर्ड विद्यापीठातील मॅन्सफिल्ड महाविद्यालयातर्फे आयोजित 'ग्लोबल कॉन्फरन्स ऑन पिलग्रिमेज अँड बियाँड' या विषयावरील चर्चासत्रात भारताचे प्रतिनिधित्व करताना वारीतील भक्तिपरंपरेतील महती पाटील व शर्मा यांनी तेथील सर्वांना सांगितली.

पाटील म्हणाल्या, ''माझे वडील अनंत पाटील सध्या ८४ वर्षांचे असून, त्यांनी सलग २८ वेळा पायी वारी केली आहे. तीच परंपरा पुढे सुरू ठेवत मी गेली सात वर्षे वारी करत आहे. मी 'पीस बियाँड पिलग्रिमेज' या शीर्षकाचा प्रबंध सादर केला तेव्हा वारीचे भव्य स्वरूप समजल्यावर सगळेच उपस्थित भारावून गेले. काही लाख लोक स्वयंस्फूर्तीने एकत्र जमतात, पंढरपुरातील लोक त्यांची व्यवस्था पाहतात, हे त्यांना आश्चर्यचकित करणारे होते. जागतिक पातळीवर वारीचे माहात्म्य पोचवता आले याचा मनस्वी आनंद आहे.''

जपान, चीन, सौदी, अरेबिया, इराणसह ३० देशांतील प्रतिनिधी आपापल्या देशातील यात्रांची माहिती देण्यास परिषदेत आले होते, असेही पाटील यांनी सांगितले.

## आचार्य अत्रे जयंती साजरी

पुणे दि.१३ ऑगस्ट २०१४ कथाभारती तर्फे आचार्य प्र.के. अत्रे यांची ११६वी जयंती माधव सभागृह, रमाबाई आंबेडकर मार्ग, पुणे १ येथे उत्साहात साजरी करण्यात आली. श्री. भास्कर रबडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या प्रसंगी अत्रे साहित्याचे अभ्यासक प्राचार्य श्याम भुर्के म्हणाले - ''अष्टपैलू हे विशेषण कमी पडेल असे आचार्य अत्रे यांचे व्यक्तीमत्त्व होते. शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, लेखक, कवी, विडंबनकार, नाटककार, नट, चित्रपटकथा लेखक, चित्रपटकार, कीर्तनकार, वृत्तपत्र संपादक, पत्रकार, वक्ता, विनोदकार, राजकारणी या क्षेत्रांना त्यांनी केवळ स्पर्श केला नाही. तर त्यांनी त्या क्षेत्रातली शिखरे गाठली. पण त्यांचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांना सर्वसामान्यांबद्दल कळवळा होता. सर्व सामान्यांच्या दु:खाना त्यांनी मराठा मधून वाट करून दिली. कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांचा ड्रायव्हर गेला तेव्हा त्याच्यावर अग्रलेख लिहिला.

खंडाळ्याच्या रामण्णा चहावाल्याच्या व्यवसायास प्रोत्साहन दिले. क्रिकेटप्रेमी बाबू टांगेवाल्याचे अग्रलेख लिहून अभिनंदन केले. प्रथम फिरता नाट्यरंगमंच तयार करणाऱ्या म्हादबा मेस्त्रिंना यंत्रमहर्षी पदवी बहाल केली. बाबा कदमांच्या कादंबरीवर मराठात लेख लिहून त्यांच्या साहित्याची ओळख सर्व मराठी वाचकांना करून दिली. त्यांनी पुण्यावर मनापासून प्रेम केले. शिक्षणक्षेत्रात १८ वर्षे काम करून शिक्षण संस्कारक्षम बनविले. नवयुगमाला विद्यार्थीप्रिय केली. पुण्यातील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण केले. बससेवा सुरू केली. संभाजी उद्यान, जिजामाता उद्यान निर्माण केले. प्राथमिक शिक्षकांसाठी गांधी ट्रेनिंग कॉलेज काढले. रे मार्केटला महात्मा फुले मंडई नाव ठेवले. भांबुर्ड्याला शिवाजीनगर नाव दिले. मराठीत विपुल, दर्जेदार साहित्य निर्माण केले. त्यांचे कार्य आणि साहित्य आजही प्रेरणादायी आहे.

## रिशांकची प्रेरणादायी कहाणी

सांताक्रूझच्या मुख्य अंतरापासून काही अंतरावर यशवतंनगर झोपडपट्टीत रिशांक देवाडिगा (२२) राहतो. प्रो-कब्बड्डी लीगमधील ‘यू मुंबा’ या संघातर्फे लिलावात रिशांकला सव्वा पाच लाख रुपयांचे घसघशीत मानधन मिळणार आहे. रिशांक आपल्या वाईट दिवसांविषयी म्हणतो, ‘घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे बारावी पास झाल्यावर मी लीला हॉटेलमध्ये वेटरची नोकरी पत्करली. सुटीच्या दिवशी कबड्डी खेळायचं, असा शिरस्ता मात्र मी आवर्जून जपला आहे. उपनगरातील एका सामन्याप्रसंगी माझा खेळ प्रताप शेट्टी यांच्या नजरेत भरला. मग त्यांच्याच मार्गदर्शनाखाली माझा कबड्डीचा प्रवास सुरू झाला. मग ठाण्यातील एका स्पर्धेत प्रशिक्षक राजेश पाडावे यांनी मला देना बँकेकडून शिष्यवृत्ती स्वरूपात कबड्डी खेळण्याचा प्रस्ताव ठेवला. पाच हजार रुपये मानधन आणि खेळायची आवड यामुळे हा प्रस्ताव मी त्वरित स्वीकारला. कबड्डी खेळून आयुष्याचे चीज होते का हे पाहू, असा निर्धार केला.’

गेली तीन वर्षे रिशांक राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत खेळतो आहे. तसेच तो महाविद्यालयीन शिक्षणही पूर्ण करीत आहे. सध्या भारतीय संघाच्या विशेष प्रशिक्षण शिबिरातसुद्धा त्याला स्थान देण्यात आले आहे. याचप्रमाणे भारत पेट्रोलियममध्येसुद्धा त्याला नोकरी मिळाली आहे. आता ‘प्रो-कबड्डी’मुळे कबड्डीवरचा त्याचा विश्वास सार्थ ठरला आहे. झोपडपट्टीतून एका सुस्थित

परिसरात रिशांकने आता भाडेतत्त्वावर घर घेतले आहे. लवकरच कुटुंबीयांना स्वत:च्या मालकीच्या घरात घेऊन जाण्याचा त्याचा मानस आहे.

## ‘कारगिल’ दिनानिमित्त शहिदांना आदरांजली

कारगिल विजय दिनानिमित्त लष्कराच्या दक्षिण क्षेत्रातर्फे घोरपडी येथील नॅशनल वॉर मेमोरिअल येथे शहीद जवान आणि अधिकाऱ्यांना अभिवादन करण्यात आले.

दक्षिण क्षेत्राचे प्रमुखाधिकारी लेफ्टनंट जनरल अशोक सिंग यांनी वॉर मेमोरियल येथे पुष्पचक्र अर्पण करून शहीद जवानांना आदरांजली अर्पण केली. लष्कराच्या बँडपथकानेही शहिदांना मानवंदना दिली. पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंट परिसरातील लष्काराचे अधिकारी, जवान या वेळी उपस्थित होते. ‘पाकिस्तानी सैन्य आणि घुसखोरांनी १९९९ मध्ये लडाख येथील कारगिल परिसर ताब्यात घेतला होता. त्यांचा यशस्वी मुकाबला करत भारतीय जवानांनी हा परिसर पुन्हा भारताच्या ताब्यात आणला. या विजयाची स्मृती म्हणून ‘कारगिल विजय दिवस’ पाळण्यात येतो. खूप उंचीवर लढल्या गेलेल्या या युद्धात भारताचे ५२७ जवान शहीद झाले होते.

## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे तळजाई टेकडीवर वृक्षारोपण

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येच्या तपासामध्ये प्लँचेटचा वापर करण्यासंदर्भातील वाद पोलिस दलात घोंगावत असताना गृहमंत्री आर. आर. पाटील यांना अंधश्रद्धेसंदर्भातील अनेक धडे मिळाले. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे आयोजित वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन या कार्यक्रमानिमित्त प्रतिष्ठानाच्या हजारो कार्याकर्त्यांनी या वेळी टेकडीवर सुमारे लाखभर वृक्षाचे रोपण केले. तसेच वर्षभर त्याची निगा राखण्याचेही ठरवण्यात आले. या कार्यक्रमात आर. आर. पाटील यांनीही वृक्षारोपण केले. काँग्रसचे प्रवक्ते अंकुश काकडे आदी या वेळी उपस्थित होते. सुभाष व उषा जगताप यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

‘कायदा-नियमांमुळे समाज चालत असला तरी त्यामधील खरा अर्थ टिकून राहण्यासाठी नैतिकता आवश्यक आहे तसेच समाज तोडण्याच्या कारवाया सुरू असताना समाज जोणारे धर्माधिकारी प्रतिष्ठान व

लाखो कार्यकर्ते मोलाची भूमिका बजावत आहेत.' असा गौरव पाटील यांनी केला.

## जीएंच्या कथांची हृद्य आठवण

जी. ए. कुलकर्णी यांच्या जन्मदिनानिमित्त अभिवाचनाचा कार्यक्रम पुण्यात रंगला. महाराष्ट्र साहित्य परिषद आणि जी. ए. कुलकर्णी कुटुंबियांतर्फे ज्येष्ठ कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून कथा अभिवाचनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी 'एका देवाचा मृत्यू' या जीएंच्या कथेचे अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने अभिवाचन केले. कार्यक्रमात डॉ. विलास साळुंके यांनी जीएंच्या कथांचा इंग्रजीमध्ये अनुवाद केलेल्या 'शॅडोज इन दि डेझर्ट- विदूषक ॲण्ड अदर स्टोरीज' या संग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित यांच्या हस्ते झाले. या वेळी जीएंच्या भगिनी नंदा पैठणकर, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य उपस्थित होते. या वेळी अजय जोशी यांनी 'बळी' या इंग्रजी अनुवादित कथेचे अभिवाचन केले.

''अनुवाद अचूक आणि निर्दोष असण्यापेक्षाही तो वाचनीय असावा याची दक्षता घेतली पाहिजे. 'पाणमाय' आणि 'स्वामी' या जीएंच्या कथांचा अनुवाद केल्यानंतर त्या प्रा. ग. प्र. प्रधान सरांना वाचनासाठी दिल्या. जीएंच्या आशय आणि शैली अनुवादामध्ये आणण्यात तुला यश आले आहे, असा अभिप्राय प्रधान सरांनी दिला होता,'' असेही साळुंके यांनी सांगितले.

बेळगाव येथील लोकमान्य ग्रंथालयात जीए स्मृतिदालन साकारण्यात आले आहे. तेथे जीएंच्या जन्मदिनी झालेल्या कार्यक्रमात मी बाबूअण्णाचे दोन कोट आणि त्याचा प्रसिद्ध काळा चश्मा या वस्तू भेट दिल्या आहेत, असे नंदा पैठणकर यांनी सांगितले.

## ज्ञानपूजक : प्राचार्य शिवाजीराव भोसले

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वामुळे संपूर्ण महाराष्ट्र त्यांना आपलं दैवत मानायचा. ते एक आधुनिक संत किंबहुना योगी होते. ज्ञानसाधनेची प्रचंड तपस्या केल्यामुळे ते एक तपस्वी बनले.

वाणी आणि लेखणी यांच्या माध्यमातून धर्मजागृती करणारे आणि

समाजाला आत्मपरीक्षण करायला लावणारे अनेक तत्त्वचिंतक मराठी समाजाला लाभले. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, चोखोबा, बहिणाबाई, जनाबाई या त्या काळातल्या संतांपासून अशा मार्गदर्शकांची परंपराच सुरू झाली.

एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांतही हेच मार्गदर्शन आधुनिक भाषेत करणारे रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, राधाकृष्णन यांच्यापासून सोनोपंत दांडेकर आणि गुरुदेव रानडे यांनीही केले. या सर्व द्रष्टेपणा लाभलेल्या पंक्तीत प्राचार्य शिवाजीराव भोसले यांना आदरपूर्वक बसवावेसे वाटते, असे त्यांचे शिष्य प्रा. मिलिंद जोशी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.

शिवाजीराव अनेक वर्षे प्राचार्य होते. कुलगुरूही होते. ते उत्तम वक्ते होते. ते सोप्या आणि सुबोध भाषेत श्रोत्यांना अंतर्मुख करून विचार करायला लावत; पण एवढाच त्यांच्या कर्तृत्वाचा परीघ नव्हता. शिवाजीराव या बदलत्या काळाचा यथायोग्य परामर्ष घेत जाणारे नारायणीय परंपरेतले आचार्य होते.

प्राचार्य शिवाजीराव भोसलेंनी प्रामुख्याने धर्मजागृतीचा आपल्या वाणीतून आणि लेखणीतून यज्ञ केला. युगानुयुगे प्रत्येक पिढीत अज्ञानाने ज्ञानाचा बळी घेतला आहे. अंधाराने प्रकाश गिळून टाकण्याचाही चमत्कार केला आहे. स्वार्थाने परमार्थावर कुरघोडी केली आहे. समाजाचा आणि व्यक्तीचा प्रवास भलत्या वाटेने चाललेला पाहून त्या त्या काळातील संतांनी वणवण हिंडून प्रबोधन केले. आहे. आपला प्रवाह जीवात्म्यापासून शिवात्म्याकडे होण्यासाठी, तिमिरातून तेजाच्या दिशेने होण्यासाठी दिसून येणारी तळमळ शिवाजीरावांच्या भाषणांमधून आणि लेखनांमधून दिसून येते.

आज शिवाजीराव आपल्यात नाहीत; पण महाराष्ट्रातील अग्रगण्य वक्ते आणि त्यांचे शिष्य प्रा. मिलिंद जोशी आपल्या गुरूंच्या स्मृती जपण्यासाठी आपल्या दिलेल्या वरील व्याख्यानातून, सेवेतून आणि स्मृती समितीच्या माध्यमातून अनेक उपक्रमांतून कार्यरत असल्याचे दिसून येत आहेत.

## पुष्पा भावे यांचा भावस्पर्शी गौरव

प्राध्यापक असूनही सामाजिक चळवळीपासून ते अंधश्रद्धा निर्मूलन

समितीपर्यंत पुढे सामाजिक कृतज्ञता निधीपर्यंत विविध उपक्रमांमध्ये सक्रिय असणाऱ्या प्रा. पुष्पा भावे यांच्या समर्पित जीवनकार्याचा गौरव करण्यात आला.

पुष्पाताई या केवळ लेखिका, समीक्षक नाहीत, तर त्या पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीच्या खंद्या पुरस्कर्त्या आहेत. सामाजिक कृतज्ञता निधीच्या त्या अध्यक्षही आहेत. डॉ. बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात पुष्पाताई यांचा गौरव करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, प्रा. सुभाष वारे, राजन अन्वर आणि पत्रकार निखिल वागळे या वेळी उपस्थित होते.

बाळ यांनी पुष्पाताईंचे सामाजिक कार्य आणि त्यांच्या सहवासातील आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या ''पुष्पाताईंना सुरवातीपासूनच राजकारणाचे आकलन असून त्या राजकारणात कधी गेल्या नाहीत. अन्यायाच्या विरोधात लढताना आलेल्या संकटांना सामोरे जाण्याची त्यांची जिद्द इतरांसाठी नेहमी प्रेरणादायी ठरली आहे.''

वागळे म्हणाले, ''पुष्पाताई या व्यक्ती नाही, तर तो एक विचार आहे. तडफ, निर्भयता हा त्यांच्या स्वभावातील प्रकृतीचा भाग आहे.''

## 'पुरुषोत्तम'ची सुवर्णझळाळी

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या महत्त्वपूर्ण असलेल्या 'पुरुषोत्तम करंडका'ची सुवर्णझळाळी लघुपटातून उजळली आहे. या स्पर्धेची महती उलगडणारा २० मिनिटांचा लघुपट प्रथमेश इमानदार या युवकाने दिग्दर्शित केला असून पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचा हा दृक-श्राव्य इतिहास आता लवकरच एक तासाच्या लघुपटामध्ये बंदिस्त होणार आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेतर्फे पुरुषोत्तम करंडक ही आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. हे निमित्त साधून कलोपासकांसाठी मॉन्सून विंड्स मीडिया अँन्ड एन्टरटेन्मेंट्सने या लघुपटाची निर्मिती केली आहे. कलोपासकांच्या सुवर्णमहोत्सवी मेळाव्यात हा लघुपट पाहताना अनेकांनी जुन्या आठवणी नव्याने जागविल्या. या लघुपटावरूनच आता एक तास लांबीचा लघुपट तयार करण्यात येणार असल्याची माहिती प्रथमेश इनामदार याने दिली.

'नॉस्टेल्जिच्या पुरूषोत्तम'चा या सदरांतर्गत डॉ. मोहन आगाशे, डॉ. जब्बार पटेल, सतीश आळेकर, राहुल सोलापूरकर, मृणाल कुलकर्णी, अभिराम भडकमकर, सुबोध भावे यांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यामुळे या स्पर्धेविषयीचा माझा अभ्यास पक्का झालेला होता. यंदाच्या महाअंतिम फेरीदरम्यान राज्यभरातील सोडतीनशे विद्यार्थ्यांशी संवाद साधता आला. मयूर देशमुख या मित्रामुळे कुणाल श्रीगोंदेकर या कॅमेरामन मित्राने चार दिवस स्पर्धेचे चित्रीकरण केले. सतीश राजवाडे, सुप्रिया विनोद आणि प्रसाद वनारसे या महाअंतिम फेरीच्या परीक्षकांसह योगेश सोमण, प्रकाश पारखी, माधव अभ्यंकर, विवेक लागू, रंगरभूषाकार प्रभाकर भावे, कलोपासक संस्थेचे राजन ठाकूरदेसाई आणि राजेंद्र नांगरे यांच्या मुलाखतींचा समावेश आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट्य, शिस्त, भावी आयुष्यातील महत्त्व यांसह भविष्यातील मुलांना मार्गदर्शन व्हावे हाच या लघुपटाचा उद्देश होता. नव्याने करण्यात येणाऱ्या एक तासाच्या लघुपटामध्ये काही महत्त्वाच्या एकांकिकांचे काही अंश आणि कलाकारांच्या छोटेखानी मनोगतांचा समावेश आहे.'

## सर्वांत मोठ्या मराठी शब्दकोड्याचा मान पुण्याला

मराठीतील सर्वांत मोठे शब्दकोडे तयार करण्याचा मान पुण्यातील मनोरमा शिंत्रे यांना मिळाला आहे. त्यांच्या विक्रमाची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'ने घेतली असून त्यांच्या नावावर विश्वविक्रमाची नोंद झाली आहे.

शिंत्रे यांनी तयार केलेल्या शब्दकोड्यात १६ हजार २५० चौकटी आहेत. त्यामध्ये पाच हजार ८५९शब्दांचा समावेश आहे. आडव्या शब्दांची संख्या २९४५ आहे. २९१४ उभ्या शब्दांचा समावेश कोड्यात केला आहे. केवळ ११ महिन्यांच्या कालावधीत हे कोडे तयार केले आहे.

या विक्रमाविषयी शिंत्रे म्हणाल्या, ''आवड म्हणून शब्दकोडे तयार करीत होते. हा छंद जाणीवपूर्वक जोपासला. त्यातूनच मोठे शब्दकोडे तयार करण्याची कल्पना सुचल्यावर त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आणि ११ महिन्यांच्या परिश्रमानंतर हे शब्दकोडे तयार झाले. माझ्या हातून असे काही घडेल, यावर विश्वास बसत नाही, या कामाची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याचा विशेष आनंद झाला आहे. आमच्या घरात शब्दकोडे सोडविणे, हा गुण आनुवंशिक आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.'' या शब्दकोड्यात इतिहास, भूगोल, मराठी, विज्ञान या सारख्या विषयातील

शब्दांचा वापर केला असल्याचेही त्यांनी सांगितले.

## बिंद्राचा सुवर्णवेध

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या पहिल्या दिवशी भारताने सात पदकांची कमाई केल्यानंतर शुक्रवारी दुसऱ्या दिवशी भारतीय खेळाडूंनी पदकांवरील हक्क कायम ठेवण्यात यश मिळवले. शेवटची राष्ट्रकुल स्पर्धा खेळणारा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नेमबाज अभिनव बिंद्राने सुवर्णपदकावर नाव कोरत भारताच्या खात्यात तिसऱ्या सुवर्णपदकाची भर घातली आहे. नेमबाजीत मलाइका गोयल हिने रौप्यपदकावर तर वेटलिफ्टिंगमध्ये संतोषी मत्सा हिने कांस्यपदकावर नाव कोरत भारतासाठी दुसरा दिवस संस्मरणीय ठरवला.

## ज्येष्ठ व्यंग्यचित्रकार 'शि. द. फडणीस' नव्वदीत

'व्यंग्यचित्र म्हणजे राजकीय टीकाचित्र असाच अनेकांचा गैरसमज आहे. निखळ आनंद देण्याबरोबरच शैक्षणिक आणि सामाजिक विषय मांडण्यासाठी हे माध्यम हाताळण्याचा प्रयत्न मी केला. चित्र पाहणाऱ्या चेहऱ्यावर झळकलेले स्मितहास्य हाच माझा कृतार्थतेचा आनंद आहे. सुरुवातीला ही पाऊलवाट होती, पण आता नव्या पिढीतील काही व्यंग्यचित्रकार हे केवळ राजकीय टीकाचित्रांपुरतेच मर्यादित न राहता वेगवेगळे विषय चित्रांतून मांडत असल्याने हा रस्ता प्रशस्त होत आहे. एका अर्थाने व्यंग्यचित्राचा कॅनव्हास मोठा झालाय ...' अशी ज्येष्ठ व्यंग्यचित्रकार शि. द. फडणीस यांनी ही भावना व्यक्त केली.

व्यंग्यचित्रांच्या माध्यमातून गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ निखळ आनंद वाटणारे शि. द. फडणीस यांनी वयाच्या ९०व्या वर्षात पदार्पण केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कोशाध्यक्ष सुनील महाजन यांनी पुष्पगुच्छ देऊन फडणीस यांचे अभीष्टचिंतन केले. ''शंकर, आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे माझे आवडते राजकीय टीका चितारणारे व्यंग्यचित्रकार. केवळ व्यंग्यचित्र चितारूनच बाळासाहेब थांबले नाहीत, तर 'मार्मिक' या व्यंग्यचित्र साप्ताहिकाच्या माध्यमातून त्यांनी राजकीय पक्ष जन्माला घातला. सुरुवातीच्या काळात 'सोबत', 'माणूस' यांच्यासाठी मी राजकीय व्यंग्यचित्रे केली,'' असे सांगून फडणीस म्हणाले, ''व्यंग्यचित्रांमध्ये मी शब्द वापरत

नाही. शब्दविरहित चित्रांमुळेच मी राज्याबाहेर पोहोचू शकलो असे वाटते. रेषेच्या आकारामधील ताकद हेच व्यंग्यचित्रांचे बलस्थान आहे. कोणत्याही गायकाला शास्त्रीय संगीताची बैठक असावी लागते. त्याप्रमाणेच व्यंग्यचित्रकारासाठी चित्रकलेचा पाया भक्कम असावा लागतो. या हस्तकलेची वाट चित्रकलेतूनच जाते. शब्दापेक्षा चित्राचा वेग अधिक असतो. या सामर्थ्यांची जाण असल्यामुळेच आचार्य अत्रे आणि बाळासाहेब ठाकरे यांनी प्रखर टीका करण्यासाठी लेखणीबरोबरच कुंचला हाती घेतला. निरक्षरापर्यंतही चित्र झटकन पोहोचते, ही या माध्यमाची ताकद आहे. त्याची प्रचिती मी अनेकदा घेतली आहे. शंवाकि (शं.वा. किर्लोस्कर) हे संपादक असूनही व्यंग्यचित्र काढण्यामध्ये धन्यता मानत, दीनानाथ दलाल, शंकर आणि मरिओ मिरांडा हे माझे आवडते कलाकार होते. मात्र, त्यांच्यापैकी कोणाचे अनुकरण करावेसे वाटले नाही. व्यंग्यचित्रामध्ये अडकून पडल्याने चित्रकला आणि निसर्गचित्रकला यासाठी वेळ देत आला नाही. कलेची दृष्टी, कल्पकतेचे सृजन कलाकाराजवळ हवेच. संगणक हा 'मॅजिक ब्रश' आहे,'' असेही फडणीस यांनी सांगितले.

## ज्ञानेश्वरमहाराजांच्या विराण्यांची प्रचिती

संत ज्ञानेश्वरमहाराजांच्या विराण्यांतून प्रत्येकाला वेगवेगळ्या अर्थांची प्रचिती येते. ज्ञानेश्वरांइतका प्रतिभावंत त्यांच्या नंतरच्या कालखंडात कोणी झालाच नाही. आपल्या कलेद्वारे प्रत्येकाला भावणारा अर्थ प्रतीत करू शकणाराच खरा प्रतिभावंत कलाकार असतो, अशी भावना ज्येष्ठ संगीतकार गायक पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केली.

गानवर्धन, पुणे विद्यापीठाचे ललित कला केंद्र गुरुकुल आणि भीमसेन जोशी अध्यासनातर्फे आयोजित मुक्त संगीत चर्चासत्राचे उद्घाटन पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते झाले. भेंडीबाजार घराण्याच्या ज्येष्ठ गायिका डॉ. सुहासिनी कोरटकर यांच्याशी 'भाव भक्ती रस' या विषयावर झालेल्या संवादातून पं. मंगेशकर यांनी निर्गुण भक्तीचे संगीताशी असलेले नाते उलगडले. ज्येष्ठ संगीतकार प्रभाकर जोग, ज्येष्ठ संगीत समीक्षम मा. कृ. पारधी, डॉ. शुभांगी बहुलीकर आणि संस्थेचे अध्यक्ष कृ. गो. धर्माधिकारी या वेळी उपस्थित होते.

पं. मंगेशकर म्हणाले, अभंग, विराण्या आणि काव्याला स्वरबद्ध

करताना संत ज्ञानेश्वर यांच्या वाङ्मयाचा अभ्यास झाला. गो. नी. दांडेकर, प्राचार्य राम शेवाळकर, शांता शेळके, शंकर वैद्य यांच्यासारख्या प्रतिभावंताकडून या काव्याचा अर्थ जाणून घेतला.

कोणतीही कला मेहनतीशिवाय साध्य करता येत नाही. त्यामुळे काव्य स्वरबद्ध करता येत नाही. त्यामुळे काव्य स्वरबद्ध करताना त्यातील अर्थाच्या छटा रसिकांपर्यंत पोहोचविण्यासाठीचे प्रयत्न हा आवडीचा भाग झाला. मोठ्या व्यक्तीकडून आपल्याला न समजणारे जाणून घेण्याची वृत्ती युवा पिढीमध्ये वाढली पाहिजे. गुरू हा देहातीत असतो. त्यामुळे संगीत साधना करताना कुठे अडलो तर पाठीशी असलेले गुरू मार्ग दाखवितात. त्यांच्याकडून प्रेरणा मिळते.

'नित दिन बरसत नैन हमारे', 'अवचिता परिमळू', 'घर थकलेले संन्यासी', 'आम्ही ठाकर ठाकर' यांसारख्या रचना सादर करून पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी रसिकांची मने जिंकली.

## लोकमान्य टिळकांना आदरांजली

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहरातील संस्था-संघटनांनी विविध कार्यक्रम आयोजित करून टिळक यांना आदरांजली अर्पण केली.

पुणे शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीतर्फे कॉँग्रेस भवन येथे आयोजित कार्यक्रमात कमिटीचे अध्यक्ष अभय छाजेड यांनी टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

रेणुका स्वरूप मेमोरियल गर्ल्स हायस्कूलतर्फे टिळकांच्या कारकिर्दीवर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि पोवाड्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. टिळकांचे सर्व आर्दश डोळ्यांसमोर ठेवून प्रत्येकाने त्याच्या चांगल्या गुणांचे आचरण करावे, असे मत वरिष्ठ शिक्षिका सरोज जोशी यांनी व्यक्त केले.

जयभवानी टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा कल्पना उनवने यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. या वेळी डॉ. दीपलक्ष्मी पेशवे, विजय मखमाले, आशित साऊ आदी उपस्थित होते. आम्ही सारे पुणेकर, श्रीमती मीराबाई समाजसेवा प्रतिष्ठान, पुणे नवनिर्माण सेवा संघासह विविध संघटनातर्फे टिळक यांना अभिवादन करण्यात आले.

## पुरुषोत्तममध्ये ३२ एकांकिकांचा संग्रह

पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेतील लेखनाचे पारितोषिक मिळालेल्या ३२ निवडक एकांकिकांचा संग्रह साकारला असून, 'उत्तमोत्तम एकांकिका पुरुषोत्तमच्या' असे त्याचे नाव आहे. हा संग्रह तीन खंडात असेल.

'महाराष्ट्रीय कलोपासक' या संस्थेचे चिटणीस राजेंद्र ठाकूरदेसाई यांनी ही माहिती दिली.

यंदा 'पुरुषोत्तम'चे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्याने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून हा एकांकिका संग्रह तयार करण्यात आला आहे. मिलिंद सबनीस, ज्योती कुलकर्णी यांनी त्याचे संपादन केले आहे. ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांच्या 'एक झुलता पूल' ते २०१३ मध्ये मानस लयाळने लिहिलेल्या 'चॉकलेटचा बंगला' या एकांकिकेपर्यंत निवडक ३२ एकांकिका या संग्रहात समाविष्ट करण्यात आल्या आहेत, असे ठाकूरदेसाई यांनी सांगितले.

## अण्णांचे आंदोलन आता रुपेरी पडद्यावर

जनलोकपालासाठी मोठे आंदोलन केल्यानंतर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे पुन्हा आंदोलनात उडी घेत आहेत. मात्र ती खऱ्याखुऱ्या आंदोलनासाठी नसून चित्रपटासाठी आहे. तो चित्रपटही अण्णांच्याच आंदोलनावर आधारित आहे.

अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार व अन्यायाविरोधात आंदोलन करून मोठी चळवळ उभारली. हे आंदोलन सत्ताबदल आणि युवकांना प्रोत्साहन देण्यास पूरक ठरले. त्यामुळेच दिग्दर्शक प्रशांत राणे यांनी आंदोलनावर आधारित चित्रपट काढण्याचे ठरविले. ज्यामध्ये अण्णा हजारे यांनी छोटीशी भूमिका साकारली आहे.

याबाबत अण्णा म्हणाले, ''आंदोलनाविषयी चित्रपटची निर्मिती होत असल्याचा आनंद झाला. आजचा विद्यार्थी व तरुण हेच देशाचे भूषण आहे. त्यांच्यावर चांगले संस्कार झाले तरच उद्याचे आदर्श नागरिक तयार होतील. खऱ्या अर्थाने त्यांच्यातच महापुरुष दडलेला आहे. त्यामुळे त्यांना प्रेरणा देण्याचे काम सर्वांनी करणे गरजेचे आहे. त्यांचा विकास करण्याची जबाबदारी पालक, नागरिक व शिक्षकांची आहे.''

या चित्रपटासाठी संबंधित टीम राळेगणसिद्धीला आली होती.

''समाजाला प्रेरणा मिळावी म्हणून मी ही यात सहभागी झालो. म्हणून मी काही ॲक्टर वगैरे होत नाही,'' असेही अण्णांनी सांगितले.

'गाव सुधारला तरच देश सुधारू शकतो' हे अण्णांचे वाक्य लक्षात घेऊन मी चित्रपट काढण्याचे धाडस केले, असे दिग्दर्शक प्रशांत राणे यांनी सांगितले. सरकारकडून गावाच्या विकासासाठी मदत मिळत असतानाही ती गावापर्यंत पोहचत नाही. त्यामुळे एक विद्यार्थी अस्वस्थ होतो अन् इतर मित्रांशी चर्चा करतो. त्याच्यात आमूलाग्रचा बदल होतो अन् गावात भयाण गोष्टी घडतात. शेवटी हे विद्यार्थी आंदोलनाा मार्ग पत्करतात... अशा कथानकावर हा चित्रपट आधारलेला असल्याचे त्यांनी सांगितले.

## युवा साहित्य संमेलनाला मिळेना मुहूर्त

सासवड येथे झालेल्या साहित्य संमेलनात खुद्द मुख्यमंत्र्यांनी केलेली युवा साहित्य संमेलनाची घोषणा हवेत विरली आहे. सांस्कृतिक विभाग आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभागामध्ये नसलेल्या समन्वयामुळे सातत्याने पाठपुरावा करूनही हे संमेलन घेण्यासाठी अद्याप मुहूर्त मिळालेला नाही.

महाविद्यालयीन युवकांना साहित्याकडे आकर्षित करण्यासाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी युवा साहित्य संमेलन घेण्याची सूचना सासवडच्या ८७व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात केली होती. त्यासाठी २५ लाखांचा निधी राखून ठेवण्याची घोषणाही केली होती. साहित्य महामंडळाच्या माध्यमातूनच हे संमेलन घेण्याचे मुख्यमंत्र्यांनी सुचवले होते. सासवडचे संमेलन होऊन सहा महिन्यांचा कालावधी होऊनही युवा संमेलन झालेले नाही.

साहित्य महामंडळाने युवा संमेलनाची रूपरेषा आणि संमेलनाच्या सविस्तर तपशीलाचा प्रस्ताव सांस्कृतिक विभागाला सादर केला. हे संमेलन युवकांसाठी असल्याने त्याच्या निधीची तरतूद शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या अखत्यारीत असल्याचे महामंडळाला सांगण्यात आले.

त्यानंतर महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाशी संबंधित अधिकाऱ्यांनी संपर्क साधल्यावर संमेलनाचे निधी सांस्कृतिक विभागाकडून देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. राज्य सकारचेच दोन विभाग तरतूद केलेल्या निधीविषयी अनभिज्ञ असल्याचा

प्रकार या निमित्ताने समोर आला आहे. संमेलनासाठी निधीच मिळत नसल्याने खुद्द मुख्यमंत्र्यांनीच घोषणा केलेले हे संमेलन होण्याची शक्यता कमी असल्याची माहिती महामंडळाचे कोषाध्यक्ष सुनील महाजन यांनी दिली.

## तस्लिमा नासरीन यांना भारताची ओढ

वादग्रस्त बांगलादेशी लेखिका तस्लिमा नासरीन यांना भारताची ओढलागली आहे. बांगलादेश सरकारने परवानगी दिल्यास उर्वरित आयुष्य भारतात व्यतीत करायला आवडेल, असे त्यांनी म्हटले आहे.

'भारत हे माझ्यासाठी दुसरे घर असून, तेथील सरकार मला निश्चितपणे देशात राहण्याची परवानगी देईल,' असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. त्या म्हणाल्या, 'मला भारतात राहायला आवडते. मी युरोपची नागरिक असून, अमेरिकेचेही स्थायी नागरिकत्व मला प्राप्त झाले आहे; पण सांस्कृतिक अनुबंधामुळे मला भारतातच राहायला आवडते. एका निश्चित विचारधारेला प्रमाण मानून जेव्हा तुम्ही जगत असता, तेव्हा नातेवाईक तुमच्यासाठी फारसे महत्त्वाचे नसतात. तुमच्या विचारधारेला कोण मान देतो हे महत्त्वाचे आहे. बांगलादेशातील प्रकाशक आणि विद्वान मंडळींनी माझ्यासोबतचे नाते तोडले आहे, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

## मराठी भाषेसाठी आमीरचा पुढाकार

परदेशी भाषा शिकण्यासाठी शास्त्रोक्त पद्धत असते; मात्र मराठी शिकण्यासाठी तशी शास्त्रीय पद्धत नाही. जगाच्या कानाकोपऱ्यात मराठी पोचावी, तिचा अमराठी भाषकांनी शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करावा, यासाठी पहिल्यांदाच 'मायमराठी' हा शास्त्रोक्त अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. आमीर खान आणि मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने पुढाकार घेऊन हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला आहे.

सध्या मुंबई विद्यापीठात किंवा अन्य ठिकाणी जर्मन, फ्रेंच, चिनी, जपानी या भाषा शास्त्रोक्त पद्धतीने शिकण्याची सोय आहे; मात्र मराठी किंवा अन्य भारतीय भाषांसाठी नाही. या जाणिवेतून मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाच्या विभा सुराणा यांनी पुढाकार घेऊन मराठीत असे पहिले पाठ्यपुस्तक तयार करण्याचे ठरवले आहे. मुंबई मराठी साहित्य संघातर्फे १२ वर्षांपासून मराठी शिकवणारे सुहास लिमये व जयवंत चुनेकर यांची

साथ लाभली. मराठी अभ्यास केंद्राचे दीपक पवार, मराठी साहित्य परिषद असे सगळेच एकत्र आले आणि साकार झाले ते अमराठी भाषकांसाठीचे पहिले मराठी पाठ्यपुस्तक.

अभिनेता आमीर खान सध्या सुहास लिमये यांच्याकडे मराठी शिकत आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू राजन वेळूकर, जर्मनीचे कौन्सिल जनरल मायकल सिबेर्ट यांच्या उपस्थितीत कालिना कॅम्पसमध्ये आमीरच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या प्रकल्पासाठी आमीरने २५ लाख दिले आहेत.

## घुमान संमेलन मार्च महिन्यात

डिसेंबर-जानेवारी या महिन्यामध्ये पंजाबमध्ये कडाक्याची थंडी असते. तिथे या कालावधीत संमेलन भरविले तर साहित्यिकांना आणि साहित्यप्रेमींना हुडहुडी भरेल, अशी भीती आताच आयोजकांना वाटत आहे. त्यामुळे संमेलन थेट मार्च महिन्याच्या अखेरच्या आठवड्यातच भरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

साहित्य संमेलनात विविध कार्यक्रमांची रंगत रात्रीच बहरते, थंडी असेल, तर रसिकांना या रंगतदार कार्यक्रमांचा लाभ घेणे शक्य होणार नाही, असा विचार पुढे आला. घुमानमध्ये जेव्हा आल्हाददायक वातावरण असेल, तेव्हा संमेलन घ्यावे असेही सुचविण्यात आले. मार्च महिना त्या दृष्टीने योग्य असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

## संस्कृतचे सौष्ठव टिकावे : थिटे

‘भारतीय संस्कृती संस्कृत भाषेवर आधारलेली आहे असे मानले जाते. मात्र, वस्तुतः संस्कृत भाषाच संस्कृतीवर अवलंबून आहे. आताच्या काळात संस्कृती बदलत असल्याने संस्कृतला आधार राहिला नसल्याचे चित्र आहे’ असे मत संस्कृतचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. ग. उ. थिटे यांनी मांडले.

बहुजन हिताय संस्कृत आणि भारती सांस्कृतिक मंडळ यांच्यातर्फे संस्कृत दिनाच्या औचित्याने कार्यक्रम झाला. त्या वेळी ‘संस्कृत : अपेक्षा व वास्तव’ या विषयावर डॉ. थिटे बोलत होते. आयोजक ज्येष्ठ पत्रकार अभ्यासक विनय हर्डीकर, माधुरी सहस्रबुद्धे, डॉ. राजीव बसर्गेकर, डॉ. प्र. चिं. शेजवलकर आदी या वेळी उपस्थित होते.

‘स्वातंत्र्यपूर्व काळात शालेय अभ्यासक्रमात संस्कृत आवश्यक होते.

त्यामुळे त्या काळात संस्कृतचा वापर मोठ्या प्रमाणावर होत होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्कृतचा वापर कमी होऊ लागल्यावर संस्कृतच्या प्रचार आणि प्रसाराला महत्व आले. आता संस्कृतला राष्ट्रभाषा करण्याचा आग्रह धरला जात आहे. मात्र, तो जरा अतिरेकच आहे असे वाटते. हल्ली इंग्रजीमिश्रित संस्कृतही बोलले जाऊ लागले आहे. संस्कृत संभाषण वर्ग सुरू झाले आहेत. संस्कृत ही अत्यंत कठीण भाषा असल्याने त्याचा दैनंदिन वापर करणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही. संस्कृतचे सौष्ठव टिकवले पाहिजे.' असे डॉ. थिटे यांनी सांगितले.

डॉ. राजीव बसर्गेकर यांनी 'संस्कृतच्या सावलीत' या विषयावर बोलताना आपल्या आठवणींना उजाळा दिला. 'संस्कृत व्याकरणाच्या बेडीत अडकल्यासाखे वाटते. तसेच धार्मिक कार्यातील संस्कृतच्या वापरामुळे तिला उगाचच वेगळी प्रतिमा तयार झाली. संस्कृत समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी सुबोध केली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले.

आपली भूमिका मांडताना हर्डीकर म्हणाले, 'बालपणी शिकवल्या जाणाऱ्या काही स्तोत्रांमध्ये काव्य सापडत नाही. या स्तोत्रांमधील विचारासंदर्भातच पुनर्विचार करण्याची गरज आहे. लोकांपुढे कोणते संस्कृत आणायचे याचाही विचार व्हायला हवा.'

## साहित्य संस्थांची अनुदाने रखडली

राज्य साहित्य संस्कृती मंडळाला वाली नसल्याने राज्यातील साहित्य संस्थांची वार्षिक अनुदाने रखडली आहेत. त्यामुळे सरकारकडे पैसा असूनही धनादेशावर स्वाक्षरी करायची कोणी हा प्रश्न प्रलंबित आहे. खुद्द मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत असलेल्या मराठी भाषा विभागालाच 'कुणी अनुदान देता का अनुदान' असे विचारण्याची वेळ साहित्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांवर आली आहे. एकीकडे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा संपादन करण्यासाठी प्रयत्न सुरू असताना राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद रिक्त ठेवण्यामध्ये धन्यता मानली जात आहे.

ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी प्रकृती अस्वास्थाच्या कारणामुळे राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला त्याला एक वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. कर्णिक यांनी सात वर्षे हा पदभार सांभाळला होता. या पदासाठी इच्छुक असलेल्या साहित्यिकांना

नवीन सरकार सत्तेवर येण्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे. राज्यातील साहित्य संस्थांना राज्य साहित्य संस्कृती मंडळामार्फत वार्षिक अनुदानाचे वितरण करण्यात येते. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद आणि विदर्भ साहित्य संघ या संस्थांना पाच लाख रुपयांचे अनुदान दिले जाते, मात्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद रिक्त असल्याने यंदाच्या अनुदानाचे वितरण होऊ शकलेले नाही. धनादेशावर स्वाक्षरी करायची कोणी हा कळीचा मुद्दा झाल्याने साहित्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना मात्र निधीअभावी मेटाकुटीच्या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. साहित्य महामंडळासह घटक संस्थांचे वार्षिक अनुदान पाच लाख रुपयांवरून दहा लाख करावे, या सातत्याने केल्या जात असलेल्या मागणीवर मंडळाचे अध्यक्षपद रिक्त असल्याने कोणताही निर्णय होऊ शकलेला नाही, अशी माहिती महामंडळाचे कोशाध्यक्ष सुनील महाजन यांनी दिली.

## **कारगिलमध्ये हुतात्म्यांना मानवंदना**

“भारतीय जवानांनी निकराने झुंज देऊन पाकिस्तानी सैन्याला पळवून लावले ते कारगिल देशातील तरुणांसाठी ऊर्जास्रोत ठरत आहे.” असा विश्वास ‘लक्ष्य’ फाउंडेशनच्या अनुराधा प्रभुदेसाई यांनी व्यक्त केला. कारगिल युद्धातील हुतात्म्या जवानांना आदरांजली वाहण्यासाठी त्या पुण्यातून कारगिलला गेल्या होत्या.

प्रभुदेसाई या १३ वर्षे कारगिल युद्धातील जवानांना मानवंदना देण्यासाठी कारगिल येथे जात आहेत. पंधराव्या कारगिल विजय दिनानिमित्त कारगिल येथे लष्करातर्फे मानवंदना देण्यात आली, तेव्हा त्या तेथे उपस्थित होत्या. प्रभुदेसाई म्हणाल्या, “देशासाठी प्राणार्पण केलेल्या जवानांच्या आठवणीने प्रत्येकाचे डोळे पाणावले होते. त्याच वेळी त्यांनी केलेल्या पराक्रमामुळे भारतीयांची छाती अभिमानाने फुगत होती. या युद्धात प्राणाची बाजी लावत पराक्रम गाजविणारे कॅप्टन विक्रम बात्रा यांचे भाऊ विशाल आणि कॅप्टन मनोज पांडे यांचे आई-वडील कारगिल येथे उपस्थित होते.”

त्या म्हणाल्या, “दरवर्षी सुमारे ५० जणांना घेऊन कारगिल विजय दिनांच्या मानवंदनेला हजर राहते. प्रतिकूल परिस्थितीत भारतीय सैन्याने शत्रूशी मुकाबला केला आणि कारगिल, टायगर हिल परत मिळवले. त्यापुढे

आपण नतमस्तक होतो. मुंबई-पुण्यात आपण किती छान आयुष्य जगतो, त्याच वेळी सीमेवर लढणारे सैनिक किती प्रतिकूल परिस्थितीत लढत असतात, याची जाणीव येथे आलेल्या नागरिकांना होते, त्यामुळे जवानांसाठी काहीतरी करण्याची प्रेरणा येथून प्रत्येकजण घेतो.''

## 'क्रॉसवर्ड'चे पुण्यात मोठे दालन

समृद्ध साहित्यिक-सांस्कृतिक वारसा असलेल्या पुण्यात तीन मजल्यांचे, वीस हजार चौरस फूट जागेवर पुस्तकांचे दालन पुण्यात साकारले आहे. क्रॉसवर्डने औंध येथे भारतातील सर्वांत मोठे पुस्तकांचे दालन सुरू केले आहे.

विविध क्षेत्रात पुण्याचे महत्त्व सातत्याने वाढते आहे. क्रॉसवर्डनेही भारतातील सर्वांत मोठे दालन सुरू करून पुण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या दालनाच्या लाँच कार्यक्रमाला क्रॉसवर्डचे संचालक आकाश गुप्ता, किंजल याहा, दिनेश गुप्ता आदी यावेळी उपस्थित होते. औंध येथे साकारलेल्या दालनामध्ये पुस्तकांसह संगीत -चित्रपटांच्या डीव्हीडी, खेळणी आणि साहित्याचाही समावेश आहे. तसेच पालक वाचनात गुंग झाल्यानंतर वेळ घालवण्यासाठी लहान मुलांसाठी प्ले एरियाही तयार करण्यात आला आहे. कॅफेटेरिया आणि पुस्तक प्रकाशनासारख्या कार्यक्रमांसाठी सभागृह या वास्तूमध्ये उभे राहिले आहे.

## डॉ. माशेलकर व डॉ. मोरे यांचा सत्कार

'डॉ. रघुनाथ माशेलकर आणि डॉ. सदानंद मोरे यांच्यासारखे विद्वान ही महाराष्ट्राकडून देशाला मिळालेली देणगीच आहे. गुणांचा आदर करण्याची पुण्याची परंपरा आहे आणि महापालिकेने या दोघांचा सत्कार करून ही परंपरा जपली,' असे गौरवोद्‌गार माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी काढले.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. माशेलकर आणि संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. मोरे यांना उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुणे महापालिकेच्या वतीने मानपत्र देऊन गौरविण्यात आले, त्या वेळी पवार बोलत होते. महापौर चंचला कोद्रे, खासदार वंदना चव्हाण, आमदार बापू पठारे, सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार आदी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

''डॉ. माशेलकर आणि डॉ. मोरे या दोघांनाही घडविण्यात त्यांच्या मातांचा वाटा मोठा आहे, मी स्वत:ही आईमुळे घडलो, त्यामुळे हा कर्तृत्ववान मातांचाच सत्कार सोहळा आहे,'' असे पवार यांनी सांगितले. ''माशेलकर यांच्या कार्याचा शेती, उद्योग आणि वैद्यकीय क्षेत्राला मोठा लाभ झाला, तर मोरे यांनी आपले लेखन आणि वाणीने व्यासंगी संशोधक म्हणून स्थान प्रस्थापित केले,'' असेही ते म्हणाले, ''मला पुण्याने वाढविले आणि पुण्यानेच कौतुक केले. अखेरच्या श्वासापर्यंत काम करीन,'' असे माशेलकर म्हणाले.

## 'गानवर्धन'मध्ये उलगडला जीवनप्रवास

''कोणतंही गाणं मनातून यायला हवं. स्वरांबरोबरच त्या गाण्यातील भावनिर्मितीही महत्त्वाची असते. त्यामुळे स्वर, शब्द आणि भाव यांचा मिलाफ असलेलं गाणंच रसिकांना मंत्रमुग्ध करतं,'' अशी भावना पंडित संजीव अभ्यंकर यांनी रविवारी व्यक्त केली.

ललित कला केंद्र आणि भीमसेन जोशी, अध्यासन पुणे विद्यापीठ यांच्या वतीने आयोजित 'गानवर्धन' कार्यक्रमात 'मैफल : एक अनुभव'च्या माध्यमातून डॉ. माधुरी जोशी यांनी अभ्यंकर यांचा प्रवास दर्शविला. मुक्त संगीत चर्चासत्रातील या निरूपणयुक्त संगीताविष्कारात लहानपणीचा संजीव यापासून आजचे पं. अभ्यंकर श्रोत्यांना अनुभवायला मिळाले. 'गानवर्धन'चे हे ३३ वे वर्ष आहे.

''कोणताही राग गाताना त्यात एकाग्रता असायला हवी. रजोगुणी, सत्त्वगुणी यात रसिकांची मिळणारी दादही महत्त्वाची असते. त्यामुळे रसिकांना भावेल आणि आपल्या मनाला पटेल, असे गाणे गायला हवे.''

''गुरू पंडित जसराज आणि आई शोभा यांच्याकडून संगीताचे बाळकडू मिळाले. त्यांच्याकडे पाहत खूप गोष्टी शिकलो. केवळ अनुकरण न करता प्रयोग केले. आजच्या काळाला साजेसे असे संवेदनात्मक आणि भावनात्मक संगीत देण्याची गरज आहे. रसिकांना मैफिलीत सहभागी करून घेता येईल, एवढी प्रतिभा आपण मिळवायला हवी.'' असे मनोगत व्यक्त करताना अभ्यंकर म्हणाले.

## पहिले विद्रोही स्त्री साहित्य संमेलन

विद्रोही सांस्कृतिक चळवळीतर्फे १९ आणि २० ऑगस्टला पहिले विद्रोही स्त्री साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. रास्ता पेठ येथील केईएम रुग्णालयाजवळील संत गाडगेबाबा धर्मशाळा येथे हे राज्यव्यापी संमेलन झाले.

दोन दिवसांच्या या संमेलनात स्त्रियांवरील हिंसाचार, अभ्यासक्रमातील विषमता अशा विविध विषयांवर चार परिसंवाद झाले. कविसंमेलन, गट चर्चा, शाहिरी जलसा, लघुचित्रपट, एकपात्री प्रयोग आणि चित्रप्रदर्शन असे विविध कार्यक्रम ही झाले आहेत.

## अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या ४५ व्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस शहरातील महाविद्यालये, सेवाभावी संस्था, राजकीय पक्ष आणि संघटनेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली आहे.

फुले-साठे-आंबेडकर विचार फाउंडशेनतर्फे ही त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घातला गेला. नेत्रचिकित्सा शिबिर व ससून रुग्णालयात लहान मुलांना बिस्कीट, फळे, कपडे, निराधार महिलांना साड्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मोहन सोनवणे, राजेंद्र मिरजे आदी उपस्थित होते.

## साहित्य संमेलनाच्या लोगोचे अनावरण

पंजाबमधील घुमान येथे होणाऱ्या ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या तयारीला सुरुवात झाली आहे. या संमेलनाच्या लोगोचे अनावरण शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले.

‘सरहद’ या संस्थेतर्फे यंदाचे संमेलन आयोजित केले जाणार आहे. साहित्य संमेलनाच्या लोगो अनावरणाच्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनील महाजन, आयोजक संजय नहार आणि भारत देसडला या वेळी उपस्थित होते. मुंबईतील ज्येष्ठ चित्रकार ख्वाजा सय्यद यांनी हा लोगो तयार केला आहे.

'संतश्रेष्ठ नामदेव आणि वाङ्मय यांचा मिलाफ या लोगोमध्ये साधण्यात आला आहे. संमेलनाच्या लोगोचे अनावरण झाल्यानंतर संमेलनाच्या तयारीला खऱ्या अर्थाने वेग येईल,' अशी माहिती संमेलनाचे निमंत्रक भारत देसडला यांनी दिली.

## 'बालभारती'च्या तिसरी परिसर अभ्यासाच्या उर्दू पुस्तकात परस्पर बदल

'बालभारती'च्या मराठी भाषेतील मूळ पुस्तकांचा अनुवाद करून तो इतर भाषांमध्ये उपलब्ध करून देणे बंधनकारक असताना, या वेळी तिसरी परिसर अभ्यासाच्या उर्दू पुस्तकात परस्पर बदल करण्यात आले आहेत. शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य करणारे महाराष्ट्रातील समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज, महर्षी धोंडो केशव कर्वे, महाराजा सयाजीराव गायकवाड, पंडिता रमाबाई, कर्मवीर भाऊराव पाटील आणि पंजाबराव देशमुख यांची छायाचित्रे या पुस्तकातून काढून टाकण्यात आली आहेत.

राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाची निर्मितीच मुळी राज्यातील विद्यार्थ्यांना समान अभ्यासक्रम व उद्दिष्ट्ये असलेली पुस्तके उपलब्ध करून देणे या हेतूने झाली. त्यामुळे पाठ्यपुस्तकांच्या मूळ प्रती तयार केल्यानंतर त्या इतर भाषांमध्ये अनुवादित होतात. त्यात बदल होत नाही आणि तो करायचाच असेल तर पाठ्यपुस्तक लेखन समितीची परवानगी बंधनकारक असते. या वेळी तिसरी परिसर अभ्यासाच्या पाठ्यपुस्तकात शिक्षण क्षेत्रात कार्य केलेल्या महाराष्ट्रातील सुधारकांचा सचित्र उल्लेख आहे.

ज्यांची छायाचित्रे वगळली त्या सुधारकांचे कार्य कोणत्याही गटापुरते वा समाजापुरते सीमित नसताना हा बदल का झाला, हे स्पष्ट झालेले नाही.

## 'तेंडुलकर नाट्यगृह सर्वांनाच द्यावे' असा आबा बागूल यांचा प्रस्ताव

ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सहकारनगरमधील राजीव गांधी शाळेत बांधलेले नाट्यगृह शनिवार-रविवारी सर्वांसाठीच खुले करावे, असा प्रस्ताव नगरसेवक आबा बागूल यांनी महापालिकेपुढे मांडला आहे.

पालिकेने तीन वर्षांपूर्वी या नाट्यगृहाचे उद्घाटन केले. त्या वेळी तीन

प्रयोगानंतर तांत्रिक कारण देऊन या नाट्यगृहाचा वापर केवळ शालेय कार्यक्रमांपुरताच केला गेला. त्यामुळे या नाट्यगृहाचा रंगकर्मींना काहीच उपयोग होत नाही. त्यामुळे या नाट्यगृहात नाटकांचे प्रयोग होत नसल्याबद्दल तेंडुलकर यांचे बंधू, ज्येष्ठ व्यंग्यचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. तसेच नाट्यप्रयोग होणार नसतील, तर विजय तेंडुलकरांचे नाव काढून टाकावे, अशी स्पष्ट भूमिका आयुक्त विकास देशमुख यांच्याकडे त्यांनी मांडली होती.

या पार्श्वभूमीवर, नगरसेवक आबा बागूल यांनी शनिवार-रविवार शाळेला सुटी असताना तरी इतर कार्यक्रमांसाठी हे नाट्यगृह खुले करण्यात यावे असा प्रस्ताव पालिकेला सादर केला आहे.

## सोशल मीडियावरील 'समानधर्मी' वृत्तपत्रीय स्तंभलेखन

'वृत्तपत्रीय स्तंभलेखन हे मराठी पत्रकारितेमधील एक गंभीर साहित्य आहे. वाचकांनी अभिरुची घडवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वृत्तपत्रीय स्तंभलेखनातून साधले जाते,' असे मत साहित्यिक प्रा. डॉ. महेंद्र कदम यांनी व्यक्त केले.

सोशल मीडियावरील 'समानधर्मी' या वृत्तपत्रीय स्तंभलेखकांच्या ग्रूपची राज्यस्तरीय स्तंभ विचार परिषद नुकतीच झाली. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. हरी नरके, कवयित्री आश्लेषा महाजन, लेखक अभिजित पेंढारकर, प्रकल्प समन्वयक प्रियदर्शिनी हिंगे आदी या वेळी उपस्थित होते.

'कॉलमकट्टा' या पुस्तकाचे प्रकाशनही या कार्यक्रमात करण्यात आले. स्मिता पाटील-वळसंगकर या स्तंभलेखिकांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे.

परिषदेत 'विवेकवादी व जातिअंताच्या चळवळीचे महाराष्ट्रातील भवितव्य' या विषयावर परिसंवाद, कविसंमेलन झाले. तसेच अक्षय इंडीकर दिग्दर्शित 'डोह', अनुप जत्राटकर दिग्दर्शित 'द प्रॉमिस', किरण साष्टे दिग्दर्शित 'मृण्मयी' या शॉर्टफिल्म दाखवण्यात आल्या. 'द रेप' हा एकपात्री प्रयोग प्रमिती नरकेने सादर केला.

## दिव्याच्या 'रंगप्रवेशम्'ला रसिकांची दाद

नृत्यार्थी कलाक्षेत्रम् संस्थेतून भरतनाट्यमचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या

दिव्या घोरपडे या नृत्यांगनेचा ‘रंगप्रवेशम्’ कार्यक्रम नुकताच सादर झाला. व्यंग्यचित्रकार मंगेश तेंडुलकर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते तर संस्थेच्या संचालिका राजसी वाद्य, स्मार्ट मिडीया स्कूलचे संचालक डॉ. केशव साठे उपस्थित होते.

दिव्याने तोडेमंगलम्, आलारिपू, जतिस्वरम्, शब्दम्, वर्णम्, पदम्, दशावतार आणि तिल्लाना सादर करत उपस्थितींची दाद मिळवली. चित्रा सुब्रह्मणम् (गायन), प्रिया चटर्जी (सह गायन) यांनी दिव्याच्या नृत्यास साथ केली. भरतनाट्यम नृत्य प्रकारात नैपुण्य मिळवण्यासाठी आठ ते दहा वर्षांच्या कालावधी आवश्यक असताना केवळ तीनच वर्षांत ११ नृत्यांगना तयार करणे, हे नियोजनबद्ध प्रयत्नांचे यश असल्याचे दिव्याच्या ‘रंगप्रवेशम्’ने सिद्ध केले, असे राजसी यांनी अभिमानाने सांगितले.

## हाताला फ्रॅक्चर असूनही राहीचा सुवर्णवेध

कोल्हापूरच्या राही सरनोबतचा सुवर्णवेध असा फ्लॅश झळकताच ताणलेली उत्सुकता कमी झाली आणि राहीच्या वसुंधरा बंगल्यात आनंदाला उधाण आले. दुखापतीवर मात करून राहीने घेतलेल्या सुवर्णवेधानंतर आई-वडिलांना आनंदाश्रू अनावर झाले.

राष्ट्रकुल स्पर्धेत महाराष्ट्राच्या कन्येने सुवर्णपदक मिळवल्याची बातमी समजताच राहीच्या कुटुंबीयांचे अनेकांनी अभिनंदन केले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, गृह राज्यमंत्री सतेज पाटील, विधान परिषद सभापती शिवाजीराव देशमुख, आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू तेजस्विनी सावंत यांनी दूरध्वनी करून सरनोबत कुटुंबीयांचे अभिनंदन केले. ताराराणी विद्यापीठाच्या उषाराजे हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असताना राष्ट्रीय छात्रसेनेची विद्यार्थिनी असणाऱ्या राहीने प्रथम एअर पिस्तूल हाती घेऊन यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे ती नेमबाजीकडे आकर्षित झाली. दहावीनंतर दुधाळी रेंजवर प्राशिक्षक अजित पाटील यांच्याकडे नेमबाजीचे धडे घेण्यास राहीने सुरुवात केली. अल्पावधीतच तिची ज्युनिअर व सिनिअर आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी निवड झाली. या स्पर्धेच्या तयारीसाठी ती मुंबई येथील महाराष्ट्र रायफल असोसिएशनच्या चिटणीस शीला कानुनगो यांच्याकडे प्रशिक्षणासाठी दाखल झाली. त्यानंतर झालेल्या प्रत्येक स्पर्धेत पहिल्या तीन क्रमांकांवरील आपला हक्क अबाधित राखला. सप्टेंबरमध्ये होणारी विश्व चॅम्पियन नेमबाजी

स्पर्धा तसेच २०१६ मध्ये होणारी ऑलिम्पिक स्पर्धा यातील कामगिरीकडे राहीचे लक्ष आहे.

पुणे येथे फुटपाथवरून जात असताना तोल गेल्यामुळे राहीच्या हाताला फ्रॅक्चर झाले होते. यामुळे ती राष्ट्रकुल स्पर्धेपूर्वी दोन महिने सरावापासून वंचित होती. हाताची दुखापत थोडीशी कमी झाल्यानंतर तिने भारतात आठ दिवस, तर जर्मनी येथे १५ दिवस सराव केला. शनिवारी सामना संपला या वेळेत हाताला प्रचंड वेदना होत होत्या. एकवेळ तर सामना सोडून देण्याच्या स्थितीत राही होती. पण, अखेरच्या प्रयत्नात सर्व अनुभव पणाला लावत दुखापतीवर मात करून राहीने सुवर्णवेध घेतला.

## साहित्य संमेलनासाठी 'ट्रॅव्हल पॅकेज'चा फंडा

पंजाबमधील घुमान येथे होणाऱ्या ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला येऊ इच्छिणाऱ्या साहित्यप्रेमींच्या सोयीसाठी 'ट्रॅव्हल पॅकेज' करण्याची योजना अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि आयोजक सरहद संस्थेकडून आखण्यात येत आहे. या योजनेत साहित्य संमेलन आणि परिसरातील पर्यटनस्थळांना भेटी अशा पॅकेजचे नियोजन केले जात आहे.

वाहतुकीची व्यवस्था करताना कमी खर्चात अधिकाधिक साहित्यप्रेमींना या संमेलनाला येता यावे, या उद्देशाने ट्रॅव्हल कंपन्यांसह विमान कंपन्यांशीही चर्चा करण्यात येत आहे. त्यात पुणे-अमृतसर, मुंबई-अमृतसर मार्गावरील या 'ट्रॅव्हल पॅकेजस्' यांना प्राधान्य आहे. तसेच रेल्वे तिकिटात सूट मिळण्याबाबत केंद्र सरकारशीही पत्रव्यवहार केला जाणार आहे.

संमेलनासाठीच्या या खास 'ट्रॅव्हल पॅकेज'ची माहिती संमेलनाचे निमंत्रक भारत देसडला यांनी दिली. 'साहित्य संमेलनाला येण्यासाठी बऱ्याच लोकांनी तयारी दर्शवली आहे. ट्रॅव्हल कंपन्यांच्या माध्यमातून ही यात्रा अधिक सोयीची ठरू शकेल, या विचाराने ट्रॅव्हल पॅकेज करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या दृष्टीने येत्या आठवड्यात ट्रॅव्हल कंपन्यांना बैठकीसाठी निमंत्रित केले आहे.

यामुळे साहित्यप्रेमींना कमी खर्चात साहित्य संमेलनाला उपस्थित राहता येईल आणि परिसरातील पर्यटनस्थळे पाहण्याची संधी मिळू शकेल,' अशीही माहिती त्यांनी दिली.

## हिमांशू सांखे यांची लिमका बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

जयहिंद परिवारातर्फे पुण्यातील हिमांशू सांखे यांनी पुणे ते पंढरपूर हे २३० किलोमीटर अंतर अडीच दिवसांत चालून पूर्ण केले. यासाठी त्यांच्या नावाची नोंद लिमका बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये, प्रदूषण कमी व्हावे आणि सर्वांनी चालले पाहिजे, हा संदेश पसरवण्यासाठी आणि गोपीनाथ मुंडे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता, असे हिमांशू सांखे यांनी सांगितले.

## शेतपम्पांना चोवीस तास वीज शक्य : अजय मेहता

पाण्याचा उपसा करण्यावर कठोर निर्बंध घालून शेतपंपांना २४ तास वीजपुरवठा करणे शक्य आहे. तसेच, स्वस्त दराच्या कालावधीत अधिक वीज वापरता यावी, यासाठी घरगुती ग्राहकांच्या वीजजोडणीला 'टीओडी' मीटर लावण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहिती 'महावितरण'चे व्यवस्थापकीय संचालक अजय मेहता यांनी दिली.

## 'औषधी विश्वकोशा'चे प्रकाशन

'इंकिंग इनोव्हेशन्स' तर्फे डॉ. मंदार जोशी यांनी तयार केलेल्या 'औषधी विश्वकोशा'चे प्रकाशन संचेती यांच्या हस्ते झाले.

'औषधी विश्वकोश हा सर्व पॅथीतील डॉक्टरांना एकत्र आणणारा ग्रंथ आहे. तसेच हा आजीबाईचा आधुनिक पद्धतीचा बटवा आहे. बुद्धीला चालना देऊन या कोशातील माहितीचा वापर डॉक्टरांप्रमाणेच सर्वसामान्यांनाही करता येईल. आतापर्यंत अशा ग्रंथाची निर्मिती झालेली नव्हती,' असे मत ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. एच. के. संचेती यांनी व्यक्त केले आहे.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर, ॲड. पराग अळवणी, प्रकाशक आनंद लिमये आदी या वेळी उपस्थित होते. 'या पुस्तकात आयुर्वेद, ॲलोपथी, होमिओपॅथी, चायनीज, अरेबिक, युनानी आदी उपचार पद्धतींना एकत्र आणून सुमारे १५१ औषधी वनस्पतींची उपचार पद्धतींसह माहिती देण्यात आली आहे. बऱ्याच औषधी वनस्पती पेशंटला बरे करण्यासाठी वापरल्या जाऊ शकतात, असे डॉ. जोशी यांनी सांगितले.

## जगातील उंच मुलगी - गिनीज बुकात नोंद

१७ वर्षाच्या तुर्की मुलीने उंचीच्या संदर्भात गिनीज बुकात विक्रमाची नोंद केली आहे. तिची उंची सात फुटांपेक्षा जास्त आहे.

रुमेश्या गेलगी असे या मुलीचे नाव असून तिची उंची २१३.६ से.मी. (७ फूट ०.०९इंच) इतकी आहे. तिला जगातील सर्वांत उंच मुलगी असल्याचे खास प्रमाणपत्र तुर्कीतील कराबुक येथे सफ्रानबोलू या तिच्या मूळ गावी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌सने दिले आहे.

## धर्मनिरपेक्ष आयोगाची स्थापना करावी : गोडबोले

''समाज आणि राजकीय पक्षात एकमताचा अभाव आढळतो. त्यामुळे देशात तालिबानीकरणाची मनोवृत्ती फोफावत आहे. मात्र खऱ्या अर्थाने चांगले दिवस आणण्यासाठी देश एकसंघ करण्याचे आव्हान मोदी सरकारसमोर आहे. हे साध्य करण्यासाठी केंद्र सरकारने धर्मनिरपेक्ष आयोगाची स्थापना करावी,'' असे मत केंद्रीय गृह खात्याचे माजी मुख्य सचिव माधव गोडबोले यांनी व्यक्त केले.

समाजविज्ञान मंडळ न्यासातर्फे या वर्षीचा 'स. मा. गर्गे पुरस्कार' राजकीय विश्लेषक रंगा दाते यांच्या 'तालिबान' या पुस्तकाला देण्यात आला. या पुरस्काराचे वितरण गोडबोले यांच्या हस्ते झाले.

गोडबोले म्हणाले, ''समाज, राजकीय पक्ष आणि सरकार खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष व्हावे, यासाठी हा आयोग महत्त्वपूर्ण ठरणार आहे. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांच्या मार्गदर्शनाखाली या आयोगाची स्थापना करावी आणि राजकीय व्यवस्थेत घेतले जाणारे वेगवेगळे निर्णय हे धर्मनिरपेक्ष आहेत का, याची चाचपणी करावी.'' मुंबई बॉंबस्फोटाचा अहवाल लोकांसमोर सादर झाला पाहिजे असेही त्यांनी सुचविले. राजकीय विश्लेषक रंगा दाते व देवयानी अभ्यंकर यांनीही मनोगत व्यक्त केले. न्यासाचे सल्लागार विश्वस्त आप्पा कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## 'समाजात समरसतेची गरज' ज्येष्ठ समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस

'आज समाजात जातींच्या नावाने, संत-महात्म्यांच्या नावाने फूट पाडून विषमतेचे विष पेरण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा परिस्थितीत

समन्वयाची भूमिका घेऊन समरसता साधण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे,' अशी भूमिका ज्येष्ठ समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी मांडली. समरसता साहित्य परिषदेच्या पुणे महानगर शाखेतर्फे संपादित समरसता विशेषांकाचे प्रकाशन सबनीस यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. अंकाच्या संपादिका डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, माजी आमदार विश्वास गांगुडे, सम्राट नाईक आदी या वेळी उपस्थित होते. 'जीवनात आनंद घेणे आणि दुसऱ्याला आनंद देणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला अशा विविध प्रकारच्या साहित्यातून आनंद मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे,' असेही त्यांनी सांगितले. प्रकाशनानंतर घनश्याम ताडे, सीमा कुलकर्णी, मधुकर गिलबिले, सुनंदा पाटील, ऋचा कर्वे, शांताराम घोलप, डॉ. विद्या माने आदी कवी-कवयत्रींनी त्यांच्या कवितांचे सादरीकरण केले.

## शिरीष बोधानी यांचा संस्कृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित 'संतवाणी'त अभंग निरूपण

'जीवनाला अर्थ प्रदान करणारे संतवाङ्मय नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आवश्यक आहे,' असे शिरीष बोधानी यांच्या संस्कृती प्रतिष्ठानातर्फे आयोजित 'संतवाणी' कार्यक्रमात अभंगाचे निरूपण करताना माजी आमदार उल्हास पवार यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ गायक पं. उपेंद्र भट, आशा खाडिलकर यांनी अभंगांचे सादरीकरण केले. राजीव परांजपे, राजा हसबनीस, अंजली सिंगडे-राव, माऊली टाकळकर यांनी संगीतसाथ केली. 'भागवत संप्रदायाच्या संतांनी विश्वात्मक परमेश्वराची आणि समताधिष्ठित समाजाची उदात्त कल्पना मांडली आहे,' असे पवार यांनी सांगितले.

## विनोदी 'गुड मॉर्निंग'

'आपल्या अवती-भवतीच्या घटना, प्रसंगांना विनोदाची झालर लावून 'गुड मॉर्निंग' या पुस्तकात लेखक आनंद लाटकर यांनी स्वत:च्या खास शैलीत मांडल्या आहेत. 'त्यामुळे हे पुस्तक सध्याच्या धकाधकीच्या जीवनात हास्याचे मलम आहे,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक मुकुंद टांकसाळे यांनी व्यक्त केले. साधना ट्रस्टतर्फे कल्पना मुद्रणालयाचे संचालक आनंद लाटकर यांनी लिहिलेल्या लेखांचा समावेश असलेल्या 'गुड मॉर्निंग' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन लाटकर यांच्या हस्ते नुकतेच झाले, त्या वेळी

टांकसाळे बोलत होते.

## भावपूर्ण गायकीतून उलगडले ‘मेघरंग’

राग मियामल्हारने भारलेले वातावरण, पावसाचे वर्णन करणाऱ्या सुंदर रचना आणि तितकीच भावपूर्ण गायकी अशी पावसाळी गंध असणारी मेघरंग ही गानमैफल रसिकांनी अनुभवली. त्या वेळी गायिका रचना बोडस आणि आस्था शुक्ला यांच्या गायनाला संगीतप्रेमींची उत्स्फूर्त दाद मिळाली.

पं. विष्णू दिगंबर पलुस्कर परंपरेतील ज्येष्ठ गायक पं. शंकरराव बोडस आणि पं. काशिनाथ बोडस यांच्या स्मृतिनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गांधर्व महाविद्यालयाच्या विष्णू विनायक स्वरमंदिरात हा कार्यक्रम झाला. रचना यांच्या गायकीने मैफलीचा श्रीगणेशा झाला. राग मियामल्हार आणि मल्हार रागाच्या इतर प्रकारांचे दमदार सादरीकरण त्यांनी केले. आस्था यांनी ‘कजरी’, ‘सावन’, ‘झुला’ हे प्रकार गात या मैफलीत पावसाचे रंग भरले. भरत कामत (तबला) आणि तन्मय देवचके (हार्मोनिअम) यांनी त्यांना समर्पक साथसंगत केली.

त्याचबरोबर कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रमोद मराठे लिखित ‘संवादिनी साधना’ या ८४ रागांतील २०१ रचनांचा समावेश असणाऱ्या पुस्तकाचे आणि सीडीचे प्रकाशन झाले. यावेळी ज्येष्ठ गायिका वीण सहस्त्रबुद्धे आणि सरगम संगीत विद्यालयाच्या संचालिका वर्षा गोडबोले याही उपस्थित होत्या.

## भक्तिरचनांची सुरेल अनुभूती

‘विठ्ठलाच्या मंदिरात सांजावले निरांजन’, ‘पत्थर में साधा मज जाण नाही भान नाही’, असा पांडुरंगावर आधारित सुंदर रचनांचा आस्वाद रसिकांनी घेतला. पं. हेमंत पेंडसे, रोहित नागभिडे व अभिजित बारटक्के यांनी संगीत दिलेल्या या सर्व रचना होत्या. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आषाढी वद्य एकादशी निमित्त बुधवार पेठेतील श्री एकनाथ मंगल कार्यालय येथे झालेल्या या कार्यक्रमाला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यातील गीते व निवदेन डॉ. राहुल देशपांडे यांचे होते. कार्यक्रमाचा श्रीगणेशा ‘चला नामदेवा राऊळात जाऊ’ या प्रज्ञा देशपांडे यांनी गायलेल्या

रचनेने झाला. ‘अरे अरे ज्ञाना झालासी पावन’, ‘बोलतो मृदुंग बोल एकतारी’, ‘आभाळाचं गाणं झालं श्वासाला उधाण’, ‘कान्हा निजला निजला उजेड’ अशी अनेक गीते सादर झाली.

राहुल देशपांडे यांनी निवदेन केले. ‘रंगती फुगडील जीवांची’ या गीताला रसिकांची पसंतीची पावती मिळाली, तर ‘तुळशीची रेघ की तू त्रिशुलाचा भास’ या रचनेला प्रेक्षकांनी मनापासून दाद दिली.

संस्थेचे विश्वस्त डॉ. प्र. ल. गावडे यांनी नव्वदी पार केल्यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. ‘जय जय राम कृष्ण हरी’च्या जयघोषात कार्यक्रमाची सांगता झाली.

## ‘पाऊस असा रुणझुणता’

‘पाऊस असा रुणझुणता, पैंजणे सखीची स्मरली, पाऊल भिजत जाताना, चाहुल विरत गेलेली’ या तरल अनुभूतीचा आस्वाद तळेगावकर रसिकांनी नुकताच घेतला. सिद्धिविनायक प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या पावसाच्या गीतांच्या कार्यक्रमाचे, श्रीरंग कलानिकेतनच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात संपदा थिटे, विनायक लिमये, आसावरी जहागीरदार, स्वप्नील झळकी यांनी गीते सादर केली. प्रत्यक्ष पावसाच्या सरींबरोबरच पाऊस गीतांमध्येही तळेगावकर चिंब झाले होते. नगराध्यक्षा सुलोचला आवारे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गणेश काकडे, सतारवादक विदुर महाजन या वेळी उपस्थित होते.

ही गुलाबी हवा, कधी तू रिमझिम झरणारी बरसात, भेट तुझी माझी स्मरते, अंगणी माझ्या मनाच्या, नभं उतरू आलं, यांसारख्या मराठी पाऊसगीतांबरोबरच, जिंदगीभर नही भुलेगी, ओ सजना, बरखा बहार आयी, यांसारख्या हिंदी गीतानांही रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ‘प्यार हुआ इकरार हुआ है’ या गीताने वन्स मोअर मिळवला. तसेच बालचमूंच्या पाऊसगाण्याने धम्माल निर्माण केली. ॠतू हिरवा, घन घनमाला, अग्गोबाई ढग्गोबाई, घटा सावन की, यांसारख्या गीतांवर त्यांनी सादर केलेल्या नृत्यांनी रसिकांची मने जिंकली. विनया केसकर व श्रीधर कुलकर्णी यांनी निवेदन केले. पराग पांडव (तबला), निखिल महामुनी (सिंथेसायझर), प्रवीण ढवळे (तालवाडा), मंदार गोडसे (हार्मोनियम) यांनी साथ केली. केदार अभ्यंकर, हेमंत उत्तेकर यांनी ध्वानिसंयोजन केले.

## कथकचे १९ तासाचे अथक आवर्तन

नीलिमा नृत्यालयाच्या १५व्या वर्धापनदिनानिमित्त सलग १९ तास कथक प्रवाह चालू ठेवण्याचा संकल्प नुकताच पार पडला. संचालिका नीलिमा हिरवे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आवर्तन' या संकल्पनेतून यांची पूर्तता झाली.

मध्यरात्री एक वाजता घुंगरू नादास सुरुवात झाली. फुलांच्या सजावटीत विराजमान नटराजापुढे सुंदर समईच्या शांत ज्योतींचा प्रकाश आणि 'श्रीराम जय राम जय राम' या जपाच्या ध्वनीवर नीलिमा यांनी तत्कार साकारला. पहाटे पाच वाजल्यापासून मिळालेली तबल्याची साथ नृत्य प्रवाहास रात्री आठ वाजेपर्यंत मिळाली. या कार्यक्रमात संस्थेच्या विद्यार्थिनींच्या आईही उत्साहाने एक तास सहभागी झाल्या होत्या. संपूर्ण दिवसभरात सहा ते ६६ या वयोगटातील सर्व संस्थेचे विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभागी झाले. कार्यक्रमास तबला वादक पराग हिरवे यांनी आणि त्यांच्या २५ विद्यार्थ्यांनी पाच तास वादनाची साथ केली. हर्षवर्धन गावकर, प्रशांत शिंदे, श्री. बाबर यांनीही तबला साथ केली. सुजित जोशी, श्रद्धा इंगळे यांनी हार्मोनियमची तर शीतल ओरपेने गायनाची साथ केली. राजश्री जावडेकरही विद्यार्थिनीसमवेत सोहळ्यात सहभागी झाल्या.

## गुरुतुल्य व्यक्तीशी संवाद हवा : सुनील तटकरे

'इंटरनेट आणि फेसबुकच्या माध्यमातून संवाद साधणाऱ्या नव्या पिढीने समाजातील गुरुतुल्य व्यक्तीशी थेट संवाद साधला, तर त्यांचे भवितव्य उज्ज्वल होईल,' असा सल्ला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त तरुणांना दिला.

या वेळी शिल्पकार बी. आर. खेडकर, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई, पंडित सुरेश तळवलकर, हॉकीपटू अर्नवाझ दमानिया, शाहू बँकेचे आबा शिंदे यांचा तटकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महापौर चंचला कोद्रे, आमदार अनिल भोसले आदी उपस्थित होते.

अप्पा रेणुसे यांनी खेडकर यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी केली. याबाबत तटकरे यांनी उपमुख्यमंत्र्याकडे प्रयत्न करण्याचे आश्वासनही दिले. खेडकर म्हणाले, की हा माझा सत्कार नसून शिल्पकलेचा सत्कार आहे; त्याचबरोबर माझ्या सर्व गुरुजनांचा हा सत्कार असल्याचे

तळवलकर यांनी सांगितले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

## ‘मी सदाशिव बोराटे’ या पुस्तकाचे प्रकाशन

“आत्मकथनातून या माध्यमाचा उपयोग सहानुभूती मिळविण्यासाठी केला जात आहे, हे चित्र बदलले पाहिजे. आपल्या जीवनातून इतरांना जगण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी आत्मकथन लिहिले जावे,” असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

सदाशिव बोराटे यांनी लिहिलेल्या ‘मी सदाशिव बोराटे’ या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. कोत्तापल्ले आणि महापौर चंचला कोद्रे यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. साहित्यिक यशवंत पाटणे, चित्रपटनिर्माते मानसिंगराव पवार, कृष्णकांत कुदळे, कमल ढोले-पाटील, सुधीर दरोडे, सुनीताराजे पवार आदी या वेळी उपस्थित होते. त्या वेळी पाटणे म्हणाले, “उद्योगातून तयार होणाऱ्या वस्तू या अनंत काळ टिकणाऱ्या नसतात; पण साहित्यातून निर्माण होणारी शब्दफुले कधीही नष्ट होत नाहीत. साहित्य जगण्याला ऊर्जा व प्रेरणा देते.”

## जुन्या एकांकिकांचा महोत्सव

स्पर्धेच्या पहिल्या वर्षी सादर झालेल्या ‘एक झुलता पूल’ ते गत वर्षीच्या ‘उळागड्डी’ अशा विजेत्या एकांकिकांचा महोत्सव सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात होणार आहे. या महोत्सवातील चोवीस एकांकिकांच्या माध्यमातून जुन्या काळाला उजाळा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महिनाभर दर शनिवार-रविवार एकांकिकांचे प्रयोग होतील. शक्यतो जुन्याच कलाकारांच्या संचात या एकांकिकांचे सादरीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

## संयोजक – प्रकाशकांच्या बैठकी

पंजाबमधील घुमान येथे होणाऱ्या ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रकाशकांसारखा महत्त्वाचा घटक अलिप्त न राहण्यासाठी काहीतरी मध्यममार्ग काढला जाण्याची शक्यता आहे. संमेलनाला न येण्याची भूमिका घेतलेल्या प्रकाशकांशी चर्चा करण्यासाठी बैठक होणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने संमेलन स्थळासाठी

घुमानची निवड केल्यानंतर साहित्य वर्तुळातून नाराजीचे सूर आळवला जाऊ लागला. संमेलनास्थळी मराठी माणसे नसलेल्या ठिकाणी संमेलन घेण्यात काही मतलब नाही, संमेलनात पुस्तक विक्री होणार नाही, पुस्तके नेण्याचा खर्च परवडणारा नसल्याने प्रकाशकांनी संमेलनात सहभागी न होण्याची भूमिका घेतली. मात्र, संमेलनामध्ये प्रकाशक हा घटक महत्त्वाचा असल्याने संमेलनाचे आयोजक या संदर्भात मध्यमार्ग काढण्याच्या तयारीत असल्याचे समजते.

## सप्तर्षी दाम्पत्याला 'महापालक'

'समाजकार्य ही एक सहज बाब आहे. सामाजिक कार्य अवघड असते असे सांगून ते करू इच्छिणाऱ्यांना घाबरून सोडणे चुकीचे आहे. असे कार्य करणाऱ्या पिढीला एका जातीत रूपांतरित करणे हेही चुकीचे आहे,' असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ. कुमार सप्तर्षी यांनी व्यक्त केले.

'सर फाउंडेशन' आणि 'डीपर' यांच्या वतीने डॉ. कुमार आणि डॉ. ऊर्मिला सप्तर्षी या दाम्पत्याचा वनमंत्री डॉ. पंतगराव कदम यांच्या हस्ते 'महापालक' सन्मान प्रदान करून गौरव करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, सर फाउंडेशनचे अध्यक्ष हरीश बुटले, डॉ. रोहिणी बुटले, डॉ. सतीश देसाई, डॉ. शिवाजीराव कदम, उमेश कणकवलीकर, राजीव तांबे या वेळी उपस्थित होते.

कुमार सप्तर्षी यांनी सांगितले की, लोकांना समजून घेऊन त्यांचे वेदनाशमन करणे हे सामाजिक काम असून ती अगदी सहज गोष्ट आहे. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठातर्फे कुमार सप्तर्षी यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर केला आहे.

## अशीही ई-संवेदना

ग्रूपमधील एका सदस्याच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीच्या मुलाच्या शस्त्रक्रियेबाबत कळताच सदस्यांनी उत्स्फूर्तपणे सर्व आर्थिक भार उचलला. याबाबत तरवडे म्हणाले, ''जाणिवा-संवेदना केवळ कलेच्या आस्वादापुरत्या मर्यादित न ठेवता भोवतालच्या घटनांबाबत आवश्यक ते सक्रिय समाजभान दाखवण्याचा आमचा प्रयत्न असतो, त्याचाच एक भाग म्हणून आम्ही हे केले.''

सोशल नेटवर्किंगचा अनसोशल चेहरा समोर येण्याच्या या काळात काही फेसबुकप्रेमींनी मात्र या ऑनलाइन चावडीवर एकत्र येत साहित्यसूर जुळवले आहेत. ई-साहित्य निर्मिती, अभिवाचन व मुक्तसंवादासारखे अनोखे उपक्रम करण्यासाठी विविध शहरांतील हे साहित्यप्रेमी रसिक 'रिगल कट्टा'वर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी एकत्र येत असतात.

वाङ्मय मंडळे वा साहित्य संघ असे शब्द मराठी माणसाला नवे नाहीत. मात्र सोशल मीडियाच्या आभासी जगात एकमेकांशी जोडून घेतल्यानंतर निखळ साहित्य संवादासाठी प्रत्यक्ष एकत्र येत 'रिगल मित्र समूह' ई-विश्वाचा आश्वासक चेहरा समोर आणू पाहत आहे. या कट्ट्यावर आजघडीला ऐंशी सक्रिय सदस्य आहेत.

दरम्यान गेल्या वर्षी पुण्यात ग्रूपने एक स्नेहमेळावा आयोजित केला. सोबतच 'गाणारे घर' नावाचा ललित लेखनाच्या अभिवाचनाचा प्रयोगही काही काळापूर्वी रंगला. नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या महिलांचे कार्यकर्तृत्व उलगडणारा 'नोबेल ललना' हा कार्यक्रम साकारणार आहोत. ग्रूपतर्फे नुकतेच 'रिगल' नावाचे ई-मासिक सुरू केले आहे.

## 'नाही लोकप्रिय तरी' या पुस्तकाचे प्रकाशन

मेनका प्रकाशनातर्फे बर्ट्रांड रसेल यांच्या 'अनपॉप्युलर एस्सेज' या डॉ. करुणा गोखले यांनी अनुवादित केलेल्या 'नाही लोकप्रिय तरी' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले. परिसंवादात माजी खासदार प्रदीप रावत, राजीव साने यांनीही सहभाग घेतला.

'भारतातील वातावरण वाटते तितके गंभीर नाही. आपल्या देशाचा पाया भक्कम असल्याने लोकशाही धोक्यात आल्याची भीती अनाठायी आहे. देशाच्या प्रागतिक प्रतिमेमागे उदारमतवाद नक्कीच आहे. विज्ञानवाद वाढताना रसेल यांच्यासारख्या तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचे महत्त्व वाढत जाणार आहे,' असे रावत यांनी सांगितले. आताच्या काळात स्वैरसापेक्षतावाद टाकून देण्याची गरज निर्माण झाली असल्याचे सांगून साने म्हणाले, 'उदारमतवाद प्रत्येकाची ठायी असला पाहिजे. धर्म जाऊन विज्ञान आल्यावरही तत्त्वज्ञानाची गरज संपत नाही.'

## आदिवासी फोटो प्रदर्शन

बालमुद्रा रिसर्च अँड डेव्हलपमेंट ट्रस्टतर्फे आंतरराष्ट्रीय आदिवासी दिनाच्या औचित्याने फोटोग्राफर श्रीकृष्ण परांजपे यांच्या ‘ट्रायबल इंडिया : अ फोटोग्राफिक जर्नी’ हे फोटो प्रदर्शन नुकतेच झाले. शंकरशेठ रोडवरील कुमार पॅसिफिक मॉलमध्ये झालेल्या या प्रदर्शनात आठ राज्यांतील चाळीस आदिवासी जमातींच्या जीवनाचा वेध घेणारे ५०० फोटो मांडण्यात आले होते. त्यात आदिवासी चेहरे, घरे, वस्त्या, पेहराव, दागिने, कला, सण, उत्सव, नृत्य, वाद्ये, देवता, स्मारके आदींचा समावेश होता. आदिवासी संस्कृतीच्या दृश्य दस्ताऐवजीकरणाचे काम करत असलेले परांजपे फोटोंच्या माध्यमातून ‘द वर्ल्ड ऑफ ट्रायबल चिल्ड्रन’ हे पुस्तकही साकारणार आहेत.

## ‘गुरुकुल रंगदालन’ चित्रप्रदर्शनाचे आयोजन

चित्रकार विलास कुलकर्णी यांच्या विद्यार्थ्यांचे ‘गुरुकुल रंगदालन’ हे चित्रप्रदर्शन बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनात निसर्गचित्रे, जुने वाडे, व्यक्तिचित्रे यांचा समावेश होता. कुलकर्णी यांचे निसर्गचित्रणाचे प्रात्यक्षिकही झाले.

## ‘ज्ञानोत्सव’ पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन

ज्ञानगंगातर्फे ‘ज्ञानोत्सव’ या पुसतकाचे प्रदर्शन ज्येष्ठ कॉम्प्युटर तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. उद्‌घाटनानंतर अध्यात्म, विज्ञान आणि ग्रंथसंस्कृती या विषयावर गिरीश अत्रे यांनी भटकर यांच्याशी संवाद साधला.

## डिजिटल गौरवग्रंथ

गेल्या पन्नास वर्षांत स्पर्धेत सातत्याने बदलणारे ट्रेंड या विषयावर आधारित ‘डिजिटल गौरवग्रंथ’ तयार करण्यात आला आहे. यात ‘पुरुषोत्तम’मध्ये सहभाग घेतलेल्या रंगकर्मींनी दृक्‌श्राव्य माध्यमातून आठवणींना उजाळा दिला आहे. तसेच कोलाज, फोटोंची खास ‘रंगवही’ तयार करण्यात आली आहे. २१ डिसेंबर रोजी ‘नाटक असं असतं राजा’ ही पुरुषोत्तम रजनी सादर होणार असून त्यात अनेक कलाकार सहभागी होणार असल्याचे माहिती केमकर यांनी दिली.

## सतीश आळेकर घेणार मास्टर क्लास

ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर २२ ते २७ सप्टेंबर या कालावधीत युवा रंगकर्मीचा मास्टरक्लास घेणार आहेत. नाटकाच्या विषयी निवडीपासून ते सादरीकरणापर्यंतचा प्रवास या संदर्भात 'मास्टर क्लास'मध्ये मार्गदर्शन केले जाणार आहे.

## कथाकथनाच्या माध्यमातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे शब्द कथाकथनाच्या माध्यमातून वाचकांना ऐकता आले. महाराष्ट्र साहित्य परिषद आणि दलित साहित्य परिषदेच्या समारंभात बाळ आल्हाट आणि धर्मराज निमसरकर यांनी अण्णा भाऊंच्या 'सापळा', 'तरस' अशा विविध कथा सादर केल्या. या वेळी परिषदेचे कार्यवाह दीपक करंदीकर, दुर्योधन अहिरे उपस्थित होते.

## अत्रेंच्या जयंतीला सासवडमध्ये संमेलन

अष्टपैलू लेखक आचार्य प्र. के. अत्रे यांच्या जयंतीला (१३ ऑगस्ट) दोन दिवसांचे विभागीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते,' अशी माहिती आयोजक संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते व महाराष्ट्र साहित्य परिषद सासवड शाखेचे अध्यक्ष रावसाहेब पवार यांनी दिली.

ज्येष्ठ पत्रकार व काही काळ अत्रे यांचे लेखनिक असलेले मधुकर भावे संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले असून बेळगाव 'तरुण भारत'चे संपादक किरण ठाकूर उद्घाटक म्हणून उपस्थित राहीले होते. अत्रे विकास प्रतिष्ठानचे सहसचिव गौरव कोलते हे स्वागताध्यक्ष होते. १४ ऑगस्ट रोजी समारोपाच्या कार्यक्रमास अत्रे यांचे नातू व प्रसिद्ध पंडित राजेंद्र पै उपस्थित होते. कथा-कथन, परिसंवाद, कविसंमेलन, बालआनंद मेळावा तसेच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे  आयोजन करण्यात आले होते.

## भूमिकेसाठी सखोल अभ्यास हवा : आनंद इंगळे

सामाजिक प्रश्न इतिहास दाखवणाऱ्या भूमिका सादर करताना सखोल अभ्यास आणि कौशल्य आत्मसात केल्यास हमखास यश मिळते, असे

विचार अभिनेते आनंद इंगळे यांनी मांडले. अभिइम्पॅक्ट लॉजिस्टिक सोल्यूशन्सतर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. चित्रपट-नाट्य क्षेत्रातील योगदानासाठी इंगळे यांच्यासह अभिनेत्री विभावरी देशपांडे, सुरेखा कुडची यांना संस्थेचे जितेंद्र जोशी यांच्या हस्ते गौरवण्यात आले. तसेच पर्यटन क्षेत्रातील योगदानासाठी झेलम चौबळ यांचा सत्कार डॉ. ज्योत्स्ना जोशी यांनी केला.

## ‘निर्झर’ या ४२ कवितांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

ज्योत्स्ना स्मृती प्रकाशनतर्फे रश्मिकांत यांचा ‘निर्झर’ हा ४२ कवितांचा काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. निवृत्तीनंतर काव्यलेखनाकडे वळलेल्या रश्मिकांत यांनी सामाजिक, निसर्ग, भावप्रधान कविता लिहितानाच टेनिस या खेळावरही कविता लिहिली आहे. साध्या-सोप्या शब्दांतून मनातील भावनेला त्यांनी प्रभावीपणे मांडले आहे. पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. मनोहर जाधव यांनी काव्यसंग्रहाची प्रस्तावना लिहिली आहे.





फ्रँकलिन
आणि हॅरिएट

मूळ लेखिका
पोलेत बूर्ज्वा

अनुवाद
मंजूषा आमडेकर

किंमत : ५०/-रु.
पोस्टेज :३०/-रु.

**६वी आवृत्ती**

# डोंगरी ते दुबई

**मुंबईतील माफियांची साठ वर्षे**

लेखक
एस. हुसेन झैदी

अनुवाद
अशोक पाध्ये

**किंमत : ३५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




मुंबईवर ६० वर्षे गुंडांच्या टोळ्या चालवणाऱ्या माफियांचा प्रभाव होता. त्यात हाजी मस्तान, करीम लाला, वरदराजन मुदलियार, छोटा राजन, अबू सालेम होते. पण या सर्वांवर कडी केली ती दाऊदने. या सर्वांची तपशीलवार माहिती काढून अभ्यासपूर्वक त्यांच्यावर लिहिलेले हे पहिलेच पुस्तक आहे. एका साध्या शाळकरी पोरापासून टोळीच्या दादापर्यंत दाऊदची उत्क्रांती कशी होत गेली, दाऊदने पोलिसांचा उपयोग करून आपल्या प्रतिस्पर्ध्यांना कसे निपटले आणि शेवटी तो मुंबई पोलिसांचा एकमेव सूडकरी कसा बनला, याचे वर्णन यात आहे.

हे पुस्तक म्हणजे मुंबईतील गुन्हेगारीचा एक अधिकृत इतिहास आहे. एका पोलीस कॉन्स्टेबलचा मुलगा दाऊद याने पठाणांच्या टोळीला कसे निपटले, पहिली सुपारी कशी दिली गेली व शेवटी दुबईतून दाऊद कसा पाकिस्तानात पळून गेला, याचे थरारक वर्णन पुस्तकात आले आहे.



# पुरस्कार

## लक्ष्मीकांत देशमुख यांना 'साहित्यदीप'

'प्रत्येक साहित्यकार मानवी जीवनातील क्षण त्याच्या साहित्यातून टिपण्याचा प्रयत्न करत असतो. संघर्षमय मानवी जीवन हे साहित्यकारच्या लेखनाचा केंद्रबिंदू असते,' अशी भावना फिल्मसिटीचे संचालक आणि साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केली.

साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांच्या हस्ते देशमुख यांना साहित्यदीप पुरस्कार प्रदान करण्यात आला. साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, ज्येष्ठ समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस, चंद्रशेखर मोरे, प्रतिष्ठानच्या ज्योती चांदगुडे, कवी अनिल कांबळे, धनंजय तडवळकर आदी या वेळी उपस्थित होते.

लेखक सुचते म्हणून लिहितो, व्यक्त होण्यासाठी लिहितो. तसेच समानधर्मी वाचक दाद देतील या अपेक्षेनेही लिहितो, असे सांगून देशमुख म्हणाले, 'मला माणसाच्या जीवनाविषयी विलक्षण कुतूहल आहे. मानवी जीवन अगम्य असते. कोणत्याही प्रकारच्या वागण्याचा कसलाच तर्क लावता येत नाही. माणसे वाचून त्यांचा संघर्ष हे साहित्याचे बीज ठरते.'

'माणसांच्या भावभावना, प्रश्न, उत्तरे, भरडून जाणे, आनंद या सगळ्याचे प्रतिबिंब साहित्यात उतरले पाहिजे. कारण साहित्य हे माणसांसाठी असते. सध्या मराठी साहित्यात आश्वासक चित्र आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील माणसे त्यांचे अनुभव साहित्याच्या माध्यमातून मांडत असल्याने नवे साहित्य ताकदीने निर्माण होत आहे,' असे वैद्य म्हणाल्या.

अविनाश सप्रे म्हणाले की, कोल्हापूरला जिल्हाधिकार म्हणून काम करताना शाहू स्मारक भवनाची केलेली उभारणी, कोल्हापूर फिल्म क्लबचे पुनरुज्जीवन, नाटक करणाऱ्यांसाठी रंगीत तालीम करण्याची जागा अशी

विविध कामे करून देशमुख यांनी तेथील सांस्कृतिक जीवन समृद्ध केले. ‘लेक वाचवा’ मोहिमेमध्ये तर त्यांना ‘आदर्श जिल्हाधिकारी’ हा पुरस्कारही लाभला आहे.

लेखन आणि प्रशासन माझ्या आयुष्याच्या दोन बाजू आहेत’ असे प्रांजळपणे सांगत लेखनप्रपंच मांडणाऱ्या लक्ष्मीकांत देशमुख यांना उदगीर (जि. लातूर) येथील ३६व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदाचाही सन्मान मिळाला. मूळचे नांदेड जिल्ह्यातील देशमुख तडफदार सनदी अधिकारी म्हणून परिचित आहेत. अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी पदानंतर सध्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या संचालकपदी कार्यरत आहेत. इयत्ता आठवीत असताना देशमुख यांची पहिली बालकथा प्रसिद्ध झाली. कॉलेजात कथालेखनाला अधिक धुमारे फुटले. त्यांची आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा वेध घेणारी ‘इन्किलाब विरुद्ध जिहाद’ कादंबरी विशेष गाजली आहे. ‘अंधेरनगगरी’, ‘ऑक्टोपस’, ‘सलोनी’ या कादंबऱ्यांनाही वाचकांची पसंती लाभली. ‘पाणी पाणी’, ‘नंबर वन’, ‘अंतरीच्या गूढगर्भी’, ‘अग्निपथ’,‘कथांजली’, ‘सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी’ या कथासंग्रहांमुळे देशमुखांचे लेखनकौशल्य चर्चेत आले आहे.

## हरिहरन यांना ‘वसुंधरा पंडित स्मृती पुरस्कार’

पुणे भारत गायन समाजातर्फे दरवर्षी दिला जाणारा ‘कै. सौ. वसुंधरा पंडित स्मृती पुरस्कार’ यंदा ज्येष्ठ पार्श्वगायक आणि गझल गायक हरिहरन यांना ज्येष्ठ वाद्यवृंद संयोजक केरसी लॉर्ड यांच्या हस्ते देण्यात आला आहे. या वेळी संतूरवादक पं. उल्हास बापट, संस्थेच्या अध्यक्षा शैला दातार, शोभा गोखले, अरुणा गवाणकर उपस्थित होते. पुरस्कार वितरण समारंभानंतर हरिहरन यांनी ‘शहर दर शहर लिए फिरता हूँ तनहाई को’, ‘मै खयाल हूं किसी और का....’ या गझल सादर केल्या.

हा रंगतदार गझल सोहळा आणि बाहेर भुरभुरती बरसात..... यांनी वातावरण अधिकच सुरेल आणि मधुर केले होते. गझलेतील वेदना पुरेपूर जाणवून देणारा हरिहरन यांचा स्वर या मैफिलीत काळजाचा ठाव घेत होता. मेहदी हसन यांची गाजलेली आणि अत्यंत लोकप्रिय अशी ‘रंजिश हा सही’ ही गझलही हरिहरन यांनी पेश केली. ‘मेहंदी हसन स्कूल’चा त्यांनी या वेळी

अतिशय आदराने उल्लेख केला.

अनेक मान्यवरांना यापूर्वी मिळालेल्या या पुरस्कारासाठी खरे तर मी पात्र नाही; पण माझ्या गुरूंचा सन्मान म्हणून मी हा पुरस्कार स्वीकारत असल्याची भावना हरिहरन यांनी या वेळी व्यक्त केली. आईप्रमाणेच त्यांनी गुलाम अली खाँ, मेहदी हसन हेही माझे गुरू आहेत, असा आवर्जून उल्लेख केला. 'नवी पिढी रिॲलिटी शोजकडे ओढली जात असताना त्यांच्यापर्यंत भारतीय शास्त्रीय संगीत पोहोचवणं अधिक आवश्यक बनले आहे,' असे पं. बापट यांनी व्यक्त केले. अरुण नूलकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या वेळी दत्तप्रसाद रानडे आणि लता देव यांचे गझल गायनही झाले.

## दाजीकाका यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार

पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स प्रा. लि. व्या १८२ वर्षांच्या सुवर्ण परंपरेचे पाईक असलेले (कै.) दाजीकाका गाडगीळ यांना त्यांच्या सराफी व्यवसायातील कामगिरीसाठी दहाव्या रिटेल ज्वेलर्स अॅवॉर्डतर्फे मरणोत्तर जीवनगौरव पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक सौरभ गाडगीळ, वैशाली गाडगीळ, पराग गाडगीळ यांनी दाजीकाकांच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

या वेळी सौरभ गाडगीळ म्हणाले, ''दाजीकाका केवळ माझे आजोबा नव्हते, तर माझे गुरूदेखील होते. त्यांच्या वतीने हा सन्मान स्वीकारणे माझ्याकरिता अभिमानाची गोष्ट आहे. त्यांची शिकवण आमची येणारी प्रत्येक पिढी अंगीकारेल.''

## लोकमान्य टिळक स्मृती सन्मान डॉ. चंदर यांना प्रदान

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्ट या संस्थेतर्फे डॉ. चंदर यांना लोकमान्य टिळक स्मृती सन्मान प्रदान करण्यात आला. ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक आणि सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते हा कार्यक्रम झाला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. चंदर बोलत होते. महापौर चंचला कोद्रें, ट्रस्टचे विश्वस्त विष्णुपंत मेहेंदळे, डॉ. रोहित टिळक, प्रणती टिळक आदी या वेळी उपस्थित होते.

'आधुनिक तंत्रज्ञानाने समस्या निर्माण होतात. या समस्यांवर तंत्रज्ञानच

उपाय सांगते. तंत्रज्ञानाच्या किती अधीन व्हायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. दर पाच वर्षांनी तंत्रज्ञान बदलत असताना तंत्रज्ञान आणि समाज यांची सांगड कशी घालायची हे शास्त्रज्ञांपुढील आव्हान आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा विचार करून शिक्षणामध्येही पुनर्रचना करण्याची गरज निर्माण झाली आहे,' असे मत संरक्षण संशोधक विकास संस्थेचे संचालक डॉ. अविनाश चंदर यांनी मांडले.

विनोद सातव यांनी सूत्रसंचालन केले. याच कार्यक्रमात रोहित टिळक यांनी लिहिलेल्या 'लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय अर्थशास्त्र' या पुस्तकाचे आणि इंदुताई टिळक यांनी लिहिलेल्या 'लोकमान्यांचे लोकमान्य' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

सशक्त भारताचे लोकमान्य टिळकांचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे सांगून डॉ. चंदर म्हणाले, 'टिळकांच्या स्वदेशीच्या सूत्रानेच क्षेपणास्त्रे, विमाने, आत्याधुनिक शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यात येत आहे. संरक्षण संशोधक विकास संस्थेकडून निर्माण केल्या जाणाऱ्या शस्त्रांमुळे हवाई दलाने शस्त्रांची आयात न करण्याचा निर्णय घेतला आहे.'

युवा पिढी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यमुळे २०२८ पर्यंत भारत चीनला मागे टाकेल. सोशल मीडियाच्या गैरवापराचे आव्हान देशापुढे आहे. मात्र, योग्य शिक्षण हाच त्यावरील उपाय आहे. मानवरहित हवाई दल हे या शतकाचे मुख्य उद्दिष्ट ठरणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## सिंधूताई सपकाळ यांना प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृतिसन्मान प्रदान

प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती समितीतर्फे 'प्राचार्य शिवाजीराव भोसले हा स्मृतिसन्मान' सिंधूताई सपकाळ यांना संस्कृतच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सरोजा भाटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

समितीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, खजिनदार रंजना भोसले, अरुण भोसले आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात रागिणी पुंडलिक, प्रकाश बोकील यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे व्याख्यान ऐकून सपकाळ म्हणाल्या, 'आजपर्यंत आलेल्या संकटांनीच खंबीरपणे उभे राहण्याची शिकवण दिली. म्हणून संकटांचे आभारच मानले पाहिजेत. आपण आपले खांदे मजबूत करण्याची गरज आहे. कारण, संकटे येतच असतात. त्याला डगमगून न

जाता जगत राहिले पाहिजे. जगण्याला कोणताही पर्याय नसतो. संसार म्हणजे चिखल-पाण्याचे नाते असते. त्यामुळे पत्नीने पतीला माफ करावे आणि पतीने पत्नीशी मायेचे दोन शब्द बोलावेत.'

## अक्षयाला आंतरराष्ट्रीय दर्जाचा पुरस्कार

राजगुरुनगर येथील अक्षया राशीनकर (वय १८) या मुलीने जादूचे प्रयोग क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील 'मर्लिन' पुरस्कार मिळवला. इंटरनॅशनल मॅजिशियन सोसायटीच्या वतीने नुकत्याच हैदराबाद येथे झालेल्या स्पर्धेत तिने हे यश संपादन केले आहे.

केरळ, तमिळनाडू, गुजरात, महाराष्ट्रासह अन्य देशांतील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. जादूगार टोनी हुसेनी (अमेरिका), ममाटा (बँकॉक), राजकुमार (दिल्ली) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. अक्षयाला यापूर्वी वेगवेगळे २५पुरस्कार मिळाले असून, त्यापैकी तीन पुरस्कार हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील आहेत. सोसायटी ऑफ इंडियन मॅजिशियन संस्थेतर्फे २०११ मध्ये झालेल्या स्पर्धेत तिला द्वितीय क्रमांक मिळाला होता.

राजगुरुनगरमध्ये मराठी माध्यमात शिकलेली अक्षया आज देशभर इंग्रजी आणि हिंदीत जादूचे प्रयोग सादर करत आहे. जादूगार असलेले वडील प्रिन्स यांच्याकडून लहानपणापासूनच ही कला शिकल्याचे तिने सांगितले.

पहिलीपासूनच जादूचे प्रयोग करणारी अक्षया आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकलेली पहिली महाराष्ट्रीय जादूगार आहे.

## आनंद प्रभुदेसाई यांना बालगंधर्व गुणगौरव पुरस्कार देण्यात आला.

बालगंधर्व संगीत रसिक मंडळातर्फे गायक आनंद प्रभुदेसाई यांना यंदाचा बालगंधर्व गुणगौरव पुरस्कार, तसेच लताफत हुसेन काझी यांना अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार आणि ज्येष्ठ तबलावादक नाना मुळे यांना सावळो केणी पुरस्कार देण्यात आले. प्रत्येकी दहा हजार रुपये, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. बालगंधर्व यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून बालगंधर्व रंगमंदिर येथे माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, बांधकाम व्यावसायिक एन. जी. कुलकर्णी आणि विठ्ठल संकपाळ या वेळी उपस्थित होते. माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. गायिका राजश्री ओक यांना नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर पुरस्कार,

चंद्रकांत धामणीकर आणि ज्येष्ठ ऑर्गनवादक पं. जयराम पोतदार यांना गोंविद बल्लाळ देवल पुरस्काराने गौरविण्यात आले. अजित भालेराव आणि सुनीता गुणे यांना द. कृ. लेले पुरस्कार प्रदान करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष सुरेश साखवळकर यांनी सूत्रसंचालन केले.

'उत्तम संगीत नाटक हे मनोरंजनाबरोबर उत्तम समाजाची निर्मिती करण्याचे काम करते. समाजप्रबोधनाचे उत्तम साधन म्हणजे संगीत नाटक होय. त्यामुळे संगीत नाटकाचे पुनरुज्जीवन होणे ही काळाची गरज आहे,' असे मत माजी राष्ट्राध्यक्ष प्रतिभा पाटील यांनी व्यक्त केले.

प्रतिभाताई पाटील म्हणाल्या, की बालगंधर्वांच्या काळातील नाटके मानवी जीवनावर भाष्य करणारी होती. संगीत नाटकांच्या माध्यमातून उत्तम समाज घडवता येतो, असा विश्वास त्या काळातील कलाकारांमध्ये होता. सध्याचे तरुण पाश्चात्त्य संस्कृतीत रममाण होताना दिसत आहेत. त्यांना जीवनाचा योग्य मार्ग दाखविण्यासाठी संगीत नाटकांनी महत्त्वाची भूमिका बजावणे गरजेचे आहे. मात्र, त्यासाठी संगीत नाटकांना पुनरुज्जीवन देण्याची आवश्यकता आहे. संगीत नाटकांना पुनरुज्जीवन देण्याची जबाबदारी फक्त कलाकारांची नसून त्यासाठी रसिक व संपूर्ण समाजाने पुढाकार घेण्याची गरज आहे.

प्रभुदेसाई यांनी सांगितले की माझ्या शरीरापेक्षाही माझे स्वरांवर जास्त प्रेम आहे. संगीतातील ताकद, बालगंधर्वांचा आशीर्वाद आणि रसिकांचे प्रेम हीच आजवरच्या यशाची त्रिसूत्री आहे.

## 'मोस्ट इम्पॅक्टफुल' पुरस्कार

अतिग्रे (ता. हातकणंगले) येथील संजय घोडावत इन्स्टिट्यूशनला लंडन येथे झालेल्या ग्लोबल इंडियन एक्सलन्स समीट २०१४ शिखर परिषदेत मोस्ट इम्पॅक्टफुल एज्युकेशन इन्स्टिट्यूशन म्हणून गौरविण्यात आले. 'लीड द चेंज' या विषयावर ही परिषद झाली.

वर्ल्ड कन्सल्टिंग अँड रिसर्च कॉर्पोरेशतर्फे हा पुरस्कार देण्यात आला. संजय घोडवत इन्स्टिट्यूशनचे अध्यक्ष आणि उद्योगपती संजय घोडावत यांनी हा पुरस्कार उद्योजक लॉर्ड स्वराज्य पॉल यांच्या हस्ते स्वीकारला. या परिषदेत लंडन व देशातील २५ सर्वांत जास्त प्रभावशली संस्थांची यादी जाहीर करण्यात आली. त्यात संजय घोडावत इन्स्टिट्यूनशनचा समावेश

आहे. भविष्यात होणाऱ्या नव्या बदलाबाबत मोलाचे योगदान ही संस्था देणार आहे.

पुरस्कारासाठी विद्यार्थी प्रवेश, भौतिक सुविधा, गुणवत्ता, प्रभावी अध्यापन, प्लेसमेंट आदी निकषांची तपासणी करण्यात आली.

## अशोक रानडे यांना 'संगीत भूषण पुरस्कार'

'ग्वाल्हेर घराण्याची गायकी अष्टांगप्रधान आहे. स्वरलयीचा उत्तम मेळ साधल्यामुळे रसिकांना या गायकीतून श्रवणानंद सहजतेने घेता येतो. शिस्तबद्ध मांडणी, लय आणि लयकारी, गतिमानता ही या गायकीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत,' अशा शब्दांत ग्वाल्हेर घराण्याची महती ज्येष्ठ गायक पंडित विद्याधर व्यास यांनी व्यक्त केली.

गानवर्धन संस्थेतर्फे बुजुर्ग गायक पं. त्र्यंबकराव जानोरीकर यांच्या नाकचा 'संगीत भूषण पुरस्कार' निवृत्त पत्रकार आणि संगीत समीक्षक अशोक रानडे यांना व्यास यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष कृ. गो. धर्माधिकारी, पं. जानेरीकर यांच्या शिष्या पंडिता डॉ. सुहासिनी कोरटकर, विद्यापीठाच्या ललित कला केंद्राच्या प्रमुख डॉ. शुभांगी बहुलीकर, संस्थेचे विश्वस्त प्रसाद भडसावळे उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर पं. व्यास हे 'मुक्त संगीत चर्चासत्रा'त सहभागी झाले होते.

रानडे म्हणाले, ''संगीत मैफलींचा विश्लेषणात्मक आस्वाद मी समीक्षेच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचविला. चोखंदळ रसिक निर्माण करणे हा माझ्या लेखनाचा हेतू होता.'' पं. व्यास यांनी आपल्या मुक्त संगीत चर्चासत्राची सुरुवात 'राग श्री'ने केली.

## दहाव्या 'टॅग' पुरस्काराचे वितरण

साहित्यिक ह. मो. मराठी हे सोमवारी 'द ॲक्टिव्ह ग्रूप' तर्फे जाहिरात संस्थांना देण्यात येणाऱ्या दहाव्या 'टॅग' पुरस्कार वितरणप्रसंगी बोलत होते. या वेळी नृत्यांगना डॉ. सुचेता भिडे-चाफेकर, ॲक्टिव्ह ग्रूपच्या सुमती दिघे उपस्थित होत्या. या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पंचवीस संस्थांना पुरस्कार देण्यात आले. छायाचित्रण, संपादन, कौशल्य, मुद्रित कौशल्य, लेखन, कल्पकता याबाबत पारितोषिके देण्यात आली. यामध्ये सुमारे नव्वद संस्थांनी भाग घेतला. पुण्यासह नागपूर, नाशिक, औरंगाबाद, नगर,

अमरावती येथील संस्थांनी कलाकृती सादर केल्या.

मराठे म्हणाले, ''वाचकांची बावड आणि समज यांचा काळजीपूर्वक विचार करून जाहिरात केली जावी. या क्षेत्रांतील आव्हाने आणि दूरचित्रवाहिन्यांचा प्रसार पाहता येत्या काळात स्पर्धाही निश्चित आहे.'' डॉ. चाफेकर म्हणाल्या, ''चित्रकलेविषयी आत्मीयता असल्याने त्यातील नवीन प्रयोगांचे कौतुक वाटते. गायन आणि नृत्य या कलाही 'अप्लाइड आर्ट'चाच एक भाग आहेत.''

## दि पूना मर्चंट्स चेंबरतर्फे वालचंद संचेती यांचा गौरव

दि पूना मर्चंट्स चेंबरतर्फे अमृतमहोत्सवानिमित्त अध्यक्ष वालचंद संचेती यांच्या गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महापौर चंचला कोंद्रे, उपमहापौर सुनील गायकवाड, आमदार गिरीश बापट, माधुरी मिसाळ, माजी आमदार चंद्रकांत छाजेड, चेंबरचे उपाध्यक्ष प्रवीण चोरबोले, सचिव जवाहरलाल बोथरा आदी उपस्थित होते. या वेळी संचेती यांचा सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

वालचंद संचेती यांनी वेळप्रसंगी सरकारच्या विरोधात जाऊन नागरिकांच्या हितासाठी आंदोलने केली. व्यापारी म्हणून काम करत असतानाच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेली कामगिरी देखील उल्लेखनीय आहे.

शिक्षण घेतले की माणसे बदलतात, त्याचे विचार बदलतात मात्र, वालचंदसेठ यांनी काम करताना कायमच सामान्य माणसांसाठी काम करण्याची प्रवृत्ती ठेवली असे धारिवाल म्हणाले.

मध्यंतरीच्या काळात 'एलबीटी'चा प्रश्न गंभीर बनला होता. मात्र, त्यामध्ये व्यापाऱ्यांच्या हिताचा निर्णय निघाला नाही. संचेती यांनी केलेले काम मोठे आहे, त्यामुळे पक्षाची बंधने झुगारून आम्ही त्यांचे मार्गदर्शन घेत असल्याचे आमदार बापट म्हणाले. 'यश ही प्रक्रिया आहे, त्यामध्ये अडथळ्याचे दगड येत असतात. मात्र, आपण कारकिर्दीलाच मैलाचा दगड मानत काम करत राहिलो,' अशी भावना संचेती यांनी व्यक्त केली. पूर्वी नाना आणि भवानी पेठेत व्यापार होता, त्या वेळी पालिकेकडून त्या ठिकाणी जड वाहनांना बंदी घालण्यात आली होती. त्यांनी पालिकेमधून बंदी रद्द करून घेतल्याची आठवणही छाजेड यांनी सांगितली.

## किशोर पुरेकर यांना शिल्पगौरव पुरस्कार

शिल्पकार बी. आर. प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा यंदाचा 'शिल्पगौरव' पुरस्कार कोल्हापुरातील युवा शिल्पकार किशोर पुरेकर यांना कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त हा पुरस्कार दिला जात असून, पुरस्काराचे यंदा पाचवे वर्ष आहे. रोख अकरा हजार, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. शिल्पगौरव पुरस्कारासह विविध कला क्षेत्रांतील कलावंतांचा गौरव केला जातो. तसेच अंध, अपंग व सामाजिक संस्थांना आर्थिक साह्य दिले जाते.

या प्रसंगी शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार, खासदार अनिल शिरोळे, महापौर चंचला कोद्रे आदी उपस्थित होते.

## अनिल मेहेर यांना 'कृषिरत्न'

कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्य सरकारकडून दिले जाणारे २०१३ वर्षासाठीचे विविध कृषी पुरस्कार जाहीर झाले. यामधील सर्वोच्च डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार वारुळवाडी (ता. जुन्नर) येथील अनिल मेहेर यांना मिळाला आहे. सकाळचे भवानीनगर (ता. इंदापूर) येथील बातमीदार ज्ञानेश्वर रायते व रेठरे बुद्रुक (जि. सातारा) येथील बातमीदार अमोल जाधव यांना कृषिमित्र पुरस्कार जाहीर झाला आहे.

पुणे जिल्ह्यातील पुरस्कारप्राप्त अन्य शेतकऱ्यांमध्ये महादेव बापूराव शेंडकर (रा. पिंपरी, ता. पुरंदर), श्रीराम सखाराम गाढवे (आर्वी, ता. जुन्नर) या दोघांना वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार; संतोष महादेव राऊत (निमगाव केतकी, ता. इंदापूर), दौलत नारायण भाकरे (माळवाडी, ता. शिरूर) यांना सर्वसाधारण गटातील वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार; लक्ष्मीकांत सुदाम रेंगडे (खामगाव, ता. जुन्नर) यांना आदिवासी गटातील शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार आणि भीमराव वसंतराव गाजरे (इनामगाव, ता. शिरूर) यांना उद्यानपंडित आदींचा समावेश आहे. राज्यपाल के. शंकरनारायणन यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले.

## दादा गुजर यांना डीएसके पुरस्कार जाहीर झाला.

डी. एस. कुलकर्णी फाउंडेशनचा 'डीएसके सेल्फ मेड मॅन पुरस्कार'

दादा गुजर यांना जाहीर झाला आहे. एक लाख रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

उस्मानाबाद येथील भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, निवांत अंध विकासालय आणि नगर जिल्ह्यातील महामानव बाबा आमटे सेवा संस्थांनाही समाजसेवेतील कार्याबद्दल पुरस्कार दिला जाईल.

## रवींद्र पंढरीनाथ यांना विभावरी पुरस्कार

अनुष्टुभ् प्रतिष्ठान व डॉ. म. सु. पाटील परिवाराच्या 'विभावरी पाटील वाङ्मय पुरस्कारा'साठी रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ यांच्या 'खेळघर' कादंबरीची निवड झाली आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. विजय काचरे, कार्यवाह सुभाष खैरे यांनी ही माहिती दिली. पंधरा हजार रुपये व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखालील डॉ. मंगला आठवलेकर व संतोष शेणई यांच्या निवड समितीने २०१३ मधील पुस्तकांमधून पुरस्कारासाठी या कादंबरीची निवड केली.

## प्रकाश साळवे यांना 'ग्रेट पँथर' पुरस्कार प्रदान

फुले-शाहू-आंबेडकर विचार मंचाच्या वतीने 'मानव जोडो और भाईचारा बढाओ' या अभियानांतर्गत दिला जाणारा 'ग्रेट पँथर' पुरस्कार पँथर नेते प्रकाश साळवे यांना नुकताच प्रदान करण्यात आला. नगरसेवक रवींद्र माळवदकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे. भारतीय संविधानाची प्रत, ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, बोधिवृक्ष आणि पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचारमंचाचे संस्थापक विठ्ठल गायकवाड होते.

## मिलिंद नाईक यांना आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ पंच बहुमान

पिंपरी-चिंचवड महानगर बुद्धिबळ संघटनेमार्फत खेळाचा प्रसार करणारे मिलिंद बाळकृष्ण नाईक यांनी नुकताच आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने घेतलेल्या जागतिक पंच परीक्षेत प्रावीण्य मिळविले. पिंपरी चिंचवड परिसरातील ते पहिलेच आंतरराष्ट्रीय पंच (फिडे आर्बीटर) आहेत. त्यांनी गेली ३४ वर्षे पिंपरी चिंचवड परिसरात अनेक राज्यस्तरीय स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले आहे. तसेच अखिल भारतीय स्तरावरील अनेक स्पर्धांमध्ये

पंच म्हणून काम केले आहे.

## डॉ. बी. आर. राव सर्पमित्र पुरस्कार रोम्युलस व्हिटेकर यांना प्रदान

भारतीय सर्पविज्ञान संस्थेचा डॉ. बी. आर. राव सर्पमित्र पुरस्कार चेन्नई येथील प्रख्यात सर्पतज्ज्ञ रोम्युलस व्हिटेकर यांना वनमंत्री डॉ. कदम यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. रोख रक्कम पंचवीस हजार रुपये व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

या कार्यक्रमास मुख्य वनसंरक्षक नितील काकोडकर, जीत सिंग, सुनील लिमये, डॉ. एरीक भरूचा, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त राजेंद्र जगताप, आदी उपस्थित होते.

व्हिटेकर यांनी १९६९ मध्ये भारतातील पहिले सर्पोद्यान चेन्नईमध्ये उभारले. त्याद्वारे त्यांनी सर्पविज्ञानाच्या अभ्यासाची मुहूर्तमेढरोवली. यातूनच पुढे सर्पसंवर्धनाची चळवळ उभी राहिली. साप पकडणाऱ्या इरुला या दक्षिण भारतातील जमातीच्या उद्धारासाठी त्यांनी सहकारी विष संकलन संस्था स्थापन केली. भारतभर संपदंशावरील लस बनविण्यासाठी याच संस्थेतून विष पुरवले जाते.

## श्रीकांत मोघे यांना इंदिरा भालचंद्र पुरस्कार

मास्टर दत्ताराम बापूंचे व्यक्तिमत्त्व जाणून घेण्यासाठी त्यांना भेटायला गेलो आणि मी नट झालो. बापू भेटले नसते मी नट झालो नसतो, अशी भावना ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे यांनी व्यक्त केली.

पुणे नगर वाचन मंदिरातर्फे देण्यात येणारा डॉ. वि. भा. देशपांडे पुरस्कृत 'इंदिरा भालचंद्र पुरस्कार' डॉ. अजय वैद्य यांनी संपादित केलेल्या 'नाट्यवीर' या ग्रंथास ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे यांच्या हस्ते रविवारी धन्वंतरी सभागृह येथे देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी माधव सोमण होते. या वेळी सतीश देसाई, डॉ. अजित वैद्य, डॉ. वि. भा. देशपांडे उपस्थित होते,

मोघे म्हणाले, ''नाटक गंभीरपणे घेण्याची गोष्ट आहे; कारण, त्याच्या माध्यमातून माणसाच्या व्यथा कोणालातरी सांगणे आवश्यक असल्याची जाण दत्ताराम बापूंकडून आली. तसे बापूंना भेटल्यानंतरच ती आंतर्बाह्य नट असल्याची जाणीव झाली.''

## कसबे यांना ‘सुगावा’ पुरस्कार

सुगावा प्रकाशनतर्फे डॉ. रावसाहेब कसबे यांना पानसरे यांच्या हस्ते ‘सुगावा पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य आणि सुगावाचे विलास वाघ उपस्थित होते.

आपल्याकडे वैचारिक, सामाजिक व राजकीय क्रांती झाली त्याचे श्रेय ब्रिटिशांना द्यावे लागले, असे मत डॉ. कसबे यांनी व्यक्त केले.

## राज्य मध्यवर्ती सहकारी बँकेस विशेष पुरस्कार

राज्य मध्यवर्ती सहकारी बँकांचा राष्ट्रीय महासंघ असलेल्या ‘नॅफस्कॉब’ने अलीकडेच अहमदाबाद, गुजरात येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस २०१२-१३ आर्थिक वर्षासाठी ‘मार्गदर्शक तत्त्वांचे पालन’ या वर्गवारीत विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार राज्य बँकेचे व्यवस्थापकीय संचालक प्रमोद कर्नाड यांनी गुजरातचे आरोग्य राज्यमंत्री शंकरभाई चौधरी यांच्या हस्ते स्वीकारला. सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असलेल्या नॅफस्कॉबने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या देशातील निवडक राज्य सहकारी बँकांना या निमित्ताने पारितोषिक देऊन सन्मानित केले.

## अश्विनी लाला बनल्या मिसेस आशिया इंटरनॅशनल

मलेशियातील क्वालालंपूरमध्ये झालेल्या ‘मिसेस आशिया इंटरनॅशनल २०१४’ स्पर्धेत पुण्यातील अश्विनी लाला (जाधव) यांनी विवाहित गटातून किताब पटकावला.

आशियाई देशातील २७ हून अधिक स्पर्धक यात सहभागी झाले होते. अश्विनी यांनी पुणे विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग, तर कॅनडातून ‘एमबीए’चे शिक्षण घेतले आहे.

## डॉ. भटकर यांना नागभूषण पुरस्कार देण्यात येईल.

परम संगणकाचे जनक पद्मश्री डॉ. विजय भटकर यांना यंदाचा नागभूषण फाउंडेशनच्या वतीने पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. एक लाख रुपये आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## नंदन बाळ यांना दामले पुरस्कार

'कोट्यवधी लोकंख्या असलेल्या भारताला ऑलिम्पिकसह इतर स्पर्धांमध्ये केवळ बोटावर मोजण्याइतकी पदके का मिळतात? असा प्रश्न सर्वसामान्यांना नेहमीच पडतो. पण, स्पर्धांमध्ये अधिक पदके मिळवायची असतील, तर घरातच क्रीडा संस्कृती रुजवण्याची गरज आहे. पालकांनी आपल्या मुला-मुलींना खेळाचे महत्त्व पटवून देण्याची गरज आहे. नुसती टीका करत बसण्यापेक्षा खेळाडू घडविण्याची सुरुवात स्वत:च्या घरापासून करायला हवी,' असे मत भारतीय डेव्हिस संघाचे माजी प्रशिक्षक नंदन बाळ यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रीय मंडळाच्या वतीने देण्यात येणारा कॅ. शिवरामपंत दामले पुरस्कार नंदन बाळ यांना पुण्याचे पोलिस आयुक्त सतीश माथूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

त्या वेळी नंदन बाळ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, 'खेळामुळे स्वत:ला शिस्त लागते. ही शिस्त आयुष्यात खूप महत्त्वाची ठरते. मेहनत घेतली, तर यश आपोआप मिळते. खेळाला सर्वोच्च मानणाऱ्या व्यक्तींची आपल्याला गरज आहे.' मल्लखांब, योगासारखे खेळ युरोपात सक्तीचे करण्यात येत आहे. मात्र आपणच हे खेळ विसरत चाललो आहोत, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

या वेळी श्रीकांत बापट, रोहित टिळक, धनंजय दामले उपस्थित होते. कार्यक्रमात विविध परीक्षांत प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा, वर्षभरात विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या खेळाडूंचा, आदर्श शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला. लेफ्टनंट जनरल य. द. सहस्त्रबुद्धे यांच्या स्मरणार्थ क्रीडा पत्रकारासाठी दिला जाणारा पुरस्कार ज्येष्ठ क्रीडा पत्रकार मायकेल जोसेफ यांना, तर क्रीडा लेखनाचा पुरस्कार डॉ. संजीव सोनवणे यांना देऊन गौरविण्यात आले.

'इंटरनेटचा वापर घराघरात वाढल्याने मुलांमध्ये इंटरनेट स्पोर्टस् कल्चर वाढत आहे. मुले आता खेळ इंटरनेटवरच खेळ असतात. इंटरनेट स्पोर्टस्मुळे बाहेर जाऊन खेळण्याची प्रथा लोप पावत चालली आहे,' असे मत पोलिस आयुक्त सतीश माथूर यांनी व्यक्त केले.

## डॉ. शां. ब. मुजुमदार यांना ग्रेट टीचर पुरस्कार

फुले शाहू आंबेडकर विचार मंचातर्फे सिम्बायोसिसचे संस्थापक कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार यांना ग्रेट टीचर पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे. युवा उद्योजक संजय कांबळे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे राहुल तायडे होते.

**३री आवृत्ती**

# पाऊलवाटेवरले गाव

लेखिका
आशा बगे

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




एखादीच रिकामी होडी किनाऱ्याला. संथ पाण्यावरून पक्षी या तीरावरून त्या तीराकडे उडतात. दुपार कलते. थोडी थंड हवा सुटते.
कदाचित पाऊस येईलही...
हे तिच्या मनात राहून गेलेलं गाव तिलाही आता इतक्या काळानंतर जसंच्या तसं सापडणार नाही हे तिला कळलं.
आता हे पाणी संथ होतं. पण अशाही वेळा असतातच न!
की जेव्हा हे बेभान होतं, आपले तट सोडून सैरावैरा धावतं.
त्या पाण्याला मग कुणीही कळत नाही.
त्या वेळी ते पाणी नसतंच...
प्रलयच असतो. तो प्रलय केवळ पाण्यातच शिरत नाही.
तो मस्तकातच भिनत जातो.
या सगळ्यात माणसाच्या इच्छा अनिच्छेचा सन्मान कुठला!

१२वी आवृत्ती

# गुलमोहर

लेखक
व.पु. काळे

**किंमत : ११०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




गुलमोहराचं झाड केव्हाही छान दिसतं.
निळ्या-निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर ते जेवढ्या डौलानं शेंडे वर करून डुलतं, तेवढ्याच श्रीमंतीनं काळ्याभोर पावसाळी ढगांवरसुद्धा वैभवशाली दिसतं, भव्य वाटतं.
पण दिवाकरपंतांना गुलमोहराचं झाड आता बघवेना. तो त्यांचा पराभव होता. भंग पावलेलं स्वप्न होतं.
लाकूडतोड्या झाडावर सरड्याप्रमाणे चढला. वरच्या फांदीवर पहिली कुऱ्हाड बसली आणि त्या पहिल्या घावानं दिवाकरपंतांच्या अख्ख्या भूतकाळातील आठवणींवर तडाखा हाणला. दुसऱ्या घावासरशी त्यांचा भविष्यकाळ नष्ट केला. तिसरा घाव बसला आणि दिवाकरपंतांना प्लॉटचा वर्षवाढदिवस आठवला. घावा-घावागणिक आठवणींचा मोहर झोडपला जात होता. खाली पडणाऱ्या फांद्या चुकवीत-चुकवीत दिवाकरपंत तांबडी फुलं भराभर वेचत होते.
घावावर घाव बसत होते. झाडाची उंची कमी होत होती, दिवाकरपंतांचं स्वप्नही लहान-लहान होत होतं.




# द पार्टनर

एका मेलेल्या माणसाची भन्नाट रहस्यकथा...




लेखक : जॉन ग्रिशॅम

अनुवाद : विभाकर शेंडे

पृष्ठे ३७६ । किंमत ₹ ४०० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

*ब्राझिलमधील पॅराग्वे या सीमावर्ती भागातलं पोन्टा पोरा हे लहानसं टुमदार शहर. आजही तो भाग 'फ्रन्टिअर' म्हणून ओळखला जातो. त्यांना तो तिथे सापडला. मध्यभागापर्यंत गर्द झाडीने वेढलेल्या रुआ तिरादेन्तेस या परिसरात विटांनी बांधलेल्या पक्क्या घरात तो राहत होता. घराच्या आसपास तापलेल्या पदपथावर मुलं नेहमीच अनवाणी पायांनी फुटबॉल खेळत असत. आठवडाभर त्याच्यावर पाळत ठेवल्यानंतर त्यांना वेळीअवेळी ये-जा करणाऱ्या मोलकरणीशिवाय तिथं कोणीच आढळलं नाही. त्यामुळे तो एकटा असावा, असा त्यांनी अंदाज बांधला होता. अगदी ऐशारामात नसला, तरी आरामात, सुखाने तो राहत होता हे दिसून येत होतं. ते आटोपशीर घर कुणा स्थानिक व्यापाऱ्याचं असावं. त्याच्याकडेही चकचकीत लाल रंगाची १९८३ची फोक्सवॅगनची 'बीटल' गाडी होती. याच गाडीतून जात असताना, त्याच्या पाळतीवर असलेल्या त्यांनी त्याचा पहिला फोटो घेतला.*

या अगोदर शेवटचा जेव्हा त्यांनी त्याला पाहिला होता, तेव्हा तो जवळजवळ २५० पौंडांचा होता. आता मात्र तो फारच बारीक झाला होता. त्याचे केस आणि कांती अधिकच तरुण वाटत होती. त्याची हनुवटी पसरट व नाक थोडंसं टोकदार वाटत होतं. त्याच्या चेहऱ्यातील हे बदल फारसे जाणवण्यासारखे नसले, तरी अडीच वर्षांपूर्वी रिओमधल्या ज्या सर्जनने हा बदल घडवला होता, त्याला भरपूर पैसे चारून त्यांनी त्याच्याकडून ही माहिती मिळवली होती.

सतत चार वर्षं कसून शोध घेतला, जिकिरीची मेहनत घेतली. शोधण्याचे सर्व मार्ग खुंटले. ओतलेला पैसा अक्षरश: पाण्यासारखा वाहून गेला, तरी हाती काही लागले नाही. मिळालेल्या खबरी फोल ठरल्या.

पण अखेरीस त्यांना तो सापडला. तरीही त्याला पकडण्याची त्यांनी घाई केली नाही, वाट पाहिली. एकदा त्यांना असंही वाटलं की, आपण हेरले गेलो आहोत हे त्याच्या लक्षात येण्यापूर्वीच, किंवा शेजाऱ्यापाजाऱ्यांना काही संशय येण्यापूर्वीच, त्याला धरावं, गुंगीचं औषध देऊन बेहोश करून पॅराग्वेमध्ये एका सुरक्षित ठिकाणी डांबून ठेवावं. इतक्या वर्षांच्या शोध मोहिमेनंतर तो सापडला. त्यामुळे लगेचच काहीतरी कारवाई करावी, असा उत्साह त्यांच्यामध्ये सुरुवातीला होता, पण दोन दिवस थांबल्यावर ते स्वस्थ झाले. इथले स्थानिकच आहोत असं दर्शवीत, सावलीमध्ये कुठे चहा पीत, आईस्क्रीम खात एकीकडे त्याच्या घरावर नजर ठेवत, रुआ तिरादेन्तेस

रस्त्यावर ते रेंगाळत राहिले. तो असाच बाजारपेठेत गेला असताना ते त्याच्या मागावर राहिले आणि एका औषधाच्या दुकानातून तो बाहेर पडताच, रस्त्याच्या पलीकडून त्यांनी त्याचे फोटो घेतले. एकदा तो फळविक्रेत्याशी बोलत असताना, त्यांचं बोलणं ऐकण्यासाठी ते थोडे त्याच्या जवळसुद्धा गेले. त्याच्या बोलण्यात अमेरिकन किंवा जर्मन ढब होती, पण तो पोर्तुगीज सफाईने बोलत होता. भराभर खरेदी करून तो लगेच माघारी फिरला, घराच्या आवारात शिरताच त्याने फाटकाला कुलूप घातलं. त्याच्या या लहानशा फेरफटक्यात त्यांना त्याचे बरेच छान फोटो घेता आले.

जॉगिंग तो पूर्वीपासूनच करत होता; पण शरीर फुग्यासारखं फुगल्यामुळे त्याचं धावण्याचं अंतर मात्र कमी होतं. त्यामुळे आता रोडावलेला असूनही धावतो, याचं त्यांना आश्चर्य वाटलं नाही. बाहेर पडून, गेट व्यवस्थित बंद करून, तो रुआ तिरादेन्तेस रस्त्याच्या कडेने दुडक्या चालीने पळू लागला. रस्ता अगदी सरळ असल्याने पहिल्या मैलाला त्याला नऊ मिनिटं लागली. पुढे घराघरांमधलं अंतर वाढत जाऊन, शहराच्या टोकाला रस्ता रेताड झाला. दुसऱ्या मैलाच्या अर्ध्यापर्यंत त्याचा वेग वाढून तो आठ मिनिटांवर आला, त्यामुळे डॅनिलो चांगलाच घामाघूम झाला. ऑक्टोबरची मध्यान्ह वेळ, तापमान जवळजवळ ऐंशी डिग्री होतं. शहराची हद्द संपली तसा त्याचा धावण्याचा वेग वाढला. मध्येच लागणारं छोटसं हॉस्पिटल, चर्च पार करून, तो डोंगराळ भागाकडे, धुळीच्या रस्त्यावरून मैलाला सात मिनिटं वेगाने दौडू लागला.

त्याच्या धावण्याच्या या उपक्रमाला त्यांच्या दृष्टीने एक वेगळंच महत्त्व होतं. त्यामुळे ते खूश होते. डॅनिलो अगदी सहज त्यांच्या हाती लागणार होता.

तो नजरेला पडल्याच्या दुसऱ्या दिवशी, पोन्टा पोरा शहराच्या टोकाला असलेलं एक झोपडीवजा घर ओस्मर या ब्राझिलीयन इसमाने भाड्यानं घेतलं आणि लगेच एक पाळत ठेवणारी टोळी तिथे येऊन धडकली. अमेरिकन व ब्राझिलीयन अशा मिश्र जणांची ती टोळी होती; ओस्मर पोर्तुगीजमधून हुकूम सोडत असे, तर गाय इंग्लिशमधून आरडाओरड करत असे. ओस्मरला दोन्ही भाषा अवगत होत्या, त्या टोळीचा तो अधिकृत दुभाषा झाला.

डॅनी बॉय (डॅनिलोचं टोपण नाव), याला पकडण्यासाठी गाय या वॉशिंग्टन मासियाला सुपारी देण्यात आली होती. काही बाबतीत तो फारच

कल्पक होता. इतरांच्या तुलनेत हुशार तर होताच, पण तेवढाच तो कुप्रसिद्धही होता. डॅनी बॉयला पकडण्यासाठी केलेल्या एकेक वर्षाच्या कराराची त्याची ही पाचवी वेळ होती. भक्ष्य पकडल्यानंतर बोनसही दिला जाणार होता. डॅनी बॉय मिळत नसल्याने तो खचत मात्र होता. त्याने ते कधी दर्शवलं मात्र नाही.

पस्तीस लाख डॉलर्स आणि चार वर्षं, याचं काय चीज झालं हे दाखवून देण्यासारखं काहीच घडत नव्हतं आणि आज तो सापडला.

ओस्मर आणि त्याचे ब्राझिलीयन साथीदार यांना डॅनी बॉयने केलेल्या अपकृत्यांची सुतराम कल्पना नव्हती, पण गाडीभर पैसा घेऊन तो पळून गेला आहे हे एखाद्या मूर्खालासुद्धा कळण्यासारखं होतं. ओस्मरला डॅनी बॉयविषयी जाणून घेण्यात कितीही कुतूहल असलं तरी आत्ता कसल्याही चौकश्या करायच्या नाहीत, हे तो यापूर्वीच शिकला होता. गाय आणि त्याच्याबरोबरचे इतर अमेरिकन साथीदार यांच्याकडे तर या विषयावर बोलण्यासारखं काही नव्हतंच.

मोठे केलेले आठ बाय दहाचे डॅनी बॉयचे फोटो त्या जुनाट घराच्या स्वयंपाक-खोलीच्या भिंतीवर लटकवलेले होते. भयंकर निर्दय असलेल्या त्या माणसांच्या भेदक नजरेतून त्या फोटोंचं निरीक्षण चालू होतं. एकामागून एक सिगारेटी पिता-पिता त्या फोटोंकडे ते बघत 'असं आहे तर' या अर्थाने माना डोलवत होते. डॅनीच्या पूर्वीच्या फोटोंशी नव्याने घेतलेल्या फोटोंची तुलना करत ते आपापसात कुजबुजत चर्चा करत होते. जास्त काळसर, छोट्या केसांचा आणि वेगळीच हनुवटी व नाक असलेला एक बुटकासा माणूस. खरंच त्यांना हवा असलेला माणूस हाच होता?

कारण एकोणीस महिन्यांपूर्वी उत्तर-पूर्व किनारपट्टीवरच्या रेसिकमध्ये त्यांची फसवणूक झाली होती. अशाच भाड्याने घेतलेल्या जागेत भिंतीवरच्या फोटोवरून त्यांनी एका अमेरिकन माणसाला धरला, त्याच्या बोटांचे ठसे घेतले. ते काही जुळले नाहीत. भलत्यालाच त्यांनी पकडला होता. मग त्यांनी त्याला गुंगीची औषधं दिली, बेहोश केला, आणि एका खड्ड्यात फेकून दिला.

डॅनिलो सिल्व्हाच्या तिथल्या जीवनक्रमाची अगदी खोलात जाऊन चौकशी करण्याच्या फंदात पडायला ते कचरले होते. त्यांना हवा असलेला मनुष्य तोच असेल, तर त्याच्याकडे भरपूर पैसे असणार होते. हा पैसा स्थानिक अधिकाऱ्यांच्या बाबतीत नेहमीच चांगला कामाला येतो. पूर्वी पोन्टा

पोरामध्ये घुसखोरी केलेल्या नाझी आणि इतर जर्मन लोकांना या पैशानेच कित्येक वर्षं संरक्षण दिलं होतं.

त्याला पकडावा अशी ओस्मरची इच्छा होती, तर गायचं म्हणणं होतं, ''आपण थांबू.'' आणि झालं काय की, सापडल्याच्या चौथ्या दिवशी तो नाहीसा झाला. इकडे त्या घरातल्या मंडळींमध्ये दीड-एक दिवस गोंधळ माजला.

त्याने लाल रंगाच्या 'बीटल' गाडीने घर सोडल्याचं त्यांनी पाहिलं. तो घाईत होता हेही त्यांना कळलं. विमानतळाच्या दिशेने तो गेला. एकुलत्याएक पार्किंगमध्ये मिळालेल्या मोकळ्या जागेत त्याने गाडी सोडली आणि ते छोटसं विमान अगदी सुटण्याच्या तयारीत असताना अखेरच्या क्षणी पकडून तो साओपावलोच्या दिशेने गेला. वाटेत चार ठिकाणी ते विमान थांबणार होतं. दिवसभर ते त्याच्या गाडीवर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवून होते.

त्याच्या घरात शिरून एकूणएक चीजवस्तूंची झाडाझडती घेण्याचा त्यांनी लगेच बेत केला. पैशांसंबंधी माहिती नक्कीच असणार, असं त्यांना वाटलं. गायला आशा होती की, बँकेचं स्टेटमेन्ट, पैसे तारेने कुठे-कुठे पाठवले याच्या नोंदी इत्यादी सर्व कागदपत्रं हाती लागतील आणि मग पैसे कुठे आहेत हे कळून येईल.

पण तसंच त्याला हेही पक्क ठाऊक होतं की, पैसे घेऊन ज्या अर्थी डॅनी बॉय पळून आला आहे, तेव्हा त्यासंबंधीचा कसलाही पुरावा मागे ठेवून तो जाणार नाही. शिवाय ते ज्याला शोधत होते, तोच तो असेल तर घरच्या सुरक्षिततेविषयी तो निश्चित काळजी घेणार. तो कुठेही असो, आपण घराजवळ नाही म्हटल्यावर पाठलागावर असणारे घरात शिरणारच याची त्याला खातरी असणारच. गायला या सर्वांची कल्पना होती.

ते वाट बघत, चडफडत, एकमेकांशी वादविवाद करत राहिले. तणाव अधिक वाढला. गायचे वॉशिंग्टनला दररोज उद्वेगाने फोन चालू होते. लाल बीटलवर त्यांची नजर होती. विमानतळावर उतरणाऱ्या प्रत्येक विमानावर ते दुर्बिणीतून लक्ष ठेवून होते. हातातले फोन चालू होतेच. तो एकाएकी नाहीसा झाल्यानंतरच्या पहिल्या दिवशी सहा, दुसऱ्या दिवशी पाच अशी उतरणाऱ्या विमानांची गणती सुरू होती. तो परत आला नाही. इकडे त्या जुनाट घरातलं वातावरण गरम होऊ लागलं. बेचैनी वाढली. टोळीतले अमेरिकन त्या घराच्या मागच्या परिसरातल्या झाडांच्या सावलीत डुलक्या घेत राहिले, तर

ब्राझिलीयन पत्ते पिसत बसले. काय करावं कुणालाच सुचत नव्हतं.

शेवटी गाय व ओस्मर हे दोघे जण या तणावापासून मोकळे होण्यासाठी गाडीने लांबवर फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले. त्यांनी ठरवलं की, तो परतल्यानंतर त्याला धरायचाच. तो परतणार याची ओस्मरला खातरी होती. बहुधा तो काही कामानिमित्त गेला असणार. तेव्हा आल्याबरोबर त्याला पकडायचा, त्याची ओळख पटवून घ्यायची. समजा तो वेगळाच निघाला तर सरळ एका खड्ड्यात त्याला टाकून पळ काढायचा. याला कारण म्हणजे पूर्वी एकदा असं घडलं होतं.

पाचव्या दिवशी तो परतला. सर्व जण खूश झाले. रूआ तिरादेन्तेसपर्यंत त्यांनी त्याचा पाठलाग केला.

आठव्या दिवशी ते जुनाट घर रिकामं झालं. अमेरिकन व ब्राझिलीयन कामगिरीवर निघाले. त्यांनी त्यांना नेमून दिलेल्या जागा घेतल्या. सहा मैलांच्या परिसरात ते विखुरले. घरी आल्यावर, अंगात शर्ट न घालता नेहमीची निळी व केशरी रंगाची अर्धी चड्डी व 'नायके'चे मोजे, अशा नेहमीच्या धावण्याच्या पोशाखात दररोज याच परिसरात येण्याचा त्याचा परिपाठ होता.

त्याच्या घरापासून अडीच मैलावर असलेल्या डोंगराळ रस्त्यावर एका छोट्या टेकडीवर ज्या ठिकाणापासून तो परत फिरत असे, तीच अगदी योग्य जागा होती. डॅनिलोने, नेहमीपेक्षा थोडं अगोदरच, वीस मिनिटांत ते अंतर पार केलं. बहुधा ढगाळ वातावरणामुळे त्याला जरा जास्त वेगानं पळता आलं असावं. तो टेकडीच्या माथ्यावर आला.

टेकडीच्या माथ्यापाशी जाणारा रस्ता अडवून मध्येच एक छोटी गाडी, चाक पंक्चर झाल्यामुळे जॅकवर उभी होती. गाडीची डिकी उघडी होती. उजव्या बाजूला असलेल्या मोकळ्या वाटेने तो पळत टेकडीच्या माथ्यावर आला. सडसडीत अंगकाठीच्या, घामाघूम झालेल्या त्याला अर्धी-चड्डी सावरत येताना पाहून, आश्चर्य वाटल्यासारखं दाखवत त्या गाडीचा आडदांड ड्रायव्हर उभा होता. डॅनिलोने काही क्षणापुरता त्याचा वेग कमी केला.

''बॉम दिआ,'' तो दांडगा डॅनिलोच्या दिशेने पुढे येत म्हणाला.

''बॉम दिआ.'' डॅनिलोने गाडीकडे येत प्रतिसाद दिला.

आणि अचानक त्या ड्रायव्हरने गाडीच्या डिकीतून चकाकणारं मोठं पिस्तूल काढून ते डॅनिलोच्या तोंडासमोर धरलं. डॅनिलो गारठला. धापा

टाकत असलेल्या अवस्थेत त्याची नजर पिस्तुलावर खिळून राहिली. ड्रायव्हरने त्याच्या बलदंड हाताने डॅनिलोची मानगूट पकडून त्याला खेचत गाडीजवळ आणलं. त्याला गाडीच्या बंपरपर्यंत खाली दाबलं. पिस्तुल खिशामध्ये टाकून, दोन्ही हाताने त्याने डॅनिलोची गठडी वळवली, आणि त्याला डिकीमध्ये कोंबला. डॅनिलोने हातपाय झाडले, पण ड्रायव्हरच्या ताकदीपुढे त्याचं काही चाललं नाही.

ड्रायव्हरने धाडकन डिकी बंद केली. गाडी जॅकवरून खाली घेतली, जॅक फेकून दिला, आणि तो सुसाट वेगाने निघाला. एक मैलभर गेल्यावर त्याने एका अरुंद, धुळकट रस्त्यावर गाडी घेतली. त्याचे इतर साथीदार त्याची तिथे उत्सुकतेने वाटच बघत होते. डॅनी बॉयचे हात नायलॉनच्या दोरीने बांधून व त्याच्या डोळ्यांवर काळं फडकं आवळून त्यांनी त्याला व्हॅनच्या मागील बाजूस ढकलून दिलं. ओस्मर त्याच्या बाजूस, तर दुसरा एक ब्राझिलीयन डाव्या अंगाला बसला. डॅनिलोच्या कमरेला असलेल्या पाउचमधून एकाने किल्ल्या काढून घेतल्या. घामाघूम झालेला आणि धापा टाकत असलेला डॅनिलो गप्प होता.

पुढे एका शेताजवळ व्हॅन थांबली आणि डॅनिलोने पहिल्यांदाच, ''काय हवंय तुम्हाला?'' असं पोर्तुगीजमध्ये विचारलं.

''गप्प बैस,'' ओस्मरने इंग्लिशमध्ये दटावलं. डॅनिलोच्या डाव्या बाजूला बसलेल्या त्या ब्राझिलीयनने एका धातूच्या बॉक्समधून सिरींज घेतली. मोठ्या शिताफीने ती एका प्रभावी द्रवपदार्थाने भरली. ओस्मरने डॅनिलोची दोन्ही मनगटं धरली, तसं दुसऱ्या एकाने त्याच्या दंडात इंजेक्शनची सुई खुपसली. डॅनिलोने ताठ होऊन शरीराला एक झटका दिला, पण त्याला काही अर्थ नव्हता. इंजेक्शन देऊन पूर्ण होईपर्यंत तो स्वस्थ झाला होता. त्याचा श्वासही मंद झाला. त्याचं डोकं मात्र गदगदत होतं आणि जरा वेळाने तेही लुळं पडून त्याची हनुवटी छातीला टेकली. ओस्मरने त्याच्या उजव्या पायावरील चड्डीचा भाग तर्जनीने हळूच वर उचलला. ओस्मरच्या अपेक्षेप्रमाणे तिथली त्वचा फट्ट गोरी होती.

पूर्वी जाड असलेला डॅनिलो, रनिंगमुळे आता सडसडीत झाला होता. तसाच त्याचा गोरा वर्ण जाऊन तो तांबूस पडला होता.

सीमावर्ती भागात अपहरण ही अगदी सामान्य आणि वारंवार घडणारी बाब होती. त्यात अमेरिकन लोकांवर जास्त डोळा होता. डॅनिलोचे डोळे

मिटलेले होते. त्याचं डोकं गरगरायला लागलं होतं. 'मलाच का?' असा प्रश्न पडून तो स्वत:शीच हसला. अवकाशातून आकाशगंगा व निखळत्या ताऱ्यांना चुकवत, चंद्राला घट्ट पकडत आपण खाली पडलो आहोत, असा भास त्याला होऊ लागला.

खरबुजं, बेरी या फळांनी भरलेल्या पुठ्ठ्याच्या खोक्यांच्या ढिगाऱ्याखाली त्यांनी त्याला कोंबला. सीमेवरच्या सुरक्षा दलाच्या लोकांनी, त्यांच्या आसनावर बसल्याबसल्याच मानेने होकार देत, व्हॅनला सीमापार जाऊन दिल्यामुळे डॅनी बॉय पॅराग्वेच्या हद्दीत आला. त्या वेळी डॅनी बॉयला कसलीही कुरकुर करता येणं शक्य नव्हतं. खडबडीत आणि चढावाच्या रस्त्यावरून गाडी हिंदकळत जात असताना तो उडत होता. ओस्मरचं एकामागून एक सिगारेटी ओढणं चालू होतं, मध्येच त्याची, 'हे असं, ते तसं' अशी बडबड सुरू होती. एका तासानंतर त्यांना हवं होतं ते शेवटचं वळण घेतलं आणि त्यांनी डॅनी बॉयला धरून ठेवलं. दोन लहान डोंगरांच्या सुळक्यांमधल्या बोळीत, मागे पडलेल्या त्या अरुंद, खडबडीत रस्त्यावरून सहसा दिसणार नाही असं एक घर होतं. तिथे येताच त्यांनी डॅनीचं गाठोडं उचललं आणि त्या घराच्या आतल्या खोलीत असलेल्या टेबलावर ठेवलं. गाय व हाताचे ठसे घेणारे तिथे तयार होतेच, ते त्यांच्या कामाला लागले.

दोन्ही अंगठे आणि आठही बोटं यांचे ठसे घेतले जात असताना डॅनी बॉय जोराने घोरत पडला होता. बाजूला उभे असलेल्या अमेरिकन व ब्राझिलीयन यांची त्याच्या प्रत्येक हालचालीवर नजर होती. हा पकडलेला जर त्यांना हवा असलेला डॅनी बॉय निघाला, तर तो आनंद साजरा करण्यासाठी दाराजवळ असलेल्या खोक्यात व्हिस्की तयार होती.

ठसे घेणारा एकदम घराच्या मागच्या बाजूला असलेल्या खोलीत गेला. त्याने दार बंद करून घेतलं आणि नव्याने घेतलेले ठसे समोर ठेवले. खोलीतला प्रकाश पाहिजे तसा करून घेतला.

फार पूर्वी डॅनी बॉय हा एक पॅट्रिक नावाचा तरुण होता. लुइझिआना स्टेट बार कौन्सिलला प्रवेश घेण्यासाठी, त्याने आपल्या दहाही बोटांचे ठसे दिले होते. जे अर्थातच अधिकृत होते. ते प्रिंट त्या ठसे घेणाऱ्याने बाहेर काढले. वकिलांसारख्यांच्या बोटाचे ठसे घेणं ही एक चमत्कारिक व जगावेगळी गोष्ट होती खरी!

ठशांचे दोन्ही नमुने चांगल्या स्पष्ट स्थितीत होते आणि ते एकमेकांशी

सहज जुळत होते हे उघड होतं. तरीही त्याने अगदी बारकाईने ते पुन्हा तपासले. घाई कसलीच नव्हती. आपण हा आनंदाचा क्षण एकट्याने उपभोगू, बाहेरच्या मंडळींना थोडा वेळ वाट पाहू दे, असा त्याने विचार केला असावा. सावकाशीने त्याने खोलीचा दरवाजा उघडला, कपाळाला आठ्या घालून त्याने उत्कंठित झालेल्या डझनभर लोकांकडे पाहिले आणि नंतर हसत हसत, 'हा तोच आहे,' असं त्यानं इंग्लिशमधून जाहीर केलं आणि त्या सगळ्यांनी अक्षरश: टाळ्या वाजवल्या.

गायने मग व्हिस्की घेण्याची अनुमती दिली, पण माफक प्रमाणात. बरंच काम करायचं होतं. बेशुद्धीत असलेल्या डॅनी बॉयला आणखी एक शॉर्ट इंजेक्शन देण्यात आलं आणि त्याला खिडकी नसलेल्या, भक्कम दाराच्या एका दुसऱ्या खोलीत नेण्यात आलं. इथेच त्याची शुद्धीत आल्यावर चौकशी करण्यात येणार होती आणि वेळ पडल्यास छळवणूकही!

रस्त्यावर अनवाणी पायाने फुटबॉल खेळणारी मुलं त्यांच्या खेळात इतकी दंग होती की त्यांचं कुणाकडे लक्ष नव्हतं. डॅनी बॉयच्या किल्ल्यांच्या जुडग्यात फक्त चार किल्ल्या होत्या. त्यामुळे जास्त खटपट करायला न लागता पहिलं लहान गेट झटकन उघडता आलं. ते तसंच उघडं ठेवण्यात आलं. चार घरांच्या पलीकडे असलेल्या एका मोठ्या झाडापाशी एक जण भाडोत्री कारने येऊन उभा होता. दुसरा एक रस्त्याच्या एका टोकाला मोटरसायकलच्या ब्रेकशी उगाच काहीतरी खटपट करत होता.

धोक्याची सूचना देणारा गजर जर वाजायला सुरुवात झाली असती, तर घुसखोर पळून जाऊ शकणार होता आणि पुन्हा कधीही तो दिसला नसता. जर गजर झालाच नाही तर मात्र तो घरात स्वत:ला बंद करून घेऊन, आतल्या सामानाची, चीजवस्तूंची तपासणी, मोजदाद करू शकत होता; निर्धास्तपणे.

दार उघडलं गेलं, पण धोक्याची सूचना देणारा गजर झाला नाही. भिंतीवर असलेल्या उपकरणाकडे नजर टाकल्यावर कोणालाही कळून आलं असतं की, ती निकामी केली गेली होती. घुसखोर आत गेला, क्षणभर स्तब्ध उभा राहिला, त्याने कानोसा घेतला आणि मग हालचाल सुरू केली. डॅनीबायच्या कॉम्प्युटरमधली 'हार्ड ड्राइव्ह' त्याने काढून घेतली व इतर डिस्क गोळा केल्या. टेबलावरच्या फाइल्स चाळल्या पण नेहमीची काही दिलेली, तर काही न दिलेली बिलं यांशिवाय काहीच सापडलं नाही. फॅक्स

मशिन बिघडलेलं होतं. कपड्यांचे, फर्निचरचे, मासिकं-पुस्तकांचे फोटो मात्र त्याने घेतले.

खरं काय झालं होतं की, दार उघडल्यावर पाच मिनिटांनी डॅनी बॉयच्या घरातल्या माळ्यावरच्या खोलीत बसवलेली आवाज न करणारी एक यंत्रणा कार्यान्वित होऊन एक गुप्त संदेश, पोन्टा पोरा शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या एका खासगी सुरक्षा कार्यालयात पाठवला गेला होता. त्याला प्रत्युत्तर मिळालं नाही, कारण तिथला ड्युटीवर असलेला सुरक्षा अधिकारी मागच्या अंगणात हॅमॉकवर झोके घेत पहुडला होता. डॅनिलोकडे घरफोडी झाली आहे ही सूचना जिथे कुणीतरी ऐकायला हवी होती. ती फक्त एका मशिनवर नोंदली गेली. पंधरा मिनिटांनंतर तो निरोप मानवी कानापर्यंत गेला आणि तोपर्यंत घुसखोराने पोबारा केला होता. मि. सिल्व्हा नव्हताच. घर, चीजवस्तू जागच्या जागेवर होत्या, अगदी 'बीटल'सुद्धा. घर आणि पुढचं गेट कुलूपबंद होतं.

दिलेल्या सूचना स्पष्ट होत्या. गजर झाला तर पोलिसांना बोलवू नये. मि. सिल्व्हाला इकडेतिकडे आसपास आहे का, हे शोधण्याचा प्रयत्न करावा. तो लगेच सापडलाच नाही तर रिओमधल्या एका नंबरवर कॉल करून, इव्हा मिरांडाविषयी विचारावं.

मोठ्या मुश्किलीने आपला हर्षानंद काबूत ठेवत गायने वॉशिंग्टनला फोन केला. डोळे बंद करून हसऱ्या चेहऱ्याने तो फक्त एवढंच बोलला, ''तोच आहे.'' पलीकडून काही क्षणानंतर विचारण्यात आलं, ''तुझी खातरी आहे?''

''होय. बोटांचे ठसे तंतोतंत जुळले आहेत.'' एरव्ही विचार करण्यास जेमतेम अर्ध्या मिनिटापेक्षा कमी वेळ घेणाऱ्या स्टिफॅनोने थोडं थांबून विचारांती विचारलं, ''पैसे?''

''आम्ही अजून विचारण्यास सुरुवात केली नाही. तो गुंगीत आहे.''

''केव्हा करणार?''

''आज रात्री.''

''मी फोनपाशीच आहे'', असं म्हणून त्याने फोन बंद केला. खरंतर फोनवर तो तासभर बोलू शकला असता.

घराच्या मागच्या बाजूला एका बुंध्यावर गाय बसला. आजूबाजूला दाट झाडी होती. वातावरण शांत होतं. त्याच्या माणसांचे बोलण्याचे आवाज

त्याच्यापर्यंत येत होते. मोहिमेतलं अवघड काम संपलं होतं. मोठं काम जवळजवळ झालं होतं.

त्याला पन्नास हजार जास्त मिळाले होते. पैसे मिळाल्यावर बोनस म्हणून आणखी पन्नास मिळणार होते. त्याला खातरी होती की, ''पैशांचा शोध तो लावणारच.''

**५वी आवृत्ती**

# आपल्या पूर्वजांचे विज्ञान

लेखक
निरंजन घाटे

**किंमत : १८०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




आजच्या विज्ञानयुगाची किमया केवळ अफाट आणि पावलोपावली अचंबित करणारी...
या साऱ्यांची मुळं जरा खणून पाहिली, हजारो-शेकडो वर्षांच्या इतिहासाची पानं खोलवर चाळून पाहिली आणि भूतकाळातल्या शृंखलांना एक-एक जोडून पाहिलं तर समजून येतं की, पूर्वजांच्या ज्ञानार्जनाचं आणि सखोल संशोधनाचंच फलित मिरवतोय आपण...
एकंदरीतच, आजच्या विज्ञानयुगाची अलौकिक बीजं पूर्वजांनीच खोलवर रुजवलीत. याच अद्भुत शोधांचा कालौघात लुप्त झालेल्या सांस्कृतिक मूल्यांचा माहितीपूर्ण खजिना!




# तो एक पाकिस्तानी

जगातील सर्वांत घातकी अणू तस्कराची सत्यकथा!




लेखक : डग्लस फ्रान्झ / कॅथरिन कॉलिन्स

अनुवाद : शेखर जोशी

पृष्ठे ४५६ । किंमत ₹ ४५० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

*एका अणूचा स्फोट झाला*
*होत्याचं नव्हतं झालं,*
*आमच्या प्रज्ञा गोठून गेल्या*
*आणि आम्ही अभूतपूर्व अशा*
*सर्वनाशाच्या दिशेने वाटचाल सुरू केली...*

– अल्बर्ट आइनस्टाइन

जानेवारी, १९७६मध्ये ब्रिटनचे ऊर्जामंत्री टोनी बेन यांनी इराणमध्ये जाऊन शाह यांची भेट घेतली आणि त्या देशाच्या आण्विक महत्त्वाकांक्षांसंदर्भात प्रदीर्घ चर्चा केली, तेव्हा त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली की, इराणचा अणुउद्योग खुद्द त्यांच्या देशाच्या अणुउद्योगापेक्षा कितीतरी पटींनी मोठा आहे. या वेळी बोलताना शाह यांनी त्यांना सांगितले की, अमेरिकेकडून आम्हाला प्लुटोनियम फेरप्रक्रिया तंत्रज्ञान मिळणार आहेच, शिवाय युरेनियम समृद्धीकरणासाठी आम्ही सेंट्रिफ्युजच्या शोधात आहोत. ब्रिटन आणि अमेरिकेने हे तंत्रज्ञान दिले नाहीतर ते विकण्याची जर्मन आणि फ्रान्सची तयारी आहे, याची आम्हाला पूर्ण खातरी आहे. जर शाह यांना तसे करण्यात यश आले, तर प्लुटोनियम आणि समृद्ध युरेनियमच्या साहाय्याने अण्वस्त्र बनविण्याची पात्रता ते मिळवू शकणार होते. अशा सर्व चिंताजनक परिस्थितीतही अमेरिकेला इराणशी सौदा करायचा होता, त्याच्या या निर्णयाचे प्रतिबिंब बेन यांनी तब्बल तीस वर्षांनी केलेल्या एका संवादावर पडल्याचे आढळून येते. ते म्हणतात, 'त्या काळात घडलेल्या काही घटना आज आठवल्या की, माझे मलाच आश्चर्य वाटते, आज आपण जी चर्चा करतो आहोत, त्या पार्श्वभूमीवर तर अमेरिकेने त्या काळी घेतलेल्या काही निर्णयांमुळे माझी मतीच गुंग होते, इराण त्या काळी महाकाय आकाराचा अणू उद्योग वाढवत होता, आपली क्षमताही बळकट करत होता, पण त्यात काही वावगे आहे, असे अमेरिकेला वाटलेही नाही. कारण त्या काळी शाहांकडे ते एक ताकदवान मित्र या नात्याने पाहात होते, खरे तर अमेरिकेनेच आपल्या हातांनी शाह यांना राजमुकुट परिधान करवला होता. यापेक्षा अमेरिकेच्या दुटप्पीपणाचे सूर्यप्रकाशाइतके ढळढळीत उदाहरण क्वचितच सापडेल.'

इराणशी झालेल्या अणू कराराचे खरे शिल्पकार किसिंजर असले तरी,

त्यांचे अधिकार आपल्याकडे खेचण्यात रम्सफिल्ड आणि चेनी यांना चांगलेच यश आले. १९७५च्या हिवाळ्यात किसिंजर यांच्याकडील राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपद काढून घेण्यात यावे, यासाठी दोघांनीही फोर्ड यांना गळ घालून ती मान्य करून घेतली, त्यामुळे किसिंजर यांच्याकडे केवळ परराष्ट्र खातेच उरले, त्यांच्या अधिकारात एकदम कपात झाली. फोर्ड यांनी संरक्षणमंत्री जेम्स श्लेशिंगर यांनाही डच्चू देऊन त्यांच्या जागी रम्सफिल्ड यांचीच नियुक्ती केली. चेनींना बढती मिळून त्यांना रम्सफिल्ड यांची जागा मिळाली आणि ते व्हाइट हाउसचे प्रमुख बनले. बिजिंगमध्ये अमेरिकेचे संपर्क अधिकारी असलेल्या जॉर्ज डब्ल्यू. बुश यांना परत बोलावून त्यांच्यावर सीआयएच्या प्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

अमेरिकेच्या लष्करी ताकदीवर रम्सफिल्ड यांचा गाढा विश्वास होता, मात्र अमेरिकेच्या लष्कराचा संपूर्ण जगावर जो वरचश्मा आहे तो कमकुवत करणारे शस्त्रास्त्र नियंत्रण करार, तसेच इतर काही समझोते याबाबत ते काहीसे उदासिन आणि साशंक होते. परिणामत: आपण जर इराणला अणू तंत्रज्ञान विकणार असू तर आपला त्या प्रदेशातील प्रभाव वाढलाच पाहिजे, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले; या भूमिकेमुळे चेनी, पॉल वुल्फोविझ, खुद्द किसिंजर आणि प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकारी इत्यादी त्यांच्याशी सहमत झाले. अमेरिकेच्या शस्त्रास्त्र नियंत्रण संघटनेचा अण्वस्त्र प्रसारबंदीविषयक एक खास विभाग होता. काँग्रेसतर्फे वुल्फोविझ या तरुण कार्यकर्त्याची त्या विभागावर नेमणूक करण्यात आली होती आणि अण्वस्त्रप्रसारबंदीची जबाबदारी त्याच्यावरच सोपवण्यात आली होती. रम्सफिल्ड, चेनी आणि वुल्फोविझ यांनी संमती दिल्यावर फोर्ड यांनी स्वत:च्या सहीचा एक अध्यादेश जारी करून इराणला जे काही हवे आहे, ते विकण्याचा अधिकार या सर्वांना बहाल केला. ही घटना १९७५च्या जानेवारी महिन्यात घडली. मात्र याच घटनेने अमेरिकेच्या आतापर्यंतच्या अण्वस्त्रबंदी धोरणाने नाट्यमय वळण घेतले.

केवळ एका अपघातापोटीच अध्यक्षपदावर गेलेल्या फोर्ड यांनी १९७६ची अध्यक्षीय निवडणूक लढविण्याचे ठरविले, त्यांना फारच कमी जनाधार होता. 'वॉटरगेट प्रकरणी' आपण निक्सन यांना माफ केल्याचा मुद्दा पुढे करून त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या काही घटकांचा अनुनय केला खरा, पण त्यांच्या याच कृतीने डेमोक्रॅट चिडले. रिपब्लिकन पक्षाच्या नामांकनाच्या

शर्यतीत कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर रोनाल्ड रेगन यांनी त्यांना मागे टाकले. जॉर्जिया राज्याचे लोकप्रिय गव्हर्नर आणि डेमोक्रॅटिक पक्षाचे संभाव्य उमेदवार जिमी कार्टर यांच्याशीही फोर्ड यांना सामना करावा लागला. अमेरिकन नौदलाच्या एका पाणबुडीवर अधिकारी या नात्याने काम करताना कार्टर यांनी अण्वस्त्रप्रसारबंदी हा आपल्या प्रचाराचा मुख्य मुद्दा बनवला होता. याच मुद्यावरून फोर्डना इराणला द्यावयाच्या सामग्रीसंदर्भात बचावात्मक पवित्रा घ्यावा लागला होता. निवडणुकीच्या बरोबर एक महिना आधी फोर्ड यांनी पुन्हा एकदा पलटी मारली आणि 'जेव्हा तंत्रज्ञान विक्रीचा प्रश्न येतो तेव्हा त्याच्यापेक्षा आर्थिक मुद्दा महत्त्वाचा ठरतो या निष्कर्षाप्रत मी आलो आहे,' असे जाहीर करून टाकले. युरेनियमच्या समृद्धीकरणासाठी योगदान ठरेल, अशा कोणत्याही तंत्रज्ञानाच्या निर्यातीस आपण बंदी घालणार आहोत, असेही ते म्हणाले. फोर्ड यांच्या या अचानक झालेल्या हृदयपरिवर्तनाला केवळ काही राजकारण हेच कारण नव्हते-अणूबॉम्ब विकसित करण्यासाठी इराण तंत्रज्ञान विकत घेत असल्याचा सुगावा सीआयएला १९७६च्या सुरुवातीसच लागला होता....

फोर्ड यांनी इराणच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली का? या प्रश्नाने नंतर कधीच डोके वर काढले नाही, आणि कदाचित त्यांच्या सुदैवाने याचा खुलासा करण्याची संधीही त्यांना मिळाली नाही, कारण ते कार्टर यांच्याकडून पराभूत झाले होते. फेरप्रक्रिया तंत्रज्ञानाच्या विक्रीवर फोर्ड यांनी घातलेली बंदी आपण कायम ठेवू असे आश्वासन कार्टर यांनीही दिले असले, तरी त्यांनी आपल्या इराणच्या भेटीत बरोबरच्या आपल्या सर्व सहकाऱ्यांना आश्चर्याचा धक्काच दिला. १९७७च्या शेवटी त्यांनी इराणला भेट दिली, शाह यांना त्यांनी सांगितले की, फेरप्रक्रिया यंत्रणेसह तुम्हाला लागेल ते तंत्रज्ञान तुम्ही आमच्याकडून खरेदी करू शकता. खरे तर इराण त्या काळी एका राजकीय वावटळीच्या तडाख्यात सापडला होता. त्या देशात अयातोल्ला रुहोल्ला खोमेनी नावाचा कट्टर धर्मांध नेता उदयास येत होता. त्याला दहशतवादी आणि इतर धर्मद्वेष्ट्या इस्लामी अनुनयांचा पाठिंबा होता. इराणमधील राजकीय परिस्थिती अत्यंत दोलायमान झाली होती, शाह यांचे सरकार कोणत्याही क्षणी उलथून पडेल, अशी अवस्था झाली होती... आणि तरीही कार्टर-शाह करार अबाधित राहिला होता.

इकडे कॅपिटल हिलवर वेस यांना वेगळीच चिंता लागून राहिली होती.

ही चिंता होती इराणला द्यावयाच्या संभाव्य अणू सामग्रीच्या विक्रीची. या कल्पनेला नव्या डेमोक्रॅटिक प्रशासनाने सोडचिठ्ठी द्यावी, आणि प्रसंगी त्यासाठी पाठपुरावा करावा असा घोषा त्यांनी सिनेटर ग्लेन यांच्याकडे लावला होता. राष्ट्रीय सुरक्षेचा विचार केला तर मुळात मध्य पूर्वेत एवढ्या मोठ्या संख्येने अणुभट्ट्यांना परवानगी देणे हीच 'ज्वालाग्राही कल्पना' आहे असा युक्तिवाद वेस यांनी केला. आपल्या या मुद्याचे स्पष्टीकरण देताना नंतर त्यांनी नमूद केले आहे की, 'हे तंत्रज्ञान विकण्यापासून आपण जर फ्रेंचांना आणि जर्मन्यांना रोखू शकलो नसतो हे खरे आहे, पण आपणही त्यात का सहभागी व्हावे ही गोष्ट मात्र मला अनाकलनीय होती.'

इराणला आपण किमान सहा अब्ज डॉलरचे अणू तंत्रज्ञान विकण्यात यशस्वी होऊ अशी अशा बाळगणाऱ्या वेस्टिंग हाउसने इराणमध्ये या महत्त्वाच्या व्यापारी सौद्याच्या पूर्वतयारीसाठी आपले सुमारे १०० कर्मचारी आधीच तैनात केले होते. 'वेस्टिंग हाउस' आणि 'जनरल इलेक्ट्रिक' हे दोन्ही उद्योग सदर कंत्राट आपल्या पदरात पडावे म्हणून वॉशिंग्टन येथे आपापली प्रभावास्त्रे वापरीत होते. ड्वाईट पोर्टर हे अमेरिकेचे इराणी दूतावासातील माजी राजदूत होते, ते शाह यांचे जवळचे मित्रही मानले जात, वेस्टिंग हाउसचे मुख्य लॉबिस्ट या नात्याने हे कंत्राट वेस्टिंग हाउसलाच मिळावे यासाठी त्यांनी काँग्रेसला लकडा लावला होता. इराणशी हा सौदा झाला तर आपल्याला भौगोलिक आणि राजकीयदृष्ट्या एका बळकट मित्राची साथ मिळेल तसेच दोन्ही देशांतील संबंध आणखीनच दृढ होतील, असा युक्तिवादही त्यांनी केला. अण्वस्त्रप्रसाराला विरोध ग्लेन यांचाच असणार याची पुरती जाण पोर्टरना होतीच आणि म्हणून त्यांनी वेस यांचाच वापर करण्याची खेळी केली. इराणमध्ये विसांहून अधिक अणुभट्ट्या उभारण्याची शाह यांची योजना असून त्यासाठी त्यांना प्रचंड प्रमाणातील वाया जाणाऱ्या इंधनावर फेरप्रक्रिया करू शकणाऱ्या फार मोठ्या यंत्रणेची गरज भासेल, हा मुद्दा त्यांनी वेसना पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण वेस त्यांना बधले नाहीत, एकदा का आपण इराणला ही यंत्रणा दिली की, तो देश आपल्यालाच अणू तंत्रज्ञानाकडे आणि विशेषत: फेरप्रक्रिया प्रकल्पाकडे फिरकूही देणार नाही या भूमिकेला ते चिकटून राहिले.

आपणही अण्वस्त्रसज्ज असावे, अशी मनिषा बाळगणाऱ्या जगातील प्रत्येक देशाला तंत्रज्ञान आणि सामग्री संपादन करण्यासाठी या ना त्या

कारणासाठी दुसऱ्या देशावर अवलंबून राहावेच लागते. अणू तंत्रज्ञानाचा ज्या रशिया आणि अमेरिका दोन देशांनी सर्वप्रथम पाया घातला, या दोन देशांपैकी अमेरिकेने अणू तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीबाबत जेव्हा-जेव्हा प्रश्न आला तेव्हा-तेव्हा दुटप्पी भूमिका पार पाडण्याचे काम सातत्याने केले. दुसरे महायुद्ध संपल्यावर आपला एक मित्र देश या नात्याने अण्वस्त्र कोठार उभारण्यासाठी ब्रिटनला सर्वतोपरी साह्य केले, मात्र त्याचवेळी पुरेसा विश्वासपात्र नसल्याचा ठपका ठेवत हेच तंत्रज्ञान फ्रान्सला नाकारले. यावर कडी म्हणून की काय माहीत नाही, पण याच अमेरिकेने इस्रायलला अण्वस्त्रे बनविण्यासाठी काय वाटेल ती मदत करून आपल्या या दुटप्पी धोरणाचे जणू जगापुढे उघडेवाघडे प्रदर्शन केले.

१९५६मध्ये इस्रायलने आपल्या देशातील नेबाव वाळवंटाजवळच्या एका दुर्गम अशा 'डिमोना' नावाच्या खेड्यात प्लुटोनियम संचलित अणुभट्टी उभारण्यासाठी फ्रान्सशी गुपचूप हातमिळवणी केली. हा प्रकल्प अवाढव्य आकाराचा होता. तो उभारण्यासाठी इस्रायल आणि फ्रान्स यांचे मिळून तब्बल १,५०० कर्मचारी राबत होते, याच प्रकल्पाखाली भूमिगत असा जो एक मजला बांधण्यात आला होता त्याचेच क्षेत्रफळ १४ चौरस मैल इतके होते. या प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाल्यानंतर काही दिवसांनीच अमेरिकेच्या गुप्त टेहळणी विमानाने त्याचा शोध लावला आणि आयसेनहॉवर प्रशासनाने इस्रायलला याचा जाब विचारला. सुरुवातीला इस्रायलने अमेरिकेच्या ताकास तूर लावू दिला नाही, पण नंतर मात्र त्या ठिकाणी एका कापडगिरणीचे काम सुरू असल्याची बतावणी करून पाहिली, सरतेशेवटी ती एक मेटालर्जी संशोधनाची कार्यशाळा आहे, असे सांगून त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. डिमोना संकुल ही एक अणुभट्टी असून इस्रायलच्या अण्वस्त्र निर्मिती उद्योगाचाच तो एक भाग असल्याचे १९६०च्या दरम्यान सीआयएने शोधून काढलेच. इस्रायलने शेवटी ती एक अणुभट्टी असल्याची कबुली दिली, मात्र तिचा उपयोग केवळ नागरी कारणांसाठी असल्याचा दावाही केला.

मध्य पूर्वेतील अण्वस्त्रांना नेहमीच विरोध करणारे जॉन एफ. केनेडी यांनी १९६१मध्ये अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताक्षणी इस्रायलला तंबीच दिली आणि डिमोना संकुलाची अमेरिकेच्या पथकाला पाहाणी करू द्यावी, असे सुचविले. या पथकाच्या भेटीनंतर जारी केलेल्या अहवालात नमूद

करण्यात आले होते की, 'या प्रकल्पासंदर्भात इस्त्रायलने कोणत्याही प्रकारची लपवाछपवी केलेली नाही, त्यांनी दावा केल्याप्रमाणे ती एक नागरी उपयोगासाठी उभारण्यात आलेली अणुभट्टीच आहे आणि या पथकासमवेत जे वैज्ञानिक होते त्यांचेही पूर्ण समाधान झाले आहे.' पण वस्तुस्थिती वेगळीच होती, या पथकाला किंवा त्यानंतर ज्या इतर सहा पथकांनी भेट दिली त्यांना संकुलातील अत्यंत महत्त्वाचे भाग दाखवण्यात आलेच नव्हते. अण्वस्त्र निर्मितीचे काम खोलवर बांधण्यात आलेल्या भूमिगत प्रयोगशाळेत बिनबोभाटपणे सुरू होते, तिथपर्यंत पोहोचायला फक्त लिफ्टस होत्या आणि त्या सर्व भेटींदरम्यान बाहेरच्यांसाठी झाकून ठेवण्यात आल्या होत्या.

तरीही त्या दशकाच्या शेवटी-शेवटी इस्त्रायल डिमोना येथे अण्वस्त्रेच बनवित आहे या निष्कर्षाप्रत सीआयए आलीच, तसेच ही बाब जगासमोर आली तर अरब देश गप्प बसणार नाहीत, ते इस्त्रायलवर प्रतिहल्ला करतील आणि त्यामुळे तो संपूर्ण प्रदेश बेचिराख होण्यास वेळ लागणार नाही अशी भीतीही व्यक्त केली जाऊ लागली. १९६९च्या पहिल्या महिन्यात निक्सन प्रशासन सत्तेवर आले, त्यानंतर लगेचच इस्त्रायलला आपला आण्विक कार्यक्रम स्थगित करण्यास भाग पाडावे असा लकडा ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी निक्सन यांच्याकडे लावला, आणि स्थैर्यासाठी तसे करणे आवश्यक आहे, हे त्यांना पटवून दिले. मात्र त्या वर्षाच्या शेवटी निक्सन यांनी इस्त्रायलच्या पंतप्रधान गोल्डा मायर यांच्याशी एक करार केला. 'जोपर्यंत इस्त्रायल अणुस्फोट घडवून आणत नाही किंवा इतर कोणत्याही मार्गाने त्याची जाहिरात करत नाही, तोपर्यंत अमेरिका आपल्या मित्र देशावर सदर प्रकल्प गुंडाळून ठेवण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा दबाव आणणार नाही,' असे आश्वासन त्यात देण्यात आले होते. तेव्हापासून इस्त्रायलचा अणूबॉम्ब हे एक 'उघड गुपित' राहिले आहे, इस्त्रायलच्या प्रसारमाध्यमांनी तर त्याला 'इस्त्रायलची आण्विक संदिग्धता' असे काहीसे टीकात्मक टोपणनाव दिले.

अण्वस्त्र प्रसाराबाबत अमेरिकेने स्वत:च्या सोयीनुसार जी लवचिक भूमिका घेतली होती, तिचा सर्वांत जास्त फायदा इस्त्रायल आणि इराण यांनी करून घेतला. अमेरिकेने हे दोन देश सोडून इतरांसाठी वेगवेगळे नियम लावले होते. एकीकडे इराण आणि इस्त्रायल हे आपले तथाकथित मित्र देश जे काही उपद्व्याप करतात त्याकडे सोईस्करपणे डोळेझाक करायची किंवा त्यांना अब्जावधी डॉलर किमतीची अणुसामग्री द्यायची, तर दुसरीकडे भारत

आणि पाकिस्तान यांची बेभरवश्याचे साथीदार अशी गणना करून त्यांच्यासाठी अशा विक्रीची नाकेबंदी करायची.

'भारत' आणि 'पाकिस्तान' यांना द्यावयाच्या सामग्रीला मर्यादा घालण्याची तरतूद असलेल्या कायद्याचा मसुदा तयार करण्यात वेस यांनी महत्त्वाची कामगिरी पार पाडली, हा मसुदा त्यांनी ग्लेन यांच्यातर्फेच तयार केला होता. अमेरिकेच्या कायदा प्रक्रियेत शिरकाव करण्यासाठी हा मसुदा वेस यांच्यासाठी देवासारखा धावून आला. त्यामुळे त्यांना मिसौरीचे डेमोक्रॅट सिनेटर स्टुअर्ट सिमिंग्टन आणि न्यू यॉर्कच्या रिपब्लिकन पक्षाचे सिनेटर जेकब जेवीटस यांच्या कर्मचाऱ्यांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. कोणत्याही देशाला आण्विक सामग्री विकण्यावर बंदी लादण्यात यावी, अशी चर्चा त्या वेळी अमेरिकेच्या दोन्ही सभागृहात सुरू होती, मात्र ही कल्पनाच मुळी अतिमहत्त्वाकांक्षी असल्याचे सांगत ती सोडून देण्यात आली. त्या ऐवजी समृद्धीकरण तंत्रज्ञान आहे तसेच गोपनीय ठेवण्याच्या उद्देशाने प्लुटोनियम आणि फेरप्रक्रियेवर अधिक लक्ष केंद्रित करणारा कायदा संबंधित कर्मचाऱ्यांनी तयार केला. हा कायदा नंतर 'सिमिंग्टन दुरुस्ती' (Symington amendment) या नावाने अस्तित्वात आला. ज्या देशांना अमेरिकेची आण्विक किंवा लष्करी मदत हवी असेल त्यांनी आंतरराष्ट्रीय अणुउर्जा आयोगाला (आयएईए) आपल्या लष्करी आस्थापनांची नियमित पाहणी करू दिली पाहिजे अशी अट त्या कायद्यात होती. परकीय मदत कायद्यांतर्गत ही दुरुस्ती मे, १९७६मध्ये स्वीकारण्यात आली. या कायद्याची पायमल्ली कोणता देश करतो ते पाहाणे आणि त्याच्यावर योग्य ती कारवाई करणे याची जबाबदारी व्हाइट हाउसवर टाकण्यात आली. आपल्यावर कोणीही बंधने आणणे, विशेषत: परराष्ट्रखात्याने बंधने आणून आपले हात बांधून ठेवणे व्हाइट हाउसला फारसे आवडत नसे, म्हणून या नव्या जबाबदारीचे तिथे फारश्या उत्साहात स्वागत झाले नाही.

या कायद्यामुळे काँग्रेसच्या अण्वस्त्र प्रसारविषयक एकूणच धोरणाला 'यू-टर्न' मिळाला. जो देश अणूचा वापर शांततेसाठी करील त्याला प्रोत्साहन द्यायचे धोरण अमेरिकेने १९५०पासून 'आपल्या शांततेसाठी अणू' या कार्यक्रमाद्वारे अवलंबिले होते. मात्र भारताची अणू चाचणी आणि पाकिस्तानचे मनसुबे पाहून या दृष्टिकोनात बदल झाला होता. 'सिमिंग्टन दुरुस्ती' म्हणजे अण्वस्त्रबंदी करार पायदळी तुडविणाऱ्या देशांविरुद्ध

कारवाई करण्याच्या दृष्टीने अमेरिकन काँग्रेसने उचललेले पहिले पाऊल होते. भारत आणि पाकिस्तान जरी यांच्या अणूकार्यक्रमांच्या चिंतेपोटीच या दुरुस्तीचा जन्म झाला असला, तरी त्याचा जास्त फटका पाकिस्तानलाच बसण्याची शक्यता होती. कारण भारताच्या अण्वस्त्र यंत्रणा आधीपासूनच तयार होत्या; शिवाय त्या देशाने आपली चाचणी दोन वर्षे आधीच केली होती. दुसरीकडे पाकिस्तानचा अणूकार्यक्रम अद्यापी पहिल्या पायरीवरच होता, आणि त्याचवेळी या नव्या कायद्यामुळे आमच्या कायदेशीर अणुभट्टीवर गदा येणार आहे असा कांगावाही त्या देशातील राजनैतिक अधिकारी तसेच राजकीय नेत्यांनी सुरू केला होता.

ही दुरुस्ती मंजूर झाल्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे १२ मे, १९७६ रोजी परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांनी अण्वस्त्र प्रसाराचा मुद्दा आणि पाकिस्तानच्या भविष्यातल्या रणनीतिची चर्चा करण्यासाठी आपल्या खात्यात ज्येष्ठ अधिकाऱ्यांची एक बैठक निमंत्रित केली. पाकिस्तानने अण्वस्त्रबंदी करारावर सही करावी आणि आयएईएला त्याच्या अणू आस्थापनांची पाहणी करण्याची संधी द्यावी अशी एक सूचना या वेळी मांडण्यात आली. तसे केल्यास सिमिंग्टन कायद्याची पायमल्ली न करताही तो देश फ्रान्सकडून अणू प्रकल्प खरेदी करू शकला असता. पाकिस्तान विश्वासपात्र नसला तरीही एक मित्र होता आणि अण्वस्त्रबंदी करारावर सही करण्यासाठी त्याच्यावर दबाव आणल्यास आपण पुन्हा एकटे पाडले जात आहोत असे त्याला वाटेल, ही भावना किसिंजर यांच्या दृष्टीने त्रासदायक होती. 'भारतीय जे करू इच्छित नाहीत, ते पाकिस्तानला करायला लावणे हे काहीसे असंस्कृतपणाचे आहे, असे मला वाटते,' इति किसिंजर.

'पाकिस्तानच्या प्रकल्पाला कोणताही आर्थिक पाया नाही,' असे सांगून परराष्ट्रखात्याच्या अण्वस्त्रविरोधी विभागाचे एक अधिकारी रेजिनाल्ड बार्थोलोम पुढे म्हणाले, 'त्या देशाला सध्यातरी फेरप्रक्रिया केलेले इंधन नको आहे, आणि भविष्यात ते जेव्हा लागेल तेव्हा त्याचा आपण अन्य मार्गांनी विचार करू शकतो.'

'मग त्यांना फेरप्रक्रिया यंत्रणा कशाला हवीय?' किसिंजरनी विचारले.

'अण्वस्त्र निर्मितीच्या स्थितीत आपणही असावे असे त्यांना वाटते आणि फेरप्रक्रिया यंत्रणा ती स्थिती त्यांना उपलब्ध करून देईल,' बार्थोलोम उत्तरले.

भारताला प्रत्युत्तर देण्यासाठीच पाकिस्तानने स्वत:चा अणूकार्यक्रम सुरू

केला आहे याबद्दल शंका घेण्याचे काहीच कारण नाही असे या वेळी किसिंजरना सांगण्यात आले. भुट्टो यांचीही अण्वस्त्र विकसित करण्याची आकांक्षा आहे असा इशारा शाह यांनी अमेरिकेला दिल्याची माहिती परराष्ट्रखात्याचे सहाय्यक उपमंत्री आल्फ्रेड आर्थरटन यांनी या वेळी दिली. चिंतेच्या सुरात त्यांनी अशी पुष्टीही जोडली की, सीआयएच्या नव्या अहवालानुसार पाकिस्तानला अण्वस्त्रसज्जतेच्या मार्गात येणारे अडथळे दूर करण्यासाठी लिबियाने मदतीचा हात पुढे केला आहे, मात्र या मदतीच्या बदल्यात त्या देशानेही आपल्या अणूकार्यक्रमाला सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

या बैठकीनंतर, दोन महिन्यांनी म्हणजे ८ ऑगस्ट रोजी किसिंजर भुट्टो यांच्याशी दोन हात करायला पाकिस्तानला रवाना झाले. त्या आधी ते १९७१मध्ये तिथे गेले होते, त्या वेळी ते अध्यक्ष निक्सन यांच्या सोबत होते, चीनशी राजकीय संबंध पुन: प्रस्थापित करून परतीच्या वाटेवर असताना त्या दोघांनी पाकिस्तानला धावती भेट दिली होती. त्या वेळची ती भेट गुप्त ठेवल्याबद्दल त्यांनी भुट्टोंचे आभार मानले. नंतर मात्र या ताज्या भेटीच्या वेळी त्या आनंदाचा मागमूसही नव्हता. पाकिस्तानच्या आण्विक महत्त्वाकांक्षांमुळे या भागात अणू युद्धाचा धोका निर्माण झाल्याचे त्यांना जाणवले होते. आणि त्या दिशेने जाण्यापासून रोखण्याच्या उद्देशानेच ते आता आले होते. फेरप्रक्रिया प्रकल्प सुरूच ठेवण्यासंदर्भात जर भुट्टो आग्रहीच राहिले तर अमेरिकेला सिमिंग्टन कायद्याचा बडगा दाखवावा लागेल आणि त्या देशाला दिली जाणारी मदत बंद होईल, असे किसिंजर यांनी आपल्या दौऱ्याबरोबर आलेल्या पत्रकारांशी 'ऑफ द रेकॉर्ड' वार्तालापात सांगितले. तसेच जर पाकिस्तानने आपला अण्वस्त्रांचा पिच्छा करणे सोडले, तर त्या देशाला प्रोत्साहन म्हणून मिसाइल्स, रॉकेटस आणि तोफांनी सज्ज असलेली कोर्सएअर बनावटीची ११० ए-७ जातीची लढाऊ जेट देण्याची आपली तयारी आहे असेही ते म्हणाले. भारताविरुद्ध कारवाई करण्यासाठी पाकिस्तानने आपली परंपरागत युद्धसामग्री वापरावी आणि अण्वस्त्रासारख्या घातक मार्गाचा अवलंब करू नये, तसेच त्यासाठी अमेरिकेने रदबदली करावी अशी सूचना सीआयएच्या नेतृत्वाखालील काही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केली.

किसिंजर यांच्याशी झालेल्या या भेटीची आठवण पुढे डायरीत

लिहिताना भुट्टो म्हणतात, 'पाकिस्तानला केवळ अणुऊर्जेसाठीच फेरप्रक्रिया प्रकल्प हवाय असे सांगून तुम्ही आमच्या गुप्तहेर यंत्रणांचा अपमान करू नका असे त्यांनी मला सांगितले. त्यावर पाकिस्तानला असलेल्या ऊर्जा तुटवड्याच्या मुद्यावरून आम्ही तुमच्या गुप्तहेर संघटनांचा अपमान करणार नाही, पण आमच्या या सौजन्याची दाद म्हणून तुम्हीही पाकिस्तानच्या प्रकल्पाची चर्चा एकदम थांबवली पाहिजे, असे मी त्यांनाही सुनावले.'

अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या अंदाजानुसार पाकिस्तानी या नेत्याला आपल्याला दुजाभावाची वागणूक मिळत असून दबावही टाकला जात आहे असे वाटू लागले. नंतर आपला संताप व्यक्त करण्यासाठी ते उद्‌गारले, 'जर ख्रिश्चन, ज्यू, हिंदू आणि कम्युनिस्टांकडे अणूबॉम्ब असू शकतो, तर केवळ आम्हालाच का वगळण्यात येत आहे?' इस्रायलने संशयास्पदरित्या आपला अणूबॉम्ब तयार करून अरब देशांच्या सैन्यशक्तीवर आधीच कुरघोडी केली होती, आणि ती रोखण्यात अमेरिकेने कुचराई केली होती. अण्वस्त्र प्रसाराबाबतच्या अमेरिकेच्या या सातत्यहीन धोरणामुळे काही मुस्लीम देशांत नाराजीची तीव्र लाट तयार होत होती, याच भावनेचे भांडवल करून भुट्टोंनी पाकिस्तानच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला आर्थिक मदत करा, असे आव्हान लिबिया आणि सौदी देशांना केले होते. तसे झाल्यास भारत, पाश्चात्त्य देश आणि इस्रायल यांच्याहीपेक्षा उच्च प्रतिचा बॉम्बसाठा करून आपण त्यांचा मुकाबला करू शकतो, असेही ते म्हणाले होते.

पाकिस्तानने स्वेच्छेने आपला अणूकार्यक्रम स्थगित करावा यासाठी किसिंजर यांचे प्रयत्न निष्फळ ठरल्यामुळे खुद्द अमेरिका आणि त्याचे मित्रदेश यांच्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले, आणि ते भुट्टोंच्या मनसुब्यांचे खच्चीकरण करण्यासाठी अन्य पर्यायांचा विचार करू लागले. एकूणच अण्वस्त्रबंदी प्रसाराच्या दृष्टीने हे वाढते आव्हान गुंतागुंतीचे, तसेच विलक्षण गंभीर स्वरूपाचे होते, त्यामुळेच सिनेटर ग्लेन यांच्या कार्यालयाला रामराम ठोकावा आणि पुन्हा मेरीलॅन्ड विद्यापीठाकडे वळावे, हा लेन वेसच्या मनातील विचार बळावत चालला. १९७६च्या शेवटाला ग्लेन यांनी सिनेटच्या सरकारी व्यवहार उपसमितीचे अध्यक्षपद स्वीकारले आणि वेसला व्हाइट हाउस कर्मचारी उपसमितीचे उपाध्यक्षपद सांभाळण्याची विनंती केली. अण्वस्त्रप्रसार हा विषय या उपसमितीच्या कक्षेत येत होता. अमेरिका आणि संपूर्ण जगाच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा आहे, असे मानणाऱ्या वेसने या

प्रस्तावाला मान्यता दिली, कारण या पदाचा वापर करून आपण काहीतरी प्रभावी कामगिरी करू असे त्यांना मनापासून वाटत होते. अणू तंत्रज्ञानाचा फैलाव करणाऱ्या लोकांना, कंपन्यांना आणि सरकारांना आपण जगापुढे उघडे करणार असा त्याचा निर्धार होता, निदान पुढचे एक वर्ष तरी ते आपण करू असे त्याला वाटत होते.


१९वी आवृत्ती

# पहिले प्रेम

लेखक
वि.स. खांडेकर

**किंमत : १४०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




नाकासमोर जाणाऱ्या सरळ, साध्या माणसाच्या जीवनक्रमाचे चित्रण जसे तुम्हाला वृत्तपत्रात आढळणार नाही, तसेच ते ललितवाङ्मयातही प्रामुख्याने प्रतिबिंबित होणार नाही.
मानवी जीवनातली युद्धे, भूकंप आणि वादळे हे असल्या वाङ्मयाचे मुख्य विषय असतात. रॉबर्ट लिंडचा हा सिद्धांत निरपवाद नसला, तरी वाङ्मयातल्याच प्रीतीच्या चित्रणाच्या बाबतीत ते बव्हंशी सत्य आहे. प्रत्यक्ष आयुष्यात प्रीतीच्या मार्गावर पारिजातकाची पुष्पे पसरलेली असावीत, असे आपण म्हणत असतो. पण गमतीची गोष्ट ही, की वाङ्मयात मात्र मार्गावरल्या काट्याकुट्यांनी पदोपदी रक्तबंबाळ होणारी प्रीतीची मूर्तीच आपल्याला अधिक मनोहर वाटते; आणि शेवटी मनुष्याला जगात जो अनुभव येतो, त्यात फुलेही नसतात आणि काटेही नसतात. सामान्य मनुष्याच्या प्रीतिमार्गावर फक्त खडे असतात. ते त्याला मधून मधून चांगलेच बोचतात. त्या दु:खाने प्रसंगी तो अगदी रडकुंडीला येतो. पण त्याच वेळी कुठून तरी येणाऱ्या शीतल वायुलहरी त्याचा शीण नाहीसा करून त्याला उल्हसित करीत असतात. तो पुन्हा शीळ घालीत पुढे चालू लागतो.




# साद उत्तुंगाची

## एव्हरेस्ट या सर्वोच्च हिमशिखराच्या ध्यासाचा दुर्दम्य प्रवास




लेखक : रॉबर्ट बर्क्बी

अनुवाद : सुनीति काणे

पृष्ठे ३६८ । किंमत ₹ ३५० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

*‘माउन्टन मॅडनेस’ पर्यटन कंपनीच्या संदर्भातलं ध्येय होतं, “ते फत्ते करायचंच!” काही काळानं आम्ही विनोदानं हे ध्येय बदलून म्हणू लागलो – “हे कसं बरं यशस्वी झालं?” स्कॉटचं मत होतं की, आजूबाजूला योग्य माणसं जमवली तर गोष्टी घडून येतात आणि बहुधा तसंच होत असे.*

– एड व्हिस्चर्स
गिर्यारोहण-सहकारी आणि हिमालयातला गिर्यारोहक

माउंट रेनियरवर एक संध्याकाळ घालवल्यानंतर, ओंडके पाडण्याचं जिथं काम चाललं होतं, त्या रस्त्याच्या टोकाला स्कॉट फिशर प्रचंड मोठी शेकोटी पेटवत असलेल्या डॅन मॅकहेलकडे बघत होता. हायस्कूलची मुलं शाळा संपवताना जी प्रचंड होळी पेटवतात, त्या आकाराचीच होळी डॅन मॅकहेलनं पेटवली होती. सभोवारच्या वृक्ष-वेली हिमानं झाकून गेल्या होत्या. आकाशात असंख्य तारे चमचमत होते. शेकोटीची धग इतकी प्रचंड होती की, आमच्या हातातल्या मांस भाजायच्या काठ्या आम्हाला फार जवळ नेणं शक्य होत नव्हतं. पण हे ओंडके जळून जाऊन त्यांचे कोळसे बनण्याची प्रतीक्षा आम्ही गेले अनेक तास करत होतो. त्यानंतर हॉट डॉग्ज, केचप आणि मस्टर्ड खायला बहार येणार होता!

डॅनच्या चेहऱ्यावर काजळीचे थर जमलेले होते. विस्तवाच्या उजेडात तळपणारा डॅनचा चेहरा आणि ‘द शाइनिंग’ ह्या चित्रपटातील निकोल्सन ह्या नटाचा चेहरा यांच्यात विलक्षण साम्य दिसत होतं. हॅन्डलची लांबी सहा फुटांनी वाढवलेलं बागकामाचं धातूचं जाड दंताळं घेऊन डॅन ज्वाळा विझवतोय आणि खाली पेटून फुललेले निखारे १२ फूट लांबीच्या व चार फूट रुंदीच्या आकाराच्या जागी सारखे पसरत होता. जंगलात तप्त लाव्हानं भरलेला ज्वालामुखी रसरसावा, तसे हे पेटलेले लाल निखारे दिसत होते.

तो म्हणाला, “कृतीची वेळ आलीय!” डॅन हा सीॲटलमध्ये राहणारा गिर्यारोहक आहे. बॅकपॅक बनवून विकणं, हा त्याचा व्यवसाय. डॅनने ज्या कृतीचा उल्लेख केला, ती म्हणजे हॉट डॉग खाणं नक्कीच नव्हती! डॅनच्या शब्दांचा अर्थ होता की, निखाऱ्यांवरून चालून दाखवायची वेळ आलेली आहे. तो आम्हाला म्हणाला, “तुम्हाला जेव्हा आतून वाटतं की, तुम्ही ही गोष्ट करू शकाल; तेव्हा ती तुम्हाला नेहमीच करता येते!”

डॅनला ते करता येतं, हे स्कॉटला आणि मला आधीपासूनच माहीत होतं. निखाऱ्यांवर चालण्याबाबतचा एक लेख 'लाइफ मॅगेझिन'नं छापला होता. त्यात लिहिलं होतं – १९७८पासून ३५००० माणसं निखाऱ्यांवर आरामात, दिमाखात किंवा उड्या मारत चालत गेली. सीॲटलमधल्या एका रहिवाशानं तर हातांवर तोल देत निखारे पार करून दाखवले! १२ फूट लांबीच्या पेटलेल्या निखाऱ्यांवर तो हात टेकत पलीकडे गेला. हा रहिवासी होता डॅन मॅकहेल. जॉन क्रॅकाऊर ह्या तरुण पत्रकारानं 'रोलिंग स्टोन'साठी लिहिलेल्या लेखात म्हटलं होतं – डॅनचा ठाम विश्वास आहे की, तुम्ही दृढनिश्चय केलात, तर अणुस्फोटातूनसुद्धा वाचू शकता.

ह्या मताबद्दल मी डॅनला छेडलं, तेव्हा त्यानं कबूल केलं की, हे प्रतिपादन थोडं अतिशयोक्तीचं होतं. तो पुढे म्हणाला की, अग्नितत्त्वाबद्दलचे त्याचे प्रयोग आता त्याने आवरते घेतले होते. गिर्यारोहणाच्या वेळेस भूतत्त्व व वायुतत्त्व यांच्याशी त्याचा भरपूर संपर्क आलेला होता. अनवाणी पायांनी बर्फात चालून त्यानं जलतत्त्वाचा सामना केलेला होता. त्यानंतर राहिलं होतं अग्नितत्त्व. तो म्हणाला, ''नवनवीन गोष्टींचे अनुभव घेता-घेता वृद्धापकाळाला चांगलीच रंगत येणार आहे.''

गेला तासभर डॅन अनवाणी पायांनी बसलेला होता. स्कॉटनं आणि मी आमचे बूट अन् मोजे काढून टाकले खरे, पण केवळ डॅनला खूश करण्यासाठी आम्ही तसं केलं. आम्ही दोघंही विस्तवाच्या जवळपाससुद्धा जाणार नव्हतो. मग आमच्यासमोरच निखारे तुडवत डॅन पुढे गेला. त्या पेटत्या निखाऱ्यांत त्याच्या पावलांचे काळे ठसे उमटले. तो चालताना अगदी निर्विकारपणे, सीॲटलच्या मध्य वस्तीतल्या फुटपाथवर चालावं, त्याप्रमाणे अगदी संथपणे चालत गेला.

डॅन म्हणाला, ''दुसऱ्या कुणालातरी ते करताना तुम्ही पाहिलंत की, तुमची खातरी पटते की, ते करणं शक्य आहे. तुमच्या मनाची तयारी होण्यासाठी तेवढं पुरेसं असतं; आणखी कशाचीही जरूर नसते!''

मी नकळत पुढे झुकलो. मी नुकतंच कुणालातरी विस्तवावर चालताना बघितलेलं होतं आणि एकाएकी स्कॉट अन् मी विस्तवावरून चालू लागलो. डॅनपेक्षा आम्ही दोघं खूपच जलद गतीनं चालत होतो. माझ्या उघड्या टाचा विस्तवावर टेकल्या की, मला खाली 'कडकड' असा निखाऱ्यांचा आवाज ऐकू येत होता. मी निखाऱ्यांवरून पलीकडे गेलो तरी मला उष्णतेची

अजिबात जाणीव झाली नाही आणि त्यानंतर अचानक तळपायांवर फोड आलेले जाणवू लागले. एका ओंडक्यावर बसून मी माझ्या तळपायांकडे निरखून बघितलं, पण मला फोड दिसले नाहीत. माझ्या पायांना काजळी लागली असली, तरी इजा अजिबातच झालेली नव्हती.

डॅन मला म्हणाला, ''तुमचा देह कशाला सामोरा जाऊ शकलाय, यावर कधीकधी तुमचं मन विश्वास ठेवू शकत नाही.'' जणू काही त्याचा हा मुद्दा सिद्ध करण्यासाठी की काय, तो हातांवर उभा राहिला आणि विस्तवावर तळवे ठेवत पलीकडे गेला. अर्धं अंतर काटल्यानंतर तो क्षणभर थांबला आणि म्हणाला, ''उष्णता नसतेच; नुसताच आभास असतो!''

काही का असेना; डॅननं जे केलं, ते पाहून आम्ही थक्क झालो. डॅनचं आणि स्कॉटचं आणखी एक स्वप्न होतं. ते सत्यात उतरलं असतं, तर याहूनही थक्क करण्याजोगं महत्कृत्य ठरलं असतं! ते स्वप्न होतं – त्यांच्या पर्वतप्रेमातून यशस्वी धंदा उभारण्याचं! अमेरिकेच्या वायव्येचा टापू त्यादृष्टीनं यथायोग्यच होता.

स्कॉट आणि जीनी १९८२मध्ये सीॲटल मुक्कामी गेले. जुनी आठवण सांगताना जीनी म्हणाली, ''जिथे पर्वत आणि विमानं ह्या दोन्ही गोष्टी असतील, अशा जागेचा आम्ही शोध घेत होतो. डेन्व्हर, सीॲटल, सॉल्ट लेक, अँकरेज यांपैकी कोणत्या जागी ह्या दोन्ही गोष्टी उपलब्ध होतील, याबद्दल आम्ही नेहमीच चर्चा करत असू.'' जीनी मालवाहू लिअर जेट्स चालवून अनुभव गोळा करत होती. त्या वेळेस सीॲटलमध्ये मुख्यालय असलेल्या 'अलास्का एअरलाइन्स'नं तिला नोकरी देऊ केली. जीनीनं आणि स्कॉटनं ती संधी सोडली नाही.

त्या दोघांनी आधी रेन्टन ह्या सीॲटलच्या उपनगरात एक छोटंसं घर भाड्यानं घेतलं. त्यानंतर जिथून शेतं आणि माउन्ट रेनियर यांचं सुंदर दृश्य दिसत होतं, अशा मोठ्या भाड्याच्या घरात त्यांनी आपला मुक्काम हलवला. पायलटच्या नोकरीत जीनी चांगल्यापैकी रुळल्यावर त्यांनी पश्चिम सीॲटलमध्ये फॉन्टलरॉय ह्या धक्क्याजवळचं घर विकत घेतलं. घराच्या पाठीमागच्या बाजूच्या डेकवरून त्यांना प्युजेटच्या सामुद्रधुनीचं दर्शन होत असे. दिवस स्वच्छ असला, तर पश्चिम क्षितिजावरले ऑलिम्पस पर्वतसुद्धा दिसत असत. घराचं तळघर त्यांनी चांगलंच सुशोभित करून घेतलं होतं. ते त्यांचं ऑफिस, कोठारघर आणि माउन्टन मॅडनेसच्या सभासदांना बिस्तरा

पसरून रात्र-दोन रात्र राहण्याचं ठिकाणं बनलं. माउन्टन मॅडनेस नावाची पर्यटन कंपनी गिर्यारोहणाच्या सफरी जगभरात कुठेही आयोजित करून देणार होती. स्कॉटनं आपल्या काही मित्रांबरोबर ह्या कंपनीची स्थापना केलेली होती.

सीॲटल आज अगदी आघाडीवरलं प्रसिद्ध शहर आहे; परंतु १९८२मध्ये ते अगदी संथ आयुष्य असलेलं गाव होतं. विमान कंपन्या आणि लाकडाचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या १९७०च्या दशकात मंदीच्या लाटेतून गेलेल्या होत्या. 'सीॲटल सोडणाऱ्या शेवटच्या माणसानं सारे दिवे मालवून गाव सोडावं,' ही प्रसिद्ध पाटी १९८२मध्ये उतरवण्यात आली तरी अजून धंद्याला बरकत आलेली नव्हती. त्या जमान्यात 'स्टार बक्स' हे पाइक रोडच्या मध्यावरचं एक लहानसं कॉफीशॉप होतं आणि तिथे फक्त ब्लॅक कॉफी विकली जात असे. त्याच काळात बिल गेट्स आणि पॉल ॲलन, हे रिकामी पिझ्झा बॉक्स आणि कोक कॅन्स यांच्या पसाऱ्यात बसून प्रारंभीची कॉम्प्युटर परिभाषा लिहिण्यात मग्न होते. प्युजेटच्या सामुद्रधुनीच्या आसपासच्या सर्वसामान्य परिस्थितीला आणखी भगदाड पाडण्यासाठी जणू त्याच वेळेस माउन्ट सेन्ट हेलन्सवरच्या ज्वालामुखीचा उद्रेक झाला. पॅसिफिक किनाऱ्याच्या वायव्येला असलेलं एक पर्वतशिखर गिर्यारोहणासाठी बाद ठरलं. परंतु कॅस्केड पर्वतराजींत गिर्यारोहण करण्याजोगी इतर खूप शिखरं होती आणि खूप लोक ती चढून जाऊ इच्छित होते.

सुरुवातीच्या काळात कॅस्केड पर्वतावर आणि ऑलिम्पस पर्वतावर जे गिर्यारोहक चढून गेले, त्यांना भरपूर स्थानिक प्रसिद्धी व मोठेपण मिळालं. सीॲटल माउन्टेनिअर्स आणि माउन्टन रेस्क्यू यांसारख्या संस्थांनी साहसी गिर्यारोहकांना एकत्र आणलं. दुसऱ्या महायुद्धानंतर साहसी गिर्यारोहकांची संख्या खूपच वाढली. कारण लष्कराच्या १० नंबरच्या माउन्टन डिव्हिजनमधले अनुभवी लोक इथे आले. ह्या १० नंबरच्या माउन्टन डिव्हिजनच्या लोकांना गिर्यारोहणाचा चांगला अनुभव असल्यामुळे युरोपातील पर्वतांवर नाझींशी लढण्यासाठी त्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. युद्ध संपल्यावर हे लोक परत आले, तेव्हा त्यांनी स्कीइंगची आणि गिर्यारोहणाची आणखी कौशल्यं आत्मसात करून घेतलेली होती. त्यांच्यापाशी लष्करातून मिळालेले भरपूर गरम कपडे होते, कॅम्पिंगचं सामानही होतं आणि पर्वतावर काय करता येईल याबद्दल त्यांच्या अंगी जरा

अधिकच विश्वाससुद्धा होता!

सुरुवातीच्या काळात अमेरिकेतून हिमालयात गिर्यारोहणाच्या मोहिमेवर जाणारे लोक माउन्ट रेनियरच्या हिमनद्यांवर सराव करत असत. माउन्ट रेनियर सीॲटलच्या दक्षिणेला साठ मैलांवर आहे. १४००० फुटांतून अधिक उंचीचं हे शिखर तिबेट आणि नेपाळ यांतील शिखरांवरील परिस्थितीशी खूपच मिळतीजुळती परिस्थिती असलेलं आहे. एव्हरेस्टवर सर्वप्रथम चढून जाणारा अमेरिकन नागरिक जिम व्हिटॅकर हा पश्चिम सीॲटलमध्येच लहानाचा मोठा झाला. जिम आणि त्याचा जुळा भाऊ लू यांना लहानपणी हे-फीवरचा खूपच त्रास होत असे. त्यांच्या आईनं या दोघांची नावं बॉय स्काउट्समध्ये नोंदवली. बॉय स्काउट्स ज्या कॅम्पिंग ट्रिप्स आयोजित करत असे, त्यात ह्या मुलांना ताजी हवा मिळून त्यांची प्रकृती सुधारेल, असं तिला वाटलं होतं. योगायोगानं त्यांच्या स्काउट प्रमुखाला गिर्याराहेणाची आवड होती आणि दुसऱ्या महायुद्धात एक हात गमावलेला असूनसुद्धा त्यानं त्या जुळ्या भावांना कॅस्केड पर्वतावर नेलं आणि गिर्यारोहणाचं प्राथमिक शिक्षण दिलं.

पर्वतरोहणासाठी जाणाऱ्या लोकांना आवश्यक गोष्टींचा पुरवठा करणं हा सीॲटलमधला परंपरागत व्यवसाय होता. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस अलास्का आणि युकॉन इथे सोनं शोधण्यासाठी लोकांच्या ज्या झुंडी गेल्या, त्यांना उघड्यावर राहण्यासाठी आवश्यक अशा गोष्टी पुरवण्याची संधी सीॲटल शहराला लाभली. कारण ह्या शहरातून पुढे जाणारे लोक तिथून कपडे व इतर कॅम्पिंगचं सामान विकत घेऊन मग पुढे जात असत. जाड लोकर आणि कॅनव्हास वापरून सी. सी. फिल्सन या कंपनीने बनवलेले गिर्यारोहण किंवा खाणकामासाठीचे कपडे शतकभर तसेच राहिलेले होते. 'उत्कृष्ट तेच खरेदी करा', हे त्यांचं ब्रीदवाक्य होतं. खेळासाठीचे कपडे विकणाऱ्या सीॲटलमधील दुकानात एड बाऊर यानं १९१५मध्ये कारकून म्हणून पहिली नोकरी घेतली. मग १९३०मध्ये त्यानं हंसाची पिसे भरलेला कोट बनवला आणि आपला धंदा थाटला. गिर्यारोहक ओम डाइबर यानं पाण्यामुळे बूट खराब होऊ नयेत, यासाठी 'स्नो सील' या प्रतिरोधकाचा शोध लावलाच आणि 'पेंग्विन' नावाच्या स्लीपिंग बॅगचं पेटन्टही मिळवलं. ह्या बॅगेला उबदार हात आणि पाय असत, त्यामुळे अंथरुणाबाहेर न पडता, स्लीपिंगमध्ये शिरलेला माणूस कॅम्पभर फिरू शकत असे.

गिर्यारोहणासाठी योग्य असं सामान शोधणाऱ्या स्नेह्यांना मदत करण्याच्या हेतूनं लॉइड आणि मेरी ॲन्डरसननं १९३८मध्ये एक सहकारी भांडार स्थापन केलं. त्याचं नाव होतं 'रिक्रिएशनल इक्विपमेन्ट इनकॉर्पोरेटेड' (करमणुकीचं सामान विकणारी कंपनी). ही आरईआय खूपच तेजीचा धंदा करू लागली आणि त्यांनी १९५५मध्ये जिम व्हिटॅकरला पूर्णवेळाच्या नोकरीवर घेतलं. १९८०च्या दशकाच्या सुरुवातीला ही वायव्येकडची खूपच मोठी कंपनी बनली. ती कॅम्पिंगसाठीचं आणि गिर्यारोहणासाठीचं सामान कॅटलॉगद्वारा विकू लागली आणि सीॲटलच्या कॅपिटल हिलवर त्यांनी एक प्रशस्त दुकानसुद्धा थाटलं. ह्या इमारतीच्या एका भागात पूर्वी कारचं दुकानं होतं. दुकानाच्या लाकडी जमिनींवर तेलाचे, विद्रावकांचे, स्की-वॅक्सचे इतके थर बसलेले होते की, तिथे एक उग्र वास करून राहिलेला असे. वायव्य अमेरिकेतील त्या वेळच्या प्रत्येक गिर्यारोहकाला तो उग्र वास जणू साहसाची हमीच वाटत असे. आरईआय सहकारी दुकानाचं सभासद कार्ड असणं, ही इभ्रतीची एक खूण समजली जात असे. ही व्यक्ती अनेक वर्षांपासून गिर्यारोहण मोहिमेत सहभागी होत असल्याची ती खूण होती.

कॅम्पिंगचं आणि गिर्यारोहणाचं सामान विकणारी इतर दुकानंसुद्धा साहसोत्सुक लोकांचा अड्डा होती. माझी स्कॉटशी ओळख झाली, त्यानंतर थोड्याच दिवसांनी आम्ही सीॲटल युनिव्हर्सिटीच्या परिसरातील नॉर्थफेस स्टोअरमध्ये गेलो. दुकानातल्या कर्मचाऱ्यांनी शोरूममधील जाहिरातींचे स्टॅन्ड आणि दाखवण्यासाठी मांडून ठेवलेले तंबू हटवून आम्हाला जमिनीवर बसण्यासाठी जागा मोकळी करून दिली होती. जीन्स, फ्लीस जॅकेट्स आणि बंडी घातलेल्या लोकांची खोलीभर दाटी झालेली होती. खोलीत ठेवलेल्या स्लाइड-प्रोजेक्टरपासून ते थेट पडद्यापर्यंत लोक दाटीवाटीनं बसलेले होते.

नेड जिलेट यानं एव्हरेस्टला नुकतीच प्रदक्षिणा घातलेली होती. त्याचे अनुभव ऐकण्यासाठी आम्ही तेथे दाटीवाटीनं जमलो होतो. नेड जिलेट हा कुशल गिर्यारोहक आणि ऑलिम्पिक सामन्यात जिंकायची कुवत असलेला स्की चॅम्पियन होता. तो जगातली सर्वोच्च शिखरं चढून जाण्याऐवजी त्यांना प्रदक्षिणा घालून नाव कमावत होता. दोन वर्षांमागेच त्यानं मॅककिनले शिखराला प्रदक्षिणा घातलेली होती. अलीकडेच त्यानं आणि त्याच्या काही साथीदारांनी एव्हरेस्टला प्रदक्षिणा घातली होती आणि आपले अनुभव कथन

करण्यासाठी सीॲटलला आला होता.

जमिनीवर बसून समोरची फिल्म पाहत अनुभव ऐकणाऱ्या स्कॉटला गिर्यारोहण करताना नेड उपजीविकेसाठी काय करतो, हे जाणून घ्यायचं होतं. कार्यक्रम संपल्यावर स्कॉटनं नेडबरोबर हस्तांदोलन केलं. स्कॉटला एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंत पोहोचून एव्हरेस्टवर गिर्यारोहण करायचं होतं. नेडमुळे इतर काही ओळखी होऊन आपली आकांक्षा पूर्ण करण्याचा मार्ग सापडेल, असं स्कॉटला वाटत होतं. अशा गोष्टी नेहमी घडत नसल्या, तरी सीॲटलमध्ये त्या घडणं अशक्य नव्हतं!

डॅन मॅकहेल यानं बॅकपॅक बनवण्याचा व्यवसाय सुरू करून सीॲटलमधील गिर्यारोहकांशी संबंध जोडले होते. तो गिर्यारोहणाचं साहित्य पुरवणाऱ्या व्यावसायिकांपैकी महत्त्वाची व्यक्ती बनला होता. त्यानं तयार केलेले बॅकपॅक्स चांगले जाडजूड आणि मजबूत असत, जवळजवळ बुलेटप्रूफ असत. स्कॉटला ते बॅकपॅक्स अतिशय आवडत. स्कॉटची वजनाला हरकत नसे. त्याच्या दृष्टीनं ते जड असले तरी ते खूपच टिकाऊ आणि पाठीवर वागवायला सुलभ आहेत, हीच गोष्ट महत्त्वाची होती. मॅकहेलनं केलेले बॅकपॅक्स जवळजवळ अविनाशीच असत! सीॲटलमधील आपल्या मित्रानं बनवलेले बॅकपॅक्स आपण वापरत आहोत, ही कल्पनासुद्धा स्कॉटला अत्यंत सुखद वाटत असे आणि तो त्याच्या साऱ्या मोहिमांवर मॅकहेलनं बनवलेले बॅकपॅक्सच घेऊन जात असे.

डॅन स्वत: बनवलेले पॅक्स विकत असे. ते जिथे शिवले जात, त्या इमारतीतल्या एका लहानशा शोरूममधून तो ते विकत असे. त्याचं उत्पादन अतिशय छोट्या प्रमाणावर होतं आणि त्याची गिऱ्हाइकं अत्यंत चिकित्सक होती. त्यामुळे आरईआयसारख्या मोठ्या दुकानांच्या व्यापारी मागण्या पूर्ण करणं त्याला शक्यच नव्हतं. गिर्यारोहकांपैकी चिकित्सक आणि जाणते लोकच मॅकहेलचे बॅकपॅक्स विकत घेत. त्याला दुसरा पर्याय नव्हता आणि प्राप्त परिस्थितीत आपला धंदा यशस्वी करण्याचा डॅन निकरानं प्रयत्न करत होता.

स्कॉटलासुद्धा पर्वतशिखरांशी संबंधित आपला व्यवसाय सुरू करण्याची खूप ओढवाटत होती. गिर्यारोहणासाठीची पर्यटन कंपनी काढावी आणि तिला 'माउन्टन मॅडनेस' हे नाव द्यावं, असा विचार त्याच्या डोक्यात अनेक वर्षं घोळत होता. १९७६च्या हिवाळ्यात एनओएलएसचा प्रशिक्षक

लेन पॅग्लिआरो हा लॅन्डरमध्ये आला होता. एनओएलएसच्या दोन सत्रांमधल्या काळात उपजीविकेसाठी तो लम्बरयार्ड येथे बस ड्रायव्हर आणि मेकॅनिक असं दुहेरी काम करत होता. लेननं जुनी आठवण सांगितली, ''आपल्या नेहमीच्या पद्धतीनं स्कॉटनं मला विचारलं, 'तू उद्या काय करतो आहेस?' मग तो म्हणाला की, न्यूयॉर्क राज्याच्या उत्तर भागातून आलेल्या चार लोकांनी विन्डरिव्हर पर्वतावरल्या शिखरावर नेण्यासाठी स्कॉटला वाटाड्या म्हणून बोलावलं होतं. त्यानं मलासुद्धा मदतीसाठी त्याच्याबरोबर घेतलं.''

पुढल्या दिवशी हे चौघं जण लेन आणि स्कॉटबरोबर गिर्यारोहणासाठी बाहेर पडले. लेन आणि स्कॉट यांचं वय तेव्हा अनुक्रमे अठरा आणि एकोणीस वर्षांचं होतं. त्यांची गिऱ्हाइकं होती चाळिशीचे दोन पुरुष आणि त्यांची दोन टीनएजर मुलं. लेन मला म्हणाला, ''आम्ही चढू लागलो, तेव्हा एनओएलएसच्या एका सत्रातला गट खाली उतरत होता. चढावर आणि परत येतानासुद्धा आम्हाला एनओएलएसचे आणखी दोन गट भेटले. पण त्यांच्यापैकी कुणीही शिखरापर्यंत पोहोचलं नव्हतं; फक्त आम्हीच त्या शिखरावर चढून जाऊ शकलो.'' ते पर्वतावर चढत असताना बर्फ पडू लागलं, त्यामुळे परतीच्या वेळेस त्यांचे पावलांचे ठसे झाकले गेले आणि त्यांना रस्ता सापडायला त्रास जाणवू लागला. लेन म्हणाला, ''एक-दोनदा अवघड परिस्थिती समोर ठाकली आणि आमच्याबरोबर आलेल्या लोकांना थोडी काळजी वाटू लागली. पण सारं काही नीटपणे पार पडलं. ती सफर झक्कास झाली.''

त्यानंतर अनेक वर्षांनी स्कॉटनं माउन्टन मॅडनेसची दुसरी सफर आयोजित केली. ही सफर खूपच अवघड होती. या वेळेस तो मॅककिनलेवर पर्यटकांना नेणार होता. एनओएलएसचे त्याचे सहाध्यायी प्रशिक्षक, मायकेल ॲलिसन आणि पॉल काल्व्हर यांनी स्कॉटला मदत केली. त्या तिघांनी अनेकांना शिखरावर यशस्वीपणे नेलं.

मासिकासाठी लेख लिहिणाऱ्या एका लेखकाला स्कॉट अनेक वर्षांनी म्हणाला, ''मी साहसी पर्यटनाच्या माझ्या कंपनीचं नाव 'माउन्टन मॅडनेस' ठेवायचं ठरवलं होतं, कारण मी पर्वतवेडा आहे आणि तेच काम करतोय.'' त्यानं ही कल्पना जेनीला १९७४मध्ये सांगितली होती. तीन वर्षांनी जीनीनं त्याला माउन्टन मॅडनेसचं बिझनेस कार्ड बनवायला मदत केली. त्या

कार्डवरील खुणेची प्रतिमा होती –पर्वताची एक कड आणि पर्वतावर दिसत असलेला चंद्र. स्कॉटचे चावट मित्र त्या चित्राबद्दल चिडवत, टिप्पणी करत म्हणाले, ''ते चित्र तेलाच्या विहिरीतून बाहेर पसरलेल्या तेलासारखं किंवा मोठा व्हेलमासा नाकानं चेंडू उडवत असल्यासारखं दिसतंय!''

स्कॉट सीॲटलला गेला, तोवर त्याला वाटू लागलं होतं की, एनओएलएसमधल्या उमेदवारीचे दिवस संपत आले आहेत आणि त्यानं आता स्वत:चा व्यवसाय सुरू करायला हवा! त्याला असं खरोखरच वाटत असलं पाहिजे, कारण त्यानं गडद पिवळ्या टी-शर्टवर श्ध्ळ-ऊँघ्- ईंॅ-एंए ह्या शब्दांखाली जीनीनं तयार केलेलं डोंगराची कड आणि चंद्राचं चित्र छापून घेतलं होतं. या चित्राखाली 'स्कॉट फिशर आणि सहाध्यायी, रेन्टन, वॉशिंग्टन' हे शब्दसुद्धा छापून घेतलेले होते.

वेस क्राउससुद्धा एनओएलएसमधली उमेदवारी थांबवायला उत्सुक होता. तो केनियात राहून एनओएलएसचा आफ्रिकेतला कारभार संभाळत होता. त्याच्या एनओएलएस बरोबरच्या कंत्राटाची मुदत संपत आलेली होती. प्राण्यांचं दर्शन घडवणाऱ्या आणि माउन्ट किलिमांजारोवर व माउन्ट केनियावर गिर्यारोहणासाठीच्या सफरी आयोजित करून इच्छुकांकडून थेट पैसे स्वीकारावेत, असा त्याचा विचार होता. वेस म्हणाला, ''मी आणि स्कॉट याबाबत बोललो आणि आपली कंपनी स्थापावी, असा आम्ही निर्णय घेतला.''

ह्या दोघांनी स्वाभाविकपणे आपल्या कंपनीत भागीदार म्हणून सामील होण्याची विनंती मायकेल ॲलिसनला केली. मायकेल त्यांचा सुरुवातीपासूनचा मित्र होता आणि त्याला अलास्कात सफरी नेण्याचा तसेच एनओएलएसमध्ये शिकवण्याचा भरपूर अनुभव होता. मायकेलनं मला अलीकडेच सांगितलं, ''माउन्टन मॅडनेसची आफ्रिकेतली शाखा चालवायचं वेसनं ठरवलं. स्कॉट अन् मी मिळून अमेरिकेतील आणि इतर देशांतील गिर्यारोहण-सफरींचं आयोजन करणार होतो. आम्ही प्रत्येकानं कंपनीत ५०० डॉलर्स भांडवल म्हणून जमा केले. ती आमची आयुष्यभरांची पुंजी होती. आणि 'माउन्टन मॅडनेस' सुरू केली.'' ते वर्ष होतं १९८२. कंपनी स्थापन केल्याबरोबरच त्यांनी कंपनीचं आधीचं चित्र (पर्वत आणि चंद्र) बदलून त्या जागी स्कॉटसारख्या दिसणाऱ्या हसऱ्या माणसाचा फोटो घातला. चित्रातल्या ह्या माणसाच्या डोक्यावर हेल्मेट होतं आणि त्याच्या गॉगलमध्ये

पर्वतशिखराचं प्रतिबिंब उमटलेलं दिसत होतं. यानंतर अनेक वर्षांनी ह्या संस्थापकांनी एक वकील गाठला आणि कंपनीची कायदेशीरपणे नोंदणी केली.


३री आवृत्ती

# कथारूपी खगोलशास्त्र

लेखिका
लीना दामले

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




खगोलशास्त्रासारख्या चित्तवेधक आणि मनोरंजक विषयाची मुलांना ओळख व्हावी तसेच या विषयात त्यांना आवड उत्पन्न व्हावी या उद्देशाने हे पुस्तक लिहिले आहे. कुठलेही शास्त्र कथारूपात सांगितले तर ते समजायला अधिक सोपे जाते. नकळत त्यातून त्या विषयात रुची निर्माण होते.

प्रस्तुत पुस्तकात आकाशातील नक्षत्रे, राशी व इतर तारकासमूहांची - त्यांच्याबद्दलच्या हिंदू, ग्रीक, रोमन, इजिप्शियन इ. पौराणिक गोष्टींसह सचित्र माहिती दिलेली आहे. माहिती संवादस्वरूपात व कथांच्याद्वारे प्रस्तुत केल्यामुळे मुलांना ती वाचायला नक्कीच आवडेल.




# अमरगीत :
## बाबा आमटे यांचे जीवनचरित्र

'निशा',

'अमर गीत' नावाचं आपण मराठीत भाषांतर केलेलं पुस्तक वाचून संपवलं, तेव्हा मी अक्षरश भारावून गेलो.

मी 'आनंदवन'ला भेट दिली, तेव्हा सुदैवानं बाबाचं दर्शन झालं; पण ते आजारी असल्यामुळे त्यांना जवळून भेटता आलं नाही. मला त्यांच्या कार्याची पूर्ण माहिती होती. ते मी प्रत्यक्ष पाहू शकलो. तुमच्या पुस्तकात बाबांचं चरित्र आणि कार्य अत्यंत सुबोध रीतीने शब्दांकित केलं आहे. बाबांवर पुस्तक लिहिणं हे तसं कठीण काम होतं; पण त्यांचे विविध उपक्रम आणि त्यांच्या जीवनाचे विविध पैलू तुमच्या पुस्तकात यथार्थपणे समाविष्ट केले आहेत. भाषा आणि शैली वाचनीय आणि रंजक आहे. अभिनंदन

– श्रीराम घैसास

अमरगीत : बाबा आमटे यांचे जीवनचरित्र
लेखिका : निशा मीरचंदानी
अनुवादिका : लीना सोहोनी
प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस
पृष्ठे : २६८, रुपये २००/-




## ज्येष्ठ कन्नड साहित्यिक अनंतमूर्ती कालवश



कन्नड साहित्यातील नवोदयवादाचे प्रणेते आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक यू.आर.अनंतमूर्ती यांचे येथील खासगी रुग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. 'समीक्षकांपासून चाहत्यांपर्यंत सर्वांनाच आपल्या लेखनाने मोहिनी घालणारे साहित्यिक' असा त्यांचा लौकिक होता. ताप आणि फुप्फुसातील संसर्ग यामुळे गेले १० दिवस त्यांच्यावर उपचार सुरू होते. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यामागे त्यांची पत्नी आणि दोन मुले आणि नातवंडे असा परिवार आहे.

अनंतमूर्ती यांनी आपल्या कसदार लेखनाद्वारे कन्नड साहित्याची दिशा बदलली होती. नोकरशहा-राजकारणी, वडील-मुलगी, पिता-पुत्र यांच्यातील नातेसंबंधांचे नवनवीन आयाम त्यांनी आपल्या लेखनातून उलगडून दाखविले होते. त्यांच्या पाच कादंबऱ्यांवर चित्रपटांचीही निर्मिती करण्यात आली होती. तर, अनेक कादंबऱ्या आणि लेखसंग्रहांचे विविध भाषांमध्ये अनुवाद करण्यात आले होते.

अनंतमूर्ती हे गेली काही वर्षे मूत्रपिंडाच्या विकाराने ग्रस्त होते. त्यांचे नियमित डायलिसिसही करण्यात येत होते. त्यातच त्यांना मधुमेह आणि हृदयविकार जडला. त्यामुळे गेले दहा दिवस त्यांना येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गुरुवारी रात्री त्यांची प्रकृती खालावली आणि त्यांना श्वसनास त्रास होऊ लागला, अशी माहिती मणिपाल रुग्णालयाचे संचालक आणि वैद्यकीय सल्लागार मंडळाचे अध्यक्ष एच. सुदर्शन बल्लाळ यांनी दिली.

कन्नड साहित्यातील नवोदयाचे प्रणेते अशी ओळख असलेल्या मूर्ती यांची पाच कादंबऱ्या, एक नाटक, आठ लघुकथा संग्रह, तीन कवितासंग्रह अशी साहित्यसंपदा आहे. त्यांचे बरेचसे लिखाण भारतीय तसेच युरोपीय भाषांत अनुवादित झाले आहे. त्यांची पहिलीच कादंबरी 'संस्कार' प्रचंड लोकप्रिय ठरली. त्या कादंबरीवर निघालेला चित्रपट हा कन्नड समांतर सिनेमासाठी आजही दिशशदर्शक मानला जातो. २०१३मध्ये आंतरराष्ट्रीय साहित्यविश्वातील मानाच्या मॅन बुकर पुरस्कारासाठी नामांकन मिळाल्यामुळे पाश्चिमात्य जगताचे लक्ष त्यांच्या साहित्याकडे वळले होते. केरळ आणि कर्नाटकातील विद्यापीठांचे कुलगुरूपदही त्यांनी भूषविले होते. त्यांना मिळालेले पुरस्कार खालीलप्रमाणे –

- १९८४ राज्योत्सव पुरस्कार
- १९९४ ज्ञानपीठ पुरस्कार
- १९९५ मास्ती पुरस्कार
- १९९८ पद्मभूषण
- २००८ नादोजा पुरस्कार (कर्नाटक विद्यापीठ)
- २०११ द हिंदू लिटररी प्राइज
- २०१२ कोलकाता विद्यापीठाची डी.लिट

## योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार यांचे निधन



योगविद्येला जगभरात प्रतिष्ठा मिळवून देणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार (वय ९६) यांचे हृदयविकाराने बुधवारी खासगी रुग्णालयात पहाटे निधन झाले. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या देश-परदेशातील त्यांच्या शिष्यांनी व मान्यवरांनी साश्रुनयनांनी त्यांना वैकुंठ स्मशानभूमीत अखेरचा निरोप दिला.

वयोमानामुळे अय्यंगार यांची हृदयाची कार्यक्षमता कमी झाली होती. त्यामुळे त्रास वाढू लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान हृदयक्रिया थांबल्याने अय्यंगार यांची प्राणज्योत मालवली, असे डॉक्टरांनी जाहीर केले. त्यांच्या मागे गीता अय्यंगार, वनिता श्रीधरन,

सुनीता पार्थसारथी, सविता रघू, सुचेता श्रीधर या कन्या व मुलगा प्रशांत असा परिवार आहे.

बेल्लूर कृष्णमचार सुंदरराज अय्यंगार असे त्यांचे पूर्ण नाव. कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडील कृष्णामचार आणि आई शेषम्मा यांचे संस्कार त्यांच्यावर झाले. ते पाच वर्षांचे असताना अय्यंगार कुटुंबाचे बंगळूर येथे स्थलांतर झाले. तेथे काही वर्षांनी वडिलांचे निधन झाले. त्यामुळे कुटुंबाची जबाबदारी अय्यंगार यांच्यावर आली. म्हैसूरला येऊन त्यांनी योगासनांचे प्रशिक्षण घेतले. प्रकृती नाजूक असल्याने खण्या-पिण्याची पथ्ये सांभाळून तब्येत सुधारली. पुढे योगासने करण्याचा आणि या विषयावर सखोल अभ्यास करण्याचा त्यांनी ध्यास घेतला. योगविद्येच्या प्रचार-प्रसारासाठी १९३७ मध्ये ते वयाच्या अठराव्या वर्षी पुण्याला आले. आणि येथेच स्थायिक झाले. पुढे 'योगगुरु' म्हणून जगभरात त्यांची ओळख निर्माण झाली. जयप्रकाश नारायण यांच्यापासून सुषमा स्वराज यांच्यापर्यंत, सचिन तेंडुलकर, नसिरुद्दीन शहा यांच्यापासून ते डॉ. मोहन आगाशे यांच्यापयंत अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांना त्यांनी योगासनाचे शिक्षण दिले. इतकेच नव्हे तर बेल्जियमच्या राणी एलिझाबेथ यांना ऐंशीव्या वर्षी शीर्षासन करण्याचे प्रशिक्षणही दिले. पत्नीच्या निधनानंतर त्यांनी १९७५मध्ये पुण्यात 'रमामणी अय्यंगार स्मृती योग संस्था' सुरू केली. येथे देशभरातीलच नव्हे तर परदेशातीलही असंख्य विद्यार्थ्यांना त्यांनी योगविद्येचे धडे दिले. त्यामुळे तेथे शेकडोंच्या संख्येने 'अय्यंगार योग केंद्र' सुरू आहेत. अशाप्रकारे भारताचा अनमोल सांस्कृतिक ठेवा सर्वांना प्राप्त होत आहे. पद्मश्री (१९९१), पद्मभूषण (२००२) पद्मविभूषण (२०१४) या सन्मानांबरोबरच देश-विदेशातील अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला आहे. जगातील सर्वात प्रभावशाली शंभर व्यक्तीत त्यांचे स्थान होते.

''अय्यंगार यांनी आपले संपूर्ण आयुष्य योगाचे पुरातन ज्ञान जगात पसरविण्यासाठी वेचले. अशा महान व्यक्तिमत्वाला आपण मूकलो आहोत.''

- प्रणव मुखर्जी, राष्ट्रपती.

''चांगले गुरू, विद्वान आणि अनेक लोकांच्या आयुष्यात योग आणणारे म्हणून अय्यंगार पुढेही अनेकांच्या लक्षात राहतील.''

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

## कल्पलता खरे यांचे निधन

ज्ञानपीठ विजेते साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या कन्या कल्पलता विजय खरे (वय ७५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात्त दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कल्पलता यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथे झाले. १९८५ पासून त्या पुण्यात राहत होत्या.

## स्मिता तळवलकर पडद्याआड



वृत्तनिवेदिका ते अभिनेत्री, निर्माती आणि दिग्दर्शिका अशी यशस्वी वाटचाल करणाऱ्या स्मिता तळवलकर (वय ५९) यांचे कर्करागाने निधन झाले.

त्यांच्या मागे मुलगा, मुलगी, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. दुर्धर आजार झाला असतानाही त्या खचल्या किंवा डगमगल्या नाहीत. मराठी मालिका आणि चित्रपटांतील कामे त्यांनी सुरूच ठेवली. 'भातुकली' हा त्यांचा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला होता. यातही त्यांनी नेहमीप्रमाणे अभिनयाची छाप उमटवली होती.

'देखणी बायको दुसऱ्याची', 'कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या', 'छावा', 'तो एक क्षण', 'आहे मनोहर तरी', 'दुर्गाबाई जरा जपून', अशी एकाहून एक नाटके रंगभूमीवर सादर करून आपल्या अभिनयाचा ठसा स्मिता तळवळकर यांनी उमटवला. मालिका, चित्रपट, प्रॉडक्शन हाऊस या साऱ्यांचा भाऊगर्दीतही स्मिता तळवळकर यांनी रंगभूमीवरचं प्रेम कमी होऊ दिलं नाही.

'तू फक्त हो म्हण' हे नाटक चांगलेच लोकप्रिय ठरले. त्याचे जवळपास ७५० प्रयोग हाऊसफुल झाले.

१९८६ मध्ये त्यांनी चित्रपट कारकिर्दीला सुरुवात केली. 'तू सौभाग्यवती हो' आणि 'गडबड घोटाळा' हे दोन चित्रपट त्यांनी केले. त्यांना चांगले यश मिळाले. 'अस्मिता चित्र' ही निर्मिती संस्था त्यांनी १९८९ मध्ये सुरू केली. 'कळत-नकळत' त्यांच्या संस्थेचा पहिला चित्रपट. त्याला चार राष्ट्रीय, तर नऊ राज्य पुरस्कार मिळाले. 'स्पेशल चाईल्ड' या विषयावर आधारित असलेल्या 'चौकट राजा' या चित्रपटाचीही दखल समीक्षक आणि प्रेक्षकांनी घेतली. १९९२ मध्ये 'इंडियन पॅनोरमा'साठी 'चौकट राजा'ची

निवड झाली. त्याला १३ राज्य पुरस्कार मिळाले.

'अस्मिता चित्र' बॅनर अंतर्गत निर्मिती झालेले चित्रपट चाकोरीबाह्य होते. 'सवत माझी लाडकी', 'तू तिथं मी', 'सातच्या आत घरात', 'आनंदाचे झाड', अशा विविध आशयघन चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली. 'सवत माझी लाडकी'चे दिग्दर्शन स्वत: स्मितातार्इंनी केले.

चित्रपटांबरोबरच मालिकांची निर्मितीही त्यांनी केली. 'पेशवाई', 'नंदादीप', 'नूपुर', 'अवंतिका', 'ऊन-पाऊस', 'अभिलाषा', 'अनुपमा', 'गोष्ट एका लग्नाची', 'गोष्ट एका जप्तीची', अशा दर्जेदार मालिकांची त्यांनी निर्मिती केली.

## ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री सुशीलाराणी पटेल यांचे निधन



बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या ज्येष्ठ गायिका, अभिनेत्री, लेखिका, संपादक आणि वैद्यक पदवीधर डॉ. सुशीलाराणी पटेल यांचे मुंबईत वांद्रे येथे निवासस्थानी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्या ९६ वर्षांच्या होत्या. भारतातील पहिल्या चित्रपट मासिकाचे संपादक बाबूराव पटेल यांच्या त्या पत्नी होत्या डॉ. सुशीलाराणी या जयपूर-अत्रोली घराण्याच्या गायिका होत्या. या घराण्याचे जनक अल्लादियाँ खाँसाहेब यांच्याकडे त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे गिरविले होते.

पती बाबूराव पटेल यांच्यानंतर 'फिल्म इंडिया' मासिकाच्या संपादक म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. 'आकाशवाणी'च्या त्या मान्यताप्राप्त गायिका आणि व्हायोलिनवादकही होत्या. डॉ. सुशीलाराणी यांनी 'द्रौपदी' आणि 'गवळण' या चित्रपटातूनही अभिनय केला होता. मागुबाई कुर्डीकर, सुंदराबाई जाधव यांच्याकडेही त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले होते.

संगीत नाटक अकादमी आणि महाराष्ट्र राज्य सांगितिक गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. भारतातील सर्वांत जुन्या गायिका तसेच होमिओपॅथी डॉक्टर म्हणूनही त्यांना ओळखत होते. म्युझिक ॲडव्हायझरी बोर्ड, सेन्सॉर मंडळ यावरही त्यांनी सदस्य म्हणून काम केले होते. शास्त्रीय संगीताचे जतन आणि नव्या पिढीला याचे शिक्षण देण्यासाठी

या दाम्पत्याने ‘शिव संगीतांजली’ या संस्थेची स्थापना केली होती. हंसराज ‘गवळण’ चित्रपटातील ‘लगत नजर’ तेरी छैलिया’ हे द्वंद्वगीत मुकेशसह डॉ. सुशीलाराणी यांनीच गायले होते.

‘स्वरआलाप’ संस्थेतर्फे मुंबईत माटुंगा येथील म्हैसूर असोसिएशन येथे आयोजित एका विशेष सोहळ्यात ९३व्या वाढदिवसाच्या निमित्ताने डॉ. सुशीलाराणी यांचा खास सत्कार करण्यात आला होता. विशेष बाब म्हणजे सत्कार सोहळ्यात डॉ. सुशीलाराणी यांनी आपल्या भावना व्यक्त करून सोबत गायनाची मैफलही रंगविली होती.

## ९६व्या वर्षी पद्मावती शालिग्राम या अनंतात विलीन



उस्ताद अल्लादियाँ खाँसाहेब यांच्या जयपूर अत्रौली घराण्याने देशाला अनेकोत्तम गानमाणके दिली. त्यातीलच पद्मावती शालिग्राम (गोखले) हे अस्सल माणिक वयाच्या ९६ व्या वर्षी अनंतात विलीन झाले. १९१८ साली कोल्हापुरात जन्मलेल्या पद्मावतींचे काका गोविंदबुवा आणि वडीलही खाँसाहेबांचे शिष्य होते. वयाच्या तेराव्या वर्षापासूनच निसर्गतः पल्लेदार आणि लवचीक आवाजाची देणगी लाभलेल्या पद्मावतींच्या गायनाच्या मैफली आयोजित केल्या जाऊ लागल्या. गोविंदबुवा कोल्हापूर संस्थानचे दरबारी गायक होते. गुरूंची करडी शिस्त आणि घराण्याची पठडी त्यांच्यात पुरेपूर मुरली असली तरी स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या पद्मावतींनी किराणा खयाल आणि पतियाळा ठुमरीचे रंगही आपल्या गाण्यामध्ये मोठ्या नजाकतीने भरले. हा संयोग इतका लीलया आणि मनमोहक होता की, केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरातील जाणकरांपर्यंत पद्मावती शालिग्राम हे नाव सन्मानाने पोहोचले. सरोदवादनातील उस्ताद अली अकबर खाँ यांनी १९४८ साली जोधपूर पॅलेस फेस्टिव्हलमध्ये गायन पेश करण्याची संधी त्यांना दिली, त्यामुळे हा मान मिळालेल्या त्या एकमेव महिला गायिका होत्या. त्या काळातील अनेक गुणी आणि कसदार गायक मंडळींप्रमाणे त्यांनाही ऑल इंडिया रेडिओच्या कलाकार म्हणून मान्यता होती. सर्वत्र त्यांच्या गायकीचा परिमळ दरवळत होता. मैफलीच्या प्रारंभापासूनच श्रोत्यांच्या मनाची पकड घेण्याचे त्यांचे सामर्थ्य वादातीत होते. अनेक चीजा,

बंदिशी त्यांनी ताकदीने सादर केल्या. 'जा मै तोसे नाही बोलू' ही त्यांची ठुमरी अतिशय लोकप्रिय होती. त्यांना देखणे रूपही लाभले होते. त्यांच्या अखंड संगीतसाधनेबद्दल १९८८ साली संगीत नाटक अकादमीचा अतिशय बहुमानाचा पुरस्कार लाभला. १९९४-९५चा कालिदास सन्मान आणि त्यानंतर अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाचा पुरस्कार यांनीही त्या सन्मानित झाल्या. कोलकात्यातील आयटीसी संगीत संमेलनात त्यांना आवर्जून बोलावले गेले आहे.

## डी. वाय. पाटील यांच्या पत्नीचे निधन



बिहारचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या पत्नी पुष्पलता पाटील (७५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. पुष्पलता यांच्या पश्चात पती डी. वाय. पाटील, पुत्र डॉ. विजय, डॉ. अजिंक्य, मुली डॉ. नंदिता पालशेतकर, डॉ. प्रिया छोलेरा असा परिवार आहे. पदवीचे शिक्षण पूर्ण केलेल्या पुष्पलता यांना लहानपणापासून साहित्याची आवड होती. ''कथा पुष्पांजली' आणि 'हसत रंगल्या आठवणी' असे त्यांचे दोन कथासंग्रह आहेत.

## प्रसिद्ध व्यंग्यचित्रकार प्राण यांचे निधन



भारताचे 'वॉल्ट डिस्ने' आणि चाचा चौधरी या जगप्रसिद्ध व्यंग्यचित्रात्मक कॅरेक्टरचे निर्माते प्राणकुमार शर्मा ऊर्फ प्राण (वय ७५) यांचे आज कर्करोगाच्या आजाराने निधन झाले.

व्यंग्यचित्रकार म्हणून प्राण यांच्या करिअरची सुरुवात दिल्लीतून झाली. १९६९ मध्ये प्राण यांनी 'लोटपोट' या नियतकालिकासाठी 'चाचा चौधरी' या नव्या कार्टून कॅरेक्टरला जन्म दिला. त्यामुळे त्यांना एक नवी ओळख मिळाली.

## संगीत अभ्यासक नाडकर्णी यांचे निधन

ज्येष्ठ संगीत अभ्यासक, लेखक मोहन नाडकर्णी (वय ९१) यांचे

न्यूझीलंडमधील ऑकलंड येथे मंगळवारी निधन झाले. नाडकर्णी हे मूळचे पुण्याचे होते.

संगीत क्षेत्रावर त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. या क्षेत्रातील अनेक दिग्गजांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. कर्नाटक सरकारने त्यांना 'कलाश्री पुरस्कार' देऊन सन्मानित केले होते. कोलकता येथील संगीत संशोधन अकादमीचे ते सदस्य होते. दुर्मिळ ध्वनिमुद्रिकांचा संग्रह त्यांनी 'एसएनडीटी'ला भेट दिला होता. त्यांच्या नावानेच संगीत ग्रंथालयही सुरू आहे.

## डॉ. विजय चौधरी यांचे निधन

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या क्ष-किरण विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. विजय चौधरी (वय ७७) यांचे निधन झाले. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय व बुधराणी रुग्णालयामध्ये त्यांनी काही वर्षे अध्यापन केले. इंडियन रेडिओलॉजिस्ट असोसिएशनचे ते माजी अध्यक्ष होते; तर एशियन ओशिनिक कॉलेज ऑफ रेडिओलॉजीचे ते एकमेव भारतीय लोकनियुक्त अध्यक्ष होते. त्यांच्या मागे पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.

## डॉ. मधुकर आळेकर यांचे निधन

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) पुणे शाखेचे माजी अध्यक्ष डॉ. मधुकर त्र्यंबक आळेकर यांचे वयाच्या ८३व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. पुण्यातील डॉक्टरांच्या व्यावसायिक समस्या सोडवण्यात ते अग्रेसर होते. ते महाराष्ट्र राज्य 'आयएमए'चे देखील माजी अध्यक्ष होते. राज्य आयएमएतर्फे त्यांना २००८ मध्ये जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

## यादवराव कुलकर्णी यांचे निधन

विद्यार्थी सहाय्यक समितीचे माजी कार्यकारी विश्वस्त यादवराव गबाजीपंत कुलकर्णी ऊर्फ वाय. जी. (वय १००) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

बनारस विद्यापीठातून त्यांनी बी. एस्सी.मध्ये (केमिकल इंजिनिअरिंग) प्रथम श्रेणीत मिळवली. पुण्यात आल्यावर काही काळ त्यांनी कॅम्प एज्युकेशन व मुलांचे भावे स्कूल येथेही नोकरी केली.




# विनोदवीर तेनालीराम

## बहुरूपी



तेनालीरामच्या करामतींमुळे राजगुरू पार वैतागून गेले होते. रोज काहीतरी असा एखादा प्रकार घडायचा की तेनालीराममुळे त्यांना मान खाली घालायला लागायची. भर दरबारात त्यांचं हसं व्हायचं अगदी.

त्यांच्या मनात आलं, 'हा माणूस मृत्युदंडाच्या शिक्षेतूनही सुटलाय. त्याच्या तावडीतून सुटका करून घ्यायची असेल तर त्याचा युक्तीनं काटा काढला पाहिजे.'

मनातल्या मनात त्यांनी एक योजना आखलीसुद्धा.

राजगुरू तीर्थयात्रेच्या निमित्तानं नगराबाहेर पडले. एका नावाजलेल्या बहुरूप्याकडे त्याची कला शिकू लागले. थोड्याच दिवसांत ते सारी सोंगं आणण्यात पारंगत झाले. मग बहुरूप्याच्या वेशातच ते नगरात आले. थेट दरबारात पोचले. राजाला त्यांनी सांगितलं की ते वेगवेगळ्या नकला करून दाखवू शकतात.



राजाने विचारलं, ''तू सगळ्यांत चांगलं सोंग कोणतं वठवू शकतोस?''

बहुरूपी म्हणाला, ''वाघाचं सोंग महाराज. पण त्यात धोका आहे. कुणीतरी जखमी होऊ शकतं. त्यामुळे हे सोंग दाखवायचं असेल तर एक हत्या मला माफ असली पाहिजे.''

महाराजांनी त्याची अट मान्य केली.

''आणखी एक अट, महाराज. मी वाघाचं सोंग घेईन तेव्हा तेनालीराम दरबारात हजर असावेत.'' बहुरूपी म्हणाला.

''ठीक आहे. आम्हाला मान्य आहे.'' महाराजांनी विचारपूर्वक उत्तर दिलं.

ही अट ऐकून तेनालीराम एकदम सावध झाला. त्याने ओळखलं की हा कोणीतरी माझा शत्रू आहे नक्की. सोंग आणण्याचा बहाणा करून माझ्या जिवावर उठायचा बेत दिसतोय बेट्याचा.

दुसऱ्या दिवशी हा सोंगाचा कार्यक्रम होता. तेनालीरामने सावधगिरी म्हणून आपल्या कपड्यांच्या आत चिलखत घातलं. काही गडबड झालीच तर जखमी व्हायची भीती नको.

बहुरूप्याचा कार्यक्रम सुरू झाला. त्याची सोंगं बघण्यात दरबारी रंगून गेले होते. थोडा वेळ इकडे-तिकडे उड्या-बिड्या मारून झाल्यावर बहुरूपी तेनालीरामच्या जवळ गेला आणि त्याच्यावर तुटून पडला.

तेनालीराम तयारच होता. त्याने हळूच आपल्या हातातल्या वाघनखांनी बहुरूप्यावर वार केला. तडफडत बहुरूपी जमिनीवर कोसळला.

तेनालीरामवरचा हल्ला बघून राजा पण घाबरून गेला.



तेनालीरामला काही झालं असतं तर? राजाला एकदम बहुरूप्याच्या अटी आठवल्या. 'एक हत्या माफ आणि तेनालीरामला दरबारात हजर ठेवणं.' काहीतरी पाणी मुरतंय खास.

तेनालीरामला जवळ बोलावून महाराजांनी विचारलं, ''तू ठीक आहेस ना? कुठे लागलं बिगलं नाही ना?''

तेनालीरामने राजाला चिलखत दाखवलं. एक ओरखडासुद्धा उठला नव्हता त्याच्यावर. महाराजांनी विचारलं, ''तू हे चिलखत कसं काय घालून आलास? तुला या माणसाचा संशय आला होता का?''

तेनालीराम म्हणाला, ''महाराज, याच्या मनात जर काही काळंबेरं नसतं तर याने दरबारात मला हजर राहण्याची अट घातली नसती.''

महाराज म्हणाले, ''मी या कपटी माणसाला चांगली शिक्षा देतो. तुझे प्राण घ्यायचा प्रयत्न केलाय याने. खरं तर आत्ता या क्षणी मी याला फाशीची शिक्षा ठोठवू शकतो. पण माझी अशी इच्छा आहे की तूच याला चांगली अद्दल घडवावीस.''

''होय महाराज, मीच याला चांगला धडा शिकवतो आता.'' तेनालीराम म्हणाला. ''ते कसं काय?'' महाराजांनी विचारलं.

''तुम्ही नुसतं बघत रहा, महाराज.'' तेनालीराम म्हणाला.

मग तेनालीराम बहुरूप्याकडे येऊन त्याला म्हणाला, ''तुझी कला बघून महाराज प्रसन्न झालेत. महाराजांची इच्छा आहे की तू सतीचं हुबेहूब सोंग वठवून दाखवावंस. मग ते तुला ५ हजार सुवर्णमुद्रा भेट देतील.''

बहुरूप्याच्या वेषातले राजगुरू मनात म्हणाले, 'अरे बापरे, आता

अडकलो. काही खरं नाही. पण करतो काय? सतीचं सोंग घेण्याला आता काही पर्याय नाही.'

तेनालीरामने एक चौथरा बनवला. त्यावर लाकडं ठेवून पेटवली. गरज पडली तर म्हणून वैद्यांना पण बोलावून ठेवलं. बहुरूपी सतीचा वेष धारण करून आला. त्याने सोंग इतकं सुंदर घेतलं होतं की कुणाला ही खरी स्त्री नाही असं वाटलंच नाही.

शेवटी त्याला पेटत्या चितेवर बसावंच लागलं. थोड्याच वेळात आगीच्या ज्वाळांनी त्याला वेढून टाकलं. शरीर तापायला लागलं. तेनालीरामला ते दृश्य बघवेना. त्याला दया आली. त्याने बहुरूप्याला चितेवरून खाली उतरवलं. राजगुरूंनी आपलं खरं रूप प्रकट केलं. ते मनापासून तेनालीरामची क्षमा मागायला लागले.

तेनालीरामने हसत हसत त्यांना माफ केलं. लगेच वैद्यांकडे सोपवलं.

थोड्या दिवसांनी राजगुरू बरे झाले. ते तेनालीरामला म्हणाले, ''आता यापुढे मी कधीच तुझ्याबद्दल मनात शत्रुत्व बाळगणार नाही. तुझं औदार्य बघून मी खूपच भारावून गेलोय. आता तुझ्या माझ्यात चांगली मैत्री व्हावी अशीच माझी इच्छा आहे.''

तेनालीरामने राजगुरूंना प्रेमाने जवळ घेतलं. त्यानंतर मात्र या दोघांमध्ये काहीही मतभेद झाले नाहीत.



ऑनलाइन वाचकांसाठी सुवर्णसंधी

# मेहता मराठी ग्रंथजगत

DIGITAL EDITION

## Digital Edition

**'मेहता मराठी ग्रंथजगत'चा अंक आता डिजीटल स्वरूपात**

- इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यामुळे हवा तिथे पाहू शकता.
- तुमच्या मोबाईलवरही वाचू शकता.
- वाचण्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊस ॲप मार्केटमध्ये मोफत उपलब्ध.

| आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|
| | २५% | ३०% |

| वर्गणी | ३ वर्षांची वर्गणी | ₹ ३०० | ५ वर्षांची वर्गणी | ₹ ४०० |
|---|---|---|---|---|

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.**

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2012-2014/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 September. 2014 Posting Date : 11 September. 2014

# द घोस्ट इन लव्ह

विक्षिप्तपणे किंवा वाईटपणे वागल्यावर उद्‌गार ऐकू येतात, 'त्याच्या अंगात कसले भूत संचारले होते, देव जाणे!' लाक्षणिक अर्थाने अशी जी भुते आपल्यात असतात, ती शब्दश: आपल्याभोवती जमली तर? आपल्यातील परस्परविरोधी प्रवृत्ती एकमेकांशी लढतील. एकच हल्लकल्लोळ होईल! अशाच अद्‌भुत प्रसंग व कल्पनांची रेलचेल असलेली जोनॅथन कॅरोल यांची कादंबरी.

₹ ३००/-

मूळ लेखक : जोनाथन कॅरोल
अनुवाद : उदय कुलकर्णी




BOOK POST
Printed Matter

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.